रविवार **गांवकरी** उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

शुभ गुढी पाडवा

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ३२ ■ नाशिक, रविवार, ३० मार्च २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १६ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# आज गुढीपाडवा : मराठी नवीन वर्षाचे स्वागत होणार जल्लोषात



**नाशिक : प्रतिनिधी**

आज चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे मराठी नवीन वर्षाचा पहिला दिवस. नववर्षाच्या या पहिल्या दिवशी नवे संकल्प करून प्रगतीकडे वाटचाल सुरू करण्याचा हा दिवस गुढीपाडवा म्हणून साजरा करण्यात येतो. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी करण्याची प्रथा आहे. प्रॉपर्टी, वाहन किंवा सोने खरेदी केल्यास ती लाभदायी ठरते, असं मानलं जातं. त्यामुळे या दिवशी आवर्जून लोक खरेदी करतात. श्रीरामाने रावणावर विजय मिळवून ज्या दिवशी अयोध्येत पुन्हा प्रवेश केला त्या दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला नागरिकांनी गुढ्या उभारून उत्सव साजरा केला, अशी पारंपरिक आख्यायिका आहे.

चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथी २९ मार्च रोजी दुपारी ४.२७ वाजता सुरू होत आहे. ही तारीख दुसऱ्या दिवशी ३० मार्च रोजी दुपारी १२.४९ वाजता संपेल. उदयतिथी हिंदू धर्मात वैध आहे. त्यामुळे गुढीपाडव्याचा सण ३० मार्च रोजी साजरा केला जाईल.

### शहरात विविध कार्यक्रम आणि शोभायात्रा

गुढीपाडव्याच्यानिमित्ताने शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, ठिकठिकाणी मराठी नवीन वर्षाच्या शोभायात्रा निघणार आहेत. गोदावरी नदीच्या काठावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, ज्यात ढोल-ताशांच्या गजरात आणि शोभायात्रांच्या जल्लोषात स्वागत केले जाईल.

**श्रीखंड आणि दुधाच्या मागणीत वाढ**

गुढीपाडवा आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर श्रीखंड आणि दुधाच्या मागणीत वाढ झाली आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर गुढीला नैवेद्य म्हणून श्रीखंड-पुरी करण्याची परंपरा आहे.

**खरेदीचा मुहूर्त**

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नागरिकांकडून नवीन वाहन, गृह, गॅझेट खरेदी करत मराठी नवीन वर्षाची धडाक्यात सुरुवात करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून जुंपली!

## आश्वासन पूर्ण करू : शिंदे; विरोधक म्हणतात, शब्द फिरवला



**मुंबई :**

राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे सध्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देता येणार नाही, उलट ३१ मार्चपर्यंत सर्वांनी कर्ज भरावे, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत केल्यानंतर या वक्तव्याचे पडसाद उमटले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी सरकारच्या या भूमिकेवर टीका केली. निवडणुकीपुरते आश्वासन दिले आणि आता शब्द फिरवल्याचा आरोप त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री पवार शुक्रवारी (दि.२८) माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी राज्यातील शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी पीककर्जाचे पैसे बँकेत भरा, असं अजित पवारांनी शेतकऱ्यांना आवाहन केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. अशातच विरोधकांनीदेखील अजित पवारांवर हल्लाबोल केला आहे, याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती सांभाळत सगळ्या मागण्या पूर्ण करू, असंही शिंदेंनी म्हटले आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सोलापूर येथे बोलताना अजित पवार यांच्या सुरात सूर मिसळत पुढील तीन वर्षे तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी करणे शक्य नाही, असे म्हणत अजित पवार यांच्या भूमिकेचे एकप्रकारे समर्थनच केले. यावरून विरोधकांनी टीकेची झोड उठविली आहे.

**आम्ही आश्वासन पूर्ण करू**

आम्ही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पंधराशे रुपयांनी सुरू केली. त्याने सरकारची ताकद वाढली आणि ती लोकांनी वाढवली. आम्ही दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण करू. विरोधकांनी आता सुधारावं, महाराष्ट्राने त्यांना विरोधी पक्षनेता देऊ शकेल एवढेही संख्याबळ दिले नाही. आम्ही बोललो ते बोललो, प्रिंटिंग मिस्टेक झाली असं बोलणारे आमचे सरकार नाही. काँग्रेसने कुठे कुठे हरताळ फासला आणि कुठे कुठे आश्वासन दिले हे आधी बघा. विरोधक हे सगळ्यात मोठे थापाडे आहेत. वीजबिल माफ केलं होतं आणि सरकार आल्यावर लगेच बिल पाठवले. /-.. ४

### उज्जैनप्रमाणे पंढरपूरमध्येही कॉरिडॉर

सोलापूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या उज्जैन काशीविश्वेश्वरच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडॉरला येत्या तीन महिन्यांमध्ये कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतलं. त्यानंतर विभागीय आयुक्त पालकमंत्री, जिल्हाधिकारी, इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांनी तयार केलेला आराखडा पाहिला आणि त्यानंतर त्यांच्या आराखड्याला हिरवा कंदील दाखवलेला आहे. आतापर्यंत कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना मोबदला दिला नाही. त्याच्यापेक्षा जास्त मोबदला पंढरपूरमधल्या कॉरिडॉरबाधितांना देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यासाठी काही व्यावसायिक मालमत्ता, काही घरं ताब्यात घ्यावी लागणार आहेत. त्या लोकांचेसुद्धा योग्य पद्धतीने पुनर्वसन केलं जाईल. त्यांना चांगला मोबदला दिला जाईल. आषाढीपूर्वी काही कामं सुरू होतील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

### अजित पवारांची पाठराखण

अजितदादांनी कर्जमाफीबाबत घेतलेली भूमिका योग्य आहे आणि तीच सरकारची भूमिका आहे. अजितदादांनी कर्जमाफी कधीही शक्य नाही असे वक्तव्य केलं नाही, असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी त्यांची पाठराखण केली.

## राज्याच्या काही भागात आज पावसाची शक्यता

**पुणे :**

सध्या पुणे जिल्ह्यासह अनेक ठिकाणी तापमानाचा पारा वाढत आहे. राज्यभरात उन्हाचा कडाका वाढला आहे. अनेक ठिकाणी ३५ अंशांच्या वरपर्यंत तापमान पोहोचले आहे. दरम्यान, उन्हामुळे अंगाची लाही लाही होत आहे. दरम्यान, उन्हाच्या झळा बसत असतानाच हवामान विभागाने राज्यासाठी एक इशारा दिला आहे. आयएमडीने राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने राज्याला पावसाचा इशारा दिला आहे. मध्य महाराष्ट्र आणि कोकणात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील २४ तासांमध्ये राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस होऊ शकतो, असे हवामान विभागाने म्हटले आहे. राज्यावर सध्या उष्णतेची लाट आणि जोरदार पाऊस असे दुहेरी संकट पाहायला मिळत आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्याला अवकाळी पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## म्यानमार भूकंपातील बळींची संख्या १६००वर

**नवी दिल्ली :**



म्यानमार आणि थायलंडमध्ये शुक्रवारी आलेल्या भूकंपाने मोठा हाहाकार माजवला आहे. शनिवारीही भूकंपाचे झटके जाणवले. शनिवारी दुपारी भूकंपाची तीव्रता ५.१ रिश्टर स्केल इतकी होती. भारताने भूकंपाचा धक्का बसलेल्या म्यानमार आणि थायलंडच्या मदतीसाठी ऑपरेशन ब्रह्माअंतर्गत मेडिकल टीम पाठवली आहे. म्यानमारमध्ये भूकंपामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १६४४ वर पोहोचली आहे.

लेफ्टनंट कर्नल जगनीत गिलच्या नेतृत्वात ११८ सदस्यीय मेडिकल टीम म्यानमारसाठी रवाना झाली आहे. ही टीम एअरबोर्न एंजल्स टास्क फोर्सचा भाग आहे.

शुक्रवारी चीन, म्यानमार, थायलंड आणि भारतात भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. म्यानमारमध्ये पहिला भूकंप १२.५० वाजता आला. याची तीव्रता ७.७ रिश्टर स्केल इतकी होती. या भूकंपाचा केंद्रबिंदू म्यानमारच्या सागाईंग शहराच्या जवळ पृथ्वीच्या १० किमी खोल होता. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हेने सांगितले की, १२ मिनिटांनंतर दुसरा भूकंप आला. याची तीव्रता ६.४ इतकी होती. या भूकंपानंतर म्यानमार आणि थायलंडमध्ये जनजीवन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले.

### भारताचे ऑपरेशन ब्रह्मा

म्यानमारमध्ये आलेल्या विनाशकारी भूकंपामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. भारत सातत्याने बचावकार्य करत आहे. भारताने संवेदना प्रकट करताना शक्य होईल तितके मदतीचे आश्वासन दिले आहे. भारताने ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत स्पेशल मेडिकल टास्क फोर्स बचावकार्यासाठी तैनात केले आहे.

# साध्वी प्रज्ञासिंह आज मालेगावात जाणार

## उच्च न्यायालयाची कार्यक्रमाला परवानगी

**नाशिक : प्रतिनिधी**



मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी साध्वी प्रज्ञा ठाकूर यांच्या उपस्थितीत मालेगावात होणाऱ्या विराट हिंदू संत संमेलनाला अखेर मुंबई उच्च न्यायालयाने सशर्त परवानगी दिली असून, कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही तसेच प्रक्षोभक भाषण न करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहे. त्यामुळे मालेगावच्या यशश्री कंपाउंडमध्ये आज (दि.३०) गुढीपाडव्याला दुपारी १ ते ५ या वेळेत हिंदू संत संमेलन पार पडणार आहे. या संमेलनात साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांना 'हिंदू वीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला अखिल भारतीय संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती, हभप संग्राम बापू भंडारे, हिंदुत्ववादी नेते मिलिंद एकबोटे, जैन धर्मगुरू नीलेशचंद्र महाराज हे देखील उपस्थित राहणार आहे. कायदा-सुव्यवस्थेचे कारण देत पोलीस व महसूल प्रशासनाने परवानगी नाकारली होती. आयोजकांनी त्यास मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अखेर न्यायालयाने परवानगी दिली आहे.

### कार्यक्रमासाठी चार तासांची मर्यादा

न्यायालयाने कार्यक्रमास परवानगी दिली असली तरी काही महत्त्वाच्या अटी घातल्या आहेत. कार्यक्रम केवळ सकाळी ७ ते ५ वाजेपर्यंत घेता येईल. आयोजकांनी पोलिसांना लेखी हमीपत्र द्यावे, ज्यात कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची खात्री असेल. पोलिसांनी कार्यक्रमासाठी स्वतंत्र मार्ग आखावा आणि तो गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये याची दक्षता घ्यावी. नाशिक पोलिसांनी कार्यक्रमाला सुरक्षा पुरवावी, तसेच त्यासाठी आयोजकांकडून खर्च वसूल करायचा का, याचा निर्णय घ्यावा, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# भरधाव आयशर टेम्पोची ट्रेलरला पाठीमागून धडक

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

**सिन्नर : प्रतिनिधी**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर पुढे चालणाऱ्या ट्रेलरला भरधाव वेगात आलेल्या टाटा आयशरने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात टेम्पोतील चालक आणि क्लीनरचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि.२९) पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास घडली.




या अपघातात वाहनातील चालक विजय ललमान यादव (२६), रा. भालुकोणी जप्ती, जि. सिद्धार्थ नगर, उत्तर प्रदेश आणि बदली चालक सनाउल्ला महंमद उमर चौधरी (४६), रा. वसई, ठाणे हे दोघेही जागीच मृत झाले. मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावर चॅनल क्रमांक ५५१.४ वर वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मऱ्हळ शिवारात हा भीषण अपघात झाला. नागपूरकडून मुंबईच्या दिशेने जाणारे अवजड वाहन ट्रेलर क्रमांक (एमएच ४६, एएफ २५४७) हा आपल्या नियमित गतीने समृद्धी महामार्गावरून धावत होता. शनिवारी पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या टाटा आयशर टेम्पो क्रमांक (एमएच ०४, केयू ५५३४) ने ट्रेलरला भरधाव वेगात जोराची धडक दिली. टेम्पो ट्रेलरच्या खाली घुसल्याने पुढच्या भागाचा चेंदामेंदा झाला. यात टेम्पोतील चालक आणि /-.. ४

### झोपेच्या डुलकीने अपघात झाल्याचा संशय

आयशर टेम्पोच्या चालकाला समृद्धी महामार्गावरून जाताना वेगाचा अंदाज आला नाही. त्यातच पहाटेची वेळ असल्याने डुलकी लागल्यामुळे हा अपघात झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

# नाशिक उपकेंद्राच्या नामकरणाचा वाद महायुतीतच

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक अशा तीन जिल्ह्यांत आहे. शैक्षणिक कामांसाठी नाशिकहून पुण्याला जाणे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यासाठी वेळखाऊ आणि खर्चिक असते. विद्यापीठात गेले तर लगेच काम होण्याची शक्यता नसल्याने विद्यार्थी आणि प्राध्यापकांवर हेलपाटे मारण्याची वेळ येते. याचा विचार करता नाशिकमध्ये विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे, यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न होत होते. मंत्री असताना छगन भुजबळ यांनी उपकेंद्रासाठी नेटाने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले. दिंडोरी तालुक्यातील मौजे शिवनई येथे उपकेंद्र ६३ एकर जागेत उपकेंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. आवश्यक असलेल्या शासनाच्या सर्व परवानग्या मिळाल्या. दिनांक १७ जून २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या हस्ते उपकेंद्राच्या इमारतीचा भूमिपूजन समारंभ पार पडला. उपकेंद्र सुरू होण्यास अजून वेळ असला, तरी त्याच्या नामकरणावरून वाद निर्माण झाला आहे. हा वाद राज्यातील सत्ताधारी महायुतीतच आहे. भाजपा आणि शिवसेना एका बाजूला, तर राष्ट्रवादी काँग्रेस दुसऱ्या बाजूला, असा हा स्थानिक वाद असला, तरी तो आता राज्यस्तरावर गेला आहे.

**सावरकर यांच्या नावाचा फलक**

नाशिक उपकेंद्राला कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे नाव देण्याचा ठराव विद्यापीठाच्या अधिसभेत मंजूर झाला. तो निर्णयासाठी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडे पाठविण्यात आला आहे. याचा अर्थ उपकेंद्राला भाऊसाहेब हिरे यांचे नाव देण्याचे अद्याप निश्चित झालेले नाही. पण, त्यांचेच नाव दिले जाईल, असे गृहीत धरून भाजपा, शिवसेना आणि या पक्षांशी संलग्न असलेल्या विद्यार्थी संघटनांनी विरोध करून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव देण्याची मागणी केली आहे.

गांवकरी सण्डे अँकर

शिवसेनेशी संलग्न युवा सेना आणि काही संघटनांनी उपकेंद्राच्या परिसरात जाऊन सावरकर यांच्या नावाचा फलकही लावला. सावरकर यांच्या नावाची मागणी करणारे राज्यातील सत्ताधारी पक्षांचे आहेत. दुसरीकडे भाऊसाहेब हिरे यांच्या नावाचे समर्थन करणारे डॉ. अपूर्व हिरे हेही सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच आहेत. नामकरणाचा वाद महायुतीतच रंगत चालला आहे. यावर मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनाच तोडगा काढावा लागणार आहे.

**कोणाचेच नाव नको**

वास्तविक पाहता कोणत्याही विद्यापीठाच्या उपकेंद्राला एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय नेत्याचे नाव दिले जात नाही. पण विद्यापीठाच्या अधिसभेत नाशिक उपकेंद्रास भाऊसाहेब हिरे यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. अपूर्व हिरे यांच्या प्रयत्नांतून हा निर्णय झाला असल्याचे दिसून येत आहे. नामकरणावरून वाद सुरू असताना उपकेंद्राचा पाठपुरावा करणाऱ्या छगन भुजबळांनी दोन्ही नावांना विरोध करून कोणाचेच नाव न घेता 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उपकेंद्र, नाशिक' असे नाव देण्याचे सुचविले आहे. उपकेंद्राला नाव दिले जात नाही, असेही भुजबळ यांनी निदर्शनास आणून दिले आहे. सावित्रीबाई फुले यांच्या नावाला कोणतेही नाव जोडले जाऊ नये, असे भुजबळ यांना वाटत असावे, असे भुजबळ यांना वाटत असावे. भारतीय व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशनने कोणाचेही नाव देण्यास विरोध केला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, हेच नाव नाशिक उपकेंद्र, या नावाचा /-.. ४



### नामांतराचा तिढा

सावरकरांच्या नावाची मागणी आणि भाऊसाहेब हिरे यांच्या नावाला होत असलेला विरोध पाहता सरकारसमोर आणखी एका नामांतराचा तिढा उभा राहिला आहे. औरंगाबाद येथील मराठा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा २० वर्षे सुरू होता. अखेर १९९४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची मागणीही तितकीच जुनी होती. या मागणीचा विचार करून ३ जानेवारी २०२० रोजी पुणे विद्यापीठाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे नामकरण करण्यात आले. हाही एक नामविस्तारच होता.

## महत्त्वाचे

### आयपीएस डॉ. पठारे यांचे निधन

**मुंबई :** आयपीएस सुधाकर पठारे यांचे अपघाती निधन झाले. तेलंगणातील श्रीशैलम येथून ते नागरकुरलूनकडे जात असताना त्यांच्या कारचा अपघात झाला आणि त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. सुधाकर पठारे हे ज्या गाडीतून प्रवास करत होते, त्या गाडीची ट्रकसोबत धडक झाली. सुधाकर पठारे हे २०११ बॅचचे आयपीएस अधिकारी होते. सुधाकर पठारे सध्या मुंबई पोलिसमध्ये पोर्ट झोनचे डीसीपी म्हणून कार्यरत होते. सुधाकर पठारे हे ट्रेनिंगसाठी हैदराबादमध्ये गेले होते. त्या ठिकाणी त्यांच्या एका नातेवाइकासह ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जात असता हा अपघात झाला. या अपघातात सुधाकर पठारे यांच्यासोबत त्यांच्या नातेवाइकाचाही मृत्यू झाला.

### हवाई दलाच्या अभियंत्याची हत्या

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे भारतीय हवाई दलाच्या अभियंत्याची हत्या करण्यात आली. ही घटना प्रयागराजच्या एअर फोर्स स्टेशनमधील इंजिनिर्स कॉलनीत घडली. भारतीय हवाई दलाचे सिव्हिल इंजिनिअर (अभियंता) एस. एन. मिश्रा (५१) त्यांच्या इंजिनिअर्स कॉलनीतल खोलीत झोपले होते, त्यावेळी अज्ञात व्यक्तीने खोलीच्या खिडकीतून गोळी झाडली. ही गोळी थेट छातीत लागल्यामुळे एस. एन. मिश्रा गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करुन त्यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले.

### दिल्लीत फ्लॅटमध्ये महिलेचा मृतदेह

**नवी दिल्ली :** देशभरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याची माहिती समोर येत आहे. गोळीबार, जाळपोळ, हाणामारी, खून, दरोडा अशा अनेक घटना घडतात. आता दिल्लीत देखील एक धक्कादायक घटना घडली आहे. दिल्लीमधील विवेक विहार परिसरातील एका फ्लॅटमध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. एका फ्लॅटमधून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असल्याचा एक फोन पोलिसांना आला होता. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता एका महिलेचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून बेड बॉक्समध्ये ठेवण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणात एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती सांगण्यात येत आहे.

### राज्यपाल बागडे अपघातातून बचावले

**मुंबई :** राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. ते हेलिकॉप्टर अपघातमधून थोडक्यात बचावले आहेत. ही घटना राजस्थानमधील पाली येथे घडली आहे. शिवाय, या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. राज्यपाल बागडे ज्या हेलिकॉप्टरमधून प्रवासाला निघाले होते, त्या हेलिकॉप्टरने उड्डाण घेताच त्यातून धूर निघू लागला. ही बाब लक्षात येताच हेलिकॉप्टर तत्काळ खाली उतरवले गेले आणि सुदैवाने मोठा अनर्थ टळला. मात्र, या घटनेमुळे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या सुरक्षेतील मोठी चूक आढळून आल्याचे बोलले जात आहे.

## महत्त्वाचे

### विंचूरला रामनवमीनिमित्त रामकथेचे आयोजन



**विंचूर** : श्रीराम नवमीनिमित्त श्रीराम मंदिर ट्रस्ट व विंचूर ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील श्रीराम मंदिरात रामायणाचार्य ह.भ.प. समाधान महाराज पगार (आळंदी देवाची) यांच्या रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक १ एप्रिल ते रविवार दिनांक ६ एप्रिल या कालावधीत दुपारी चार ते सायंकाळी सहा या वेळेत रामकथा संपन्न होणार आहे. तसेच रामनवमीनिमित्त रविवार दि.६ एप्रिल रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत ह.भ.प. बापू गुरू जोशी विंचूर यांचे कीर्तन होईल. तर सोमवार दिनांक ७ एप्रिल रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत ह.भ.प. माणिक महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन होईल. दरम्यान, या धार्मिक सोहळ्यास राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी या कथा श्रवणाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विंचूर राम मंदिर ट्रस्ट पदाधिकारी तसेच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### लासलगाव येथे हिंगलाज माता प्रकट दिन



**लासलगाव** : लासलगाव येथे भावसार व क्षत्रिय समाजाच्या वतीने हिंगलाज माता प्रकट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सालाबादप्रमाणे याही वर्षी पारंपरिक पद्धतीने हा उत्सव साजरा करताना हिंगलाज माता व रेणुकामातेच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महिलांनी मनोभावे पूजा करून पारंपरिक नृत्य भावसार समाजाच्या महिलांनी सादर केले. यावेळी उपस्थित भावसार समाज व पंचक्रोशीतील भाविक यांच्या हजेरीत देवीला चणे व डाळ बाटीचा नैवेद्य देऊन क्षत्रिय भावसार समाजाचे अध्यक्ष अमित भावसार यांच्या हस्ते सपत्नीक महाआरती करण्यात आली. समाजाच्या नवनिर्वाचित ट्रस्टीने कार्यक्रमाचे नियोजन अतिशय सुंदर असे केले होते. मागील वर्षीपर्यंत हा उत्सव फक्त लासलगाव भावसार समाजापुरता मर्यादित होता. यावर्षी पहिल्यांदाच पंचक्रोशीतील मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले होते. महाआरती झाल्यानंतर पंचक्रोशीतील उपस्थितांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. समाजातील तरुण पिढीने यावेळी मोलाचे सहकार्य केले. लासलगाव भावसार समाजातील ज्येष्ठांनी नवनिर्वाचित कमिटीने केलेल्या या कार्याचे भरभरून कौतुक केले.

### जैन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**मंगरूळ** : श्री नेमिनाथ जैन विद्यालयच्या एनसीसीचे विद्यार्थी प्रतीक्षा बोरगुडे व आविष्कार ठाकरे यांना मुख्यमंत्री शिष्यवृत्ती प्राप्त झाल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य शिवदास शिंदे यांनी दिली. सात महाराष्ट्र बटालियन नाशिकचे कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल किरौला, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल गौर, वरिष्ठ लिपिक सानप बाबूजी, धात्रक बाबूजी मंडलिक बाबूजी, भाग्येश धर्माधिकारी तसेच विद्यालयाचे उपप्राचार्य देवेंद्रराज जैन, पर्यवेक्षक रामचंद्र पाटील, एनसीसी ऑफिसर राजेश चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रकमेचा धनादेश पालकांना सुपूर्द करण्यात आला. विद्यालयाच्या या यशाबद्दल विश्वस्त समितीचे अध्यक्ष बेबीलाल संचेती, उपाध्यक्ष दिनेश लोढा, प्रबंध समितीचे अध्यक्ष अजित सुराणा, उपाध्यक्ष अरविंद भन्साळी, मानद सचिव जवाहरलाल आबड, विद्यालयाचे समन्वयक शांतीलाल अलिझाड, महावीर पारख, झुंबरलाल भंडारी, महेंद्र पारख यांनी विद्यार्थ्यांचे आणि विद्यालयाचे अभिनंदन केले.

### विद्यार्थ्यांना अवकाश अभ्यासाची संधी



**पिंपळगाव बसवंत** : कारसूळ (ता. निफाड) येथील आय.एस.ओ. आणि युनेस्को सदस्यत्व मानांकनप्राप्त पीएमश्री जिल्हा परिषद डिजिटल सेमी इंग्लिश प्राथमिक शाळेला अँस्ट्रोनॉमी (खगोलशास्त्र) लॅब मंजूर झाली आहे. या प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना अवकाश विज्ञानाचा अभ्यास करता येणार असून, त्यांना प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे खगोलशास्त्र समजून घेता येणार आहे. या प्रयोगशाळेतून विद्यार्थी ग्रह, तारे, उपग्रह, सौरमाला आणि आकाशगंगेचे निरीक्षण करू शकतील. दुर्बिणीच्या सहाय्याने आकाश निरीक्षण करता येईल, तसेच खगोलशास्त्रातील संकल्पना आणि त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे प्रत्यक्ष पाहता येतील. पालक आणि ग्रामस्थांनीही या प्रयोगशाळेच्या मंजुरीचे स्वागत केले आहे. ''गावातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी ही प्रयोगशाळा महत्त्वाची आहे,'' असे पालकांनी सांगितले. या प्रयोगशाळेच्या मंजुरीसाठी आणि कार्यान्वयनासाठी स्थानिक प्रशासनाने प्रयत्न केले. अध्यक्ष सचिन वाघचौरे, उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य देवेंद्र काजळे, सदस्य भाऊसाहेब उगले, योगेश गांगुर्डे, गोविंद ताकाटे, नंदीप गाडे, सविता जाधव, विमल पवार, मीनाक्षी गोरे, वैशाली कंक, अंजली जाधव, खंडेराव शंखपाळ, सरपंच स्वाती काजळे, उपसरपंच शामराव शंखपाळ, आशा ताकाटे, उज्ज्वला गांगुर्डे, मनीषा काजळे, पूनम पगार, अमोल ताकाटे, भाऊसाहेब कंक, ग्रामपंचायत अधिकारी कविता कदम, मुख्याध्यापक सुनीता वाघ, उपशिक्षक राजाभाऊ कदम, रवींद्र सोसे, संतोष निरभवणे, रोहिदास तळले, भाग्यश्री खैरनार, जिजा वसाळ, प्रिती चौधरी यांनी विशेष योगदान दिले आहे.

### बौद्ध महासभेच्या येवला तालुकाध्यक्षपदी गरुड



**येवला** : भारतीय बौद्ध महासभेच्या येवला तालुकाध्यक्षपदी दीपक गरुड यांची निवड करण्यात आली. शहरातील मुक्तिभूमी येथील विपश्यना हॉल येथे निवड सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी नाशिक जिल्हा पश्चिमचे बौद्ध महासभेचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव होते तर प्रमुख अतिथी म्हणून बौद्ध महासभेचे सरचिटणीस शरद भोगे, कृष्णा सोनवणे, रत्नाकर साळवे, मनोज मोरे, रवींद्र सोनवणे आदी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेची पुढील कार्यकारिणी याप्रमाणे - तालुका सरचिटणीसपदी रामभाऊ केदारे, कोशाध्यक्षपदी प्रवीण खळे, उपाध्यक्ष संस्कारपदी भाऊसाहेब झाल्टे, उपाध्यक्ष प्रचार पर्यटनपदी अमोल पगारे, संरक्षण उपाध्यक्ष श्रावण गरुड, सहसचिव अमोल सोनवणे आदींची निवड करण्यात आली असून, याप्रसंगी रवींद्र संसारे, भीमराव वाघ, अमोल गायकवाड, रोहित गायकवाड, अरुण घोडेराव, विजय गायकवाड, भिकचंद पगारे, बाळासाहेब पगारे, कैलास गरुड, विजय गरुड, दिलीप जाधव, नवनाथ अहिरे, बाळू अहिरे यांची निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेसाठी जिल्हा तालुका यांचे आजी-माजी सर्व पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक, श्रामनेर श्रद्धा शीलवान, बौद्ध उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# युवासेनेच्या सीईटी परीक्षा अभियानास प्रतिसाद

## हजार विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

**नाशिक : प्रतिनिधी**

**युवासेनेच्या वतीने जिल्ह्यात अकरावी, बारावी व पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सीईटी महासराव परीक्षा शनिवारी (दि.२९) घेण्यात आली. या अभियानात ९२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. देवळाली, सिन्नर व इगतपुरी या तीन तालुक्यांमध्ये सदर परीक्षेचे आयोजन करण्यात आले.**

शिवसेना नेते तथा युवासेनाप्रमुख आ. आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात व युवासेना सचिव आ. वरुण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक जिल्ह्यात अकरावी, बारावी व पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सहाव्यांदा मोफत सीईटी परीक्षेचे (महासराव) अभियान राबवण्यात आले. युवासेना जिल्हाप्रमुख राहुल ताजनपुरे यांच्या नियोजनाने सदर सराव परीक्षा घेण्यात आली. हा सराव पेपर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच वेळी आयोजित करण्यात आला होता. याकरिता जिल्ह्यातील देवळाली, सिन्नर व इगतपुरी या तीन तालुक्यांत ६ सेंटर देण्यात आले होते. त्यात देवळालीत ४३८, सिन्नर ३७८, इगतपुरी १२० असे एकूण ९२६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून परीक्षा यशस्वी पूर्ण केली. देवळाली विधानसभा : टाकेकर शिक्षा संकुलचे प्राध्यापक तिवारी, टाकेकर, अजिंक्य ढिकले, ऋषिकेश धनवटे, देवळाली : एस. के. पांडे महाविद्यालयाचे प्राध्यापक निळे सर, आकाश निकम, शुभम शेलार, श्री गुरुजी अकॅडमी संचालक केशव फड, करण मेद्रे, अमोल ताजनपुरे, सिन्नरमध्ये श्री मातोश्री क्लासचे संचालक प्रवीण गडाख, बबन पुमणार, शंकर पवार, तसेच वाघचौरे मॅडम, लोंढे, बनसोने, संकल्प शिक्षण फाउंडेशन संचालक रायते, लोखंडे, विजय कटके, इगतपुरी : म. गांधी विद्यालयाचे प्राध्यापक हेमंत जोशी, युवासेना विक्रम गोवर्धने आदींनी योग्य नियोजन केले. यावेळी जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख केशव पोरजे, राजेंद्र कन्नू ताजणे, किरण डहाळे, विधानसभा प्रमुख योगेश भोर, पिराजी पवार, तालुकाप्रमुख दीपक गायधनी, ज्ञानेश्वर गाडे, कैलास ढिकले, शेखर पवार, किरण धनगर, संदीप वाकचौरे, प्रसाद पाटील, प्रफुल साळुंके उपस्थित होते.



**विद्यार्थी हिताचे उपक्रम राबवत राहणार**

सहा वर्षांपासून आम्ही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता मोफत सीईटी परीक्षा अभियान घेत आहोत. युवासेनाप्रमुख आ. आदित्य ठाकरे व सचिव वरुण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी शिबिर घेतले असून, त्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवासेनेकडून असेच विद्यार्थी हिताचे उपक्रम भविष्यात घेतले जातील.

– **राहुल ताजनपुरे**, जिल्हाप्रमुख, युवासेना, नाशिक

**विद्यार्थ्यांसाठी फायद्याचे**

युवासेनेकडून आयोजित केलेल्या महासराव सीईटी परीक्षा विद्यार्थ्यांसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. या माध्यमातून परीक्षेचे स्वरूप समजते. विद्यार्थ्यांकरिता अशा प्रकारे उपक्रम सतत राबवणे गरजेचे आहे.

**–शिवाजी साबळे,**
अभियांत्रिकी, सिन्नर



## नांदगावात मुस्लिम बांधवांसाठी दावत इफ्तार पार्टीचे आयोजन

**नांदगाव : प्रतिनिधी**

नांदगाव शहरात राजर्षी छत्रपती शाहू महाराज सोशल ग्रुपच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी २७ व्या दावत इफ्तार पार्टीचे रोजा (उपवास) निमित्त आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो मुस्लिम बांधवांनी छत्रपती शाहू महाराज ग्रुपच्या सदस्य तसेच हिंदू बंधूंसोबत एकाच प्लेटमध्ये सर्वांनी सोबत ६.४५ वा. रोजा सोडला होता.

याबाबत अधिक माहिती अशी की, एकता, भाईचारा कायमच टिकून राहावा. सर्वांनी आपले सण आनंदाने एकत्रित मिळून साजरे करावे. सर्व धर्मसमभाव या विचारांनी एकत्रित राहावा, असा सुंदर संदेश आज नांदगाव शहरात सर्वांनाच बघावयास मिळाल्याचे अतिशय कौटुंबिक नातं, आनंदमय वातावरणात दिसून आले. होते.

यावेळी नांदगाव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष अधिकारी पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी, मा. नगराध्यक्ष अरुण पाटील, मा. उपनगराध्यक्ष नितीन जाधव, नगरसेवक याकूब शेख यांनी सर्वप्रथम परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर पाच वर्षीय चिमुकले सय्यद उम्रन मोहम्मद अली, शेख रोहान हाजी फैसल, झिकरा वसीम शेख, अशमीरा सोहेल रंगरेज, हमझेन शकील शेख, अबूजर जफर शेख या सर्वांचे कौतुक करत त्यांचा गुलाब पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला होता. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे या दावत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

## लासलगाव येथे अंबिकानगर उद्यानाचे लोकार्पण

**लासलगाव : वार्ताहर**

आज दि. ३० मार्च २०२५ रविवार रोजी ग्रामपंचायत लासलगाव येथील प्रभाग क्र.२ मधील अंबिकानगरमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या अंगणवाडी व उद्यानाचा लोकार्पण सोहळा माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी आसिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.



सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक अंतर्गत अंबिकानगर लासलगाव येथे ओपनस्पेस सुशोभीकरण करणे, जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत लासलगाव येथील प्रभाग क्रमांक २ मधील अंबिकानगर येथे उभारण्यात आलेल्या नूतन अंगणवाडी इमारतीचा लोकार्पण सोहळा गुढीपाडवा, दि. ३० मार्च २०२५ रोजी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते, आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे.

सदरच्या ओपनस्पेसमध्ये अंगणवाडी इमारत, लहान मुलांना खेळण्यासाठी प्ले ग्राऊंडमध्ये झोके, सि-सॉ, ऑपस्टिकल व इतर खेळण्या बसविण्यात आलेल्या असून, ज्येष्ठ नागरिकांसाठी ग्रीन जिम व सांस्कृतिक व लहान मुलांचे जन्मदिवस व इतर छोटेखानी कार्यक्रम करण्यासाठी स्टेजची उभारणी करण्यात आलेली आहे. तसेच लासलगाव ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा ५.० मध्ये सहभाग घेतलेला असल्याने सदरच्या ओपनस्पेसमध्ये १७० मोठे आणि छोटे १५०० झाडांची लागवड करण्यात आलेली आहे. तसेच तेथील हेरिटेज वृक्षांना पार बांधून आकर्षक रंगाने रंगविण्यात आलेले आहे. तसेच सदरच्या ओपन स्पेसच्या बाहेरील बाजूने जॉगिंग ट्रॅकदेखील बनविण्यात आलेला आहे.

## मनमाडला घंटागाडीचालकांची मनमानी?

### कचरा संकलन करण्यास टाळाटाळ; कारवाईची नागरिकांची मागणी

**मनमाड : प्रतिनिधी**

वार्षिक लाखो रुपये खर्च करून मनमाड शहराला कचरामुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू असताना कचरामुक्त करण्यासाठी जी यंत्रणा काम करते तीच यंत्रणा कामचुकारपणा करत असेल तर मनमाड शहर कचरामुक्त होईल तरी कसे, असा सवाल शहरातील प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिकांनी व्यक्त केला आहे.



याबाबत मुख्याधिकारी शेषराव चौधरी यांना निवेदन देऊन आमच्या येथे घंटागाडी येत नाही. गाडी येते ती कचरा घेण्यास नकार देते. घंटागाडीवरील चालक हे दोन दोन-चार चार दिवस येत नाहीत. त्या दिवशी आले त्या दिवशी कचरा घेत नाही. त्यामुळे येथील महिलांनी नाराजी व्यक्त केली असून, याबाबत आपण कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनमाड शहरातील कचरा विघटन करून त्यावर प्रक्रिया करून खतनिर्मिती करण्याचा प्रकल्प नगरपालिकेतर्फे उभारण्यात आला आहे. यासाठी वार्षिक लाखो रुपयांचे टेंडर देऊन ठेकेदाराकडून हा कचरा उचलण्यात येतो, मात्र मनमाड नगरपालिकेत आंधळे दळतंय कुत्रं पीठ खातं अशी परिस्थिती आहे.

याबाबत स्थानिक समाजसेवक पापाभाई थॉमस, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय भालेराव तसेच महिला आघाडी यांच्या वतीने पालिकेचे मुख्याधिकारी शेषराव चौधरी यांना निवेदन देऊन याबाबत कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनावर कमल खरात (रिपाइं), कैलास पगारे (स्वारिप उपशहरप्रमुख) आदींसह नागरिकांच्या सह्या आहेत.



## महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या

### आझाद समाज पार्टीचे तहसीलदारांना निवेदन

**येवला : प्रतिनिधी**

बिहार राज्यातील बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांचे जागतिक महत्त्वाचे स्थळ असून, हे महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, या मागणीचे निवेदन आजाद समाज पार्टीच्या वतीने येवल्यात तहसीलदार आबा महाजन यांना देण्यात आले. पक्षाचे युवा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अमोल आहेर यांनी तहसीलदार आबा महाजन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

सदर निवेदनात म्हटले आहे की, तथागत भगवान गौतम बुद्ध यांना याच ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली असल्याने बुद्धगया हे स्थळ बौद्ध समाजाच्या अस्मितेचे प्रतीक आहे. आझाद समाज पार्टीच्या वतीने येवला तहसीलदार महाजन यांना निवेदन देण्यात आले. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, अन्यथा पक्षाचे खासदार ॲड. चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात मोठे जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला असून, याप्रसंगी पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष अमोल आहेर, सतीश गायकवाड, शकिल तांबोळी, दीपक शेलार, शशिकांत आहेर, शशिकांत जगताप आदी उपस्थित होते.

## महिला हिंसाचार संरक्षण कायदा जनजागृती काळाची गरज : वाघ

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय नाशिक अंतर्गत जिल्ह्यातील तालुका संरक्षण अधिकारी यांनी मविप्र समाजाचे कर्मवीर गणपतदादा मोरे महाविद्यालय निफाड येथे विशाखा समिती अंतर्गत कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा जनजागृती याविषयी कार्यक्रमाचे आयोजन केले.

यात संरक्षण अधिकारी एस. एम. वाघ यांनी महिला आणि फौजदारी कायदे या विषयावरील आपल्या व्याख्यानातून स्त्रियांसाठी असणारे कायदे याविषयी सविस्तर माहिती देताना, घटस्फोटाची संख्या कमी करण्यासाठी शासनाने विवाहपूर्व संवाद ही संकल्पना सुरू केल्याची माहिती सांगितली. विवाहपूर्व संवादातून विवाह इच्छुक मुलगा, मुलगी यांना आपल्या अपेक्षा माहिती असतील तर नंतर वैवाहिक जीवनात वाद निर्माण होणार नाहीत, असा उद्देश या संकल्पनेचा आहे. आपल्या आसपास कुठे बालविवाह होत असल्याचे आढळले तर त्वरित हेल्पलाइन नंबरवर फोन करावा. फोन करणाऱ्याचे नाव हे गुपित ठेवले जाते.





## लासलगाव महाविद्यालयात ग्राहक संरक्षण कायद्यावर व्याख्यान

**लासलगाव : वार्ताहर**

येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कंजूमर अफेअर्स कोर्स अंतर्गत ग्राहक संरक्षण कायद्यावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे तर प्रमुख वक्ते म्हणून दत्ताजी शेळके (नाशिक जिल्हा संघटक ग्राहक पंचायत महाराष्ट्र) तसेच प्रकाश जोशी, डॉ. राजेंद्र बागुल, श्रीमती बागुल, नाना शिरसाठ, वसंतराव दंडवते, अमोल लिंगायत, किरण जोशी आणि कोर्स समन्वयक प्रा. सुनील गायकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. यानंतर वसंतराव दंडवते यांनी ग्राहकगीत सादर केले. डॉ. राजेंद्र बागुल, प्रकाश जोशी, दत्ताजी शेळके यांनी विद्यार्थ्यांना ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर मार्गदर्शन करताना ग्राहकांचे हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या यासोबतच ग्राहक म्हणून फसवणूक झाल्यास तक्रार कशी व कुठे दाखल करावी यासंबंधी माहिती दिली तसेच ऑनलाइन व्यवहारात फसवणूक झाल्यास तक्रार कोठे दाखल करावी तसेच जिल्हा मंच, राज्य आयोग व राष्ट्रीय आयोगाकडे आपली तक्रार दाखल केल्यानंतर आपल्याला दाद कशी मागता येते यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

## शिवाजीनगरला ज्ञानयज्ञाच्या भक्तिरसात श्रोते मंत्रमुग्ध

### गायकर स्मृतिदिनानिमित्त श्रीमद् भागवत कथा

**नाशिक : प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजीनगर येथे पंढरीनाथ त्र्यंबक गायकर व ताराबाई पंढरीनाथ गायकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही मातृ-पितृ पुण्यस्मरण सोहळा व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाला प्रारंभ झाला.**




ह.भ.प. मुक्ताताई सोनवणे मोहाडीकर यांच्या मधुर वाणीतून हभप सोपान महाराज रावळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच हभप शंकर महाराज गोंडे वारीगावकर, हभप आनंद महाराज लोहिया, हभप आकाश महाराज यांच्या साथीने या ज्ञानयज्ञाच्या भक्तिरसात श्रोतावर्ग मंत्रमुग्ध होत आहे. श्रीमद् भागवत कथा हा केवळ ग्रंथ नव्हे, तर संपूर्ण मानवजातीला दिशा देणारे तत्त्वज्ञान आहे. नामस्मरणाने संकटे दूर होतात, तर भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीने जीवन पवित्र होते. सात दिवसांची भागवत कथा जीवनात परमात्मा सुख, समाधान व शांती प्रदान करते.

गायकर कुटुंबीयांनी आपल्या आई-वडिलांच्या पुण्यस्मरणार्थ सलग चौथ्या वर्षी हा सोहळा आयोजित करून समाजाला भक्तिपूर्ण अधिष्ठान दिले आहे. त्यांच्या या प्रयासामुळे अनेक भक्तगण श्रीमद् भागवत कथेचा लाभ घेत आहेत. माता-पित्याच्या स्मरणार्थ अशा पवित्र आयोजनामुळे त्यांच्या जीवनकार्याला खऱ्या अर्थाने अभिवादन केले जात आहे. या भक्तिमय सोहळ्याला छावाचे प्रदेशाध्यक्ष विलास पांगारकर, संस्थापक अध्यक्ष जनस्वराज्य पक्ष सुरेश नाना पवार, माजी नगरसेविका हेमलता कांडेकर, प्रेम दशरथ पाटील, नवनाथ शिंदे, संजय नवले, डॉ. किरण डोखे, दिनकर दादा कांडेकर, निवृत्ती दाजी शिंदे, विष्णुपंत घुगे, ह.भ.प. संपत मामा धोंगडे, छावा क्रांतिवीर सेना आयटी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव दळवी, दत्ता महाराज पवार, ह.भ.प. कणसे बाबा, प्रवीण पाटील - अध्यक्ष, छावा क्रांती सेना उद्योजक आघाडी, पश्चिम उत्तर महाराष्ट्र ज्ञानेश्वर पालखेडे, अमोल देवरे, प्रीतेश पाटील या सर्व मान्यवरांसह असंख्य भक्तगण उपस्थित राहून श्रीमद् भागवत कथेचा लाभ घेत आहेत. या ज्ञानयज्ञासाठी छावाचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर, समाधान गायकर, सविता गायकर, प्रियांका गायकर, सारिका गायकर, कैलास गायकर, अविनाश गायकर आदी परिश्रम घेत आहेत.

## गोवंश मांस वाहतूक प्रकरणी दोघांना अटक; मुद्देमाल जप्त

**चांदवड : वार्ताहर**

मनमाड-मालेगाव रस्त्यावरील कानडगाव पाणपोई फाट्याजवळ वाहनासह बेकायदा गोवंश मांस वाहतूक करणाऱ्या दोघांना चांदवड पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून आठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कानडगाव येथील काही नागरिकांनी २८ मार्च रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास एका गाडीमध्ये मांस असल्याची शंका आल्याने चांदवड पोलिसांना फोन करून माहिती दिली. या माहितीच्या आधारे चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार बी. व्ही. सांगळे यांनी कारवाई करत संबंधित वाहनास थांबवले.

एम.एच. २० जी.सी. ८१३० या पिवळसर रंगाच्या अशोक लेलॅन्ड कंपनीच्या दोन गाडीमधून संशयित शेख मोसीन सलीम कुरेशी आणि मोहम्मद अमरोज अब्दुल अजीज (दोघेही रा. संभाजीनगर) हे अंदाजे दोन हजार किलो गोवंश जनावरांचे मांस वाहून नेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी दोघांना अटक करून त्यांच्याकडून दोन लाख रुपये किमतीचे गोवंश मांस आणि सहा लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण आठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

संशयितांकडे कोणताही परवाना नसताना ही बेकायदेशीर वाहतूक होत असल्याने त्यांच्याविरोधात चांदवड पोलीस स्टेशनमध्ये पीयूष संतोष शिंदे (रा. चांदवड) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित दोघांविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.


हार्दिक अभिनंदन
गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर
नांदगाव / निफाड
तालुक्याला
बहुमान
मा.नामदार
सुहास अण्णा कांदे
यांची भटके विमुक्त जमातीच्या
अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा)
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन..!
सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा!
निफाडचे कार्यसम्राट
मा. आमदार
दिलीपकाका बनकर
यांची अंदाज समिती सदस्यपदी
निवड झाल्याबद्दल
शुभेच्छुक
राजेंद्र सोनवणे
संपर्क प्रमुख, शिवसेना दिंडोरी
लोकसभा मतदार संघ.
आर.एस.आदित्य इन्फ्रा.
डिस्ट्रिब्युटर ऑफ नाशिक, जॉय इ बाईक
आर.एस.आदित्य इन्फ्रा, डिस्ट्रिब्युटर इस्कॉर्ट कुबोटा
आर.एस.ट्रॅक्टर हाऊस,
नाशिक, निफाड, संगमनेर, अकोले
गणपत हाडपे
व्हा. चेअरमन, जयश्री बँक भाऊसाहेब
नगर, ता. निफाड
संचालक, गजानन एंटरप्रायजेस
संचालक, वि.का.सोसायटी, मांजरगाव
मोहन लहाने
अध्यक्ष, पालक शिक्षक संघ,पुरुषोत्तम
इंग्लिश स्कूल व आरंभ महाविद्यालय ना.रोड
ए टू झेड एंटरप्राइजेस, फळे व भाजीपाला
निर्यातदार नाशिक
सागर सांगळे
नंदमुरली एंटरप्रायसेजेस ८३
एम ए पाटील ७९
संदीप बार रेस्टोरेंट ५१/१
सागर बार रेस्टोरेंट लॉजिंग
बँक्वेट हॉल वेब्रिज ८०/१
आक्क्युरेट इव्ही चार्जिंग स्टेशन २५
लहानू सांगळे
एल. ए. पाटील रेसीडेंसी
हॉटेल शिवकृपा
माळेगाव एमआयडीसी

# 'गुढीपाडवा : जि.प. शाळेचा पट वाढवा' उपक्रम



**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने दि. २९ ''गुढीपाडवा - जि.प. शाळेचा पट वाढवा'' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या सूचनेनुसार 'गुढीपाडवा - जि.प. शाळेचा पट वाढवा' उपक्रम शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडला.

या उपक्रमांतर्गत पालकसभा, विद्यार्थी संख्यावाढीबाबत जनजागृती, शाळेतील सुविधा व उपक्रमांची माहिती देण्याचे नियोजन करण्यात आले. पालकांना पटवून देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात येणारे उपक्रम समजावून सांगण्यात आले. विशेषतः आदर्श शाळा संकल्पना, विद्यार्थी पाठ्यपुस्तक व गणवेश योजना, शालेय आरोग्य तपासणी, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी संसाधन कक्ष, राष्ट्रीय आविष्कार अभियान, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा, प्रयोगशाळा व ग्रंथालय सुविधा, स्काऊट-गाइड, तसेच कॉम्प्युटर सायन्स हॅकेथॉन यांसारख्या उपक्रमांविषयी पालकांना शाळा प्रशासनाकडून माहिती देण्यात आली.

दि. २९ जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये पालक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये पालकांनी सहभाग घेतला आणि त्यांच्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश घेण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. शिक्षकांनी घराघरांत जाऊन पालकांशी संवाद साधला व शाळेच्या गुणवत्तेबद्दल माहिती दिली. परिणामी, जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या नव्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज भरले गेले. गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा सण असल्याने, याचे औचित्य साधून हा उपक्रम पार पडला. प्रत्येक शाळेने आपल्या परिसरात गुढी उभारून उत्साहात कार्यक्रम राबवला. शिक्षण क्षेत्रातील हा अभिनव उपक्रम जिल्ह्यात सकारात्मक बदल घडवून आणणारा ठरला आहे, अशी माहिती शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ. नितीन बच्छाव यांनी दिली.

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धांचा समारोप

## खेळ मांडियेला प्रथम, दानव द्वितीय, ट्विस्टर तृतीय

**नाशिक : प्रतिनिधी**

२४ मार्च ते २८ मार्चदरम्यान कालिदास कलामंदिर येथे महानिर्मिती कंपनीच्या आंतर विद्युत केंद्राच्या नाट्य स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेत नाशिक, चंद्रपूर, पारस, कोराडी, खापरखेडा, भुसावळ, कोयना विद्युत केंद्र आणि सांघिक कार्यालय मुंबई अशा आठ केंद्रांनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी मंचावर अध्यक्ष म्हणून महानिर्मितीचे संचालक (संचलन) संजय मारुडकर, प्रमुख अतिथी म्हणून महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजुरकर तसेच नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता राजेश मोराळे, उपमुख्य अभियंता राजेश चव्हाण, प्रशांत लोटके, रंगभूमी कलाकार संदीप पाठक, परीक्षक वैशाली दाभाडे, संजय आर्विकर, डॉ. मंगेश बनसोड उपस्थित असून, यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक हा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या खेळ मांडियेला, द्वितीय क्रमांक भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राच्या दानव या नाटकाला तर चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ट्विस्टर या नाटकाला तिसरा क्रमांक मिळाला. सिनेकलाकार संदीप पाठक यांच्या वऱ्हाड निघालंय लंडनला या एकपात्री नाटक सादरीकरणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमाप्रसंगी सर्व औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज सनेर यांनी केले व आभार मानले.




पान १ वरून

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून जुंपली!

देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि मी मिळून या राज्याला देशात एक नंबर वर केले. राज्याला अजून मजबूत करू. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजपर्यंत ३५ करोड लोकांना दारिद्र्यरेषेच्या वरती घेतले. ८० करोड जनतेला मोफत राशन देतात. लखपती दीदी आणि ड्रोन दीदी योजनेअंतर्गत सुविधा दिल्या जातात. यात फक्त हिंदू नाही तर मुसलमान महिलाही आहे. आमच्या सरकारच्या सगळ्या योजना सर्व धर्मीयांना मिळते. त्यामुळे त्यांना दुःख होते, असंही शिंदे म्हणालेत.

## टेम्पोची ट्रेलरला पाठीमागून धडक

अन्य एक जण असे दोघेही पूर्णता दाबले गेले. गंभीर जखमी झाल्याने या दोघांचाही जागीच मृत्यू झाला. समृद्धी महामार्गावरील गस्ती पथकाला या संदर्भात माहिती होताच डॉ. भूषण पवार हे रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी दाखल झाले. त्याचबरोबर समृद्धी महामार्गावरील सहाय्यक उपनिरीक्षक महात्मे, हेडकॉन्स्टेबल प्रवीण गुंजाळ, वावी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक इंगळे, महाराष्ट्र सुरक्षा पथकातील आकाश सानप, हेमाडे यांनी घटनास्थळी जात मदत कार्य राबवले. दोन्हीही मृतांना अपघात ग्रस्त टेम्पोतून बाहेर काढून सिन्नर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. या संदर्भात वावी पोलिसात अपघाताचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रमोद सरोवर करत आहे.

# नाशिक उपकेंद्राच्या नामकरणाचा वाद महायुतीतच

**पान १ वरून**

आग्रह त्यांनी धरला आहे.

**डॉ. हिरेंचा तोडग्याचा प्रयत्न**

भाऊसाहेब हिरे यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार असल्याचे डॉ. अपूर्व हिरे यांनी म्हटले आहे. डॉ. अपूर्व हिरे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सावकरांना उच्चस्थानी ठेवले आहे. सावरकर हे राष्ट्रीय नेते असल्याने त्यांचे नाव आरोग्य विज्ञान विद्यापीठास देण्याची सूचना डॉ. हिरे यांनी केली आहे. कर्मवीर भाऊसाहेब हिरे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची तुलना करणे बरोबर नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर हे राष्ट्रीय स्तरावरचे नेते आहेत. त्यांचे महत्त्व खूप मोठे आहे. त्यामुळे एका उपकेंद्राला त्यांचे नाव देणे बरोबर होणार नाही. त्याऐवजी नाशिकलाच असलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव द्यावे. ते योग्य होईल, असा युक्तिवाद डॉ. हिरे यांनी केला आहे. नाशिक उपकेंद्राचे नाव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हेच राहणार असून फक्त उपकेंद्राला भाऊसाहेब हिरे परिसर असे म्हटले जाणार आहे, असाही खुलासा करुन वादावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला आहे.

# दागिन्यांच्या खरेदीवर ज्युपिटर बाइक जिंकण्याची संधी!

**नाशिक :** गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर चंदुकाका सराफमध्ये दागिने खरेदी करणे तुम्हाला लाभदायक ठरणार आहे. येत्या ३० मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर रु. ३० हजार व पुढील दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना १ ज्युपिटर बाइक प्रति स्टोअरमध्ये जिंकण्याची संधी मिळणार आहे.

चंदुकाका सराफ SINCE 1827 बारामतीची सुवर्णपेढी

ही ऑफर्स केवळ गुढीपाडव्याच्या दिवशी म्हणजेच ३० मार्च रोजीच लागू राहणार आहे. तसेच शुभमुहूर्ताच्या खरेदीसाठी सोन्याच्या दरामध्ये देखील खास सूट देण्यात आली आहे. सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीवर ग्राहकांना किमान रुपये १०१ प्रति ग्रॅम सूट मिळणार आहे. तसेच रु. ७ लाख व पुढील सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीवर रु. १५१ प्रति ग्रॅम सूट देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १००% पर्यंत सूट देण्यात येणार आहे. चंदुकाका सराफ यांच्या सर्व स्टोअर्समध्ये हे लाभ ग्राहकांना घेता येतील. विवाह समारंभासाठी खास 'विवाह तस्मै' हे नवीन वेडिंग ज्वेलरी कलेक्शनदेखील सर्व स्टोअर्समध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

शुभमुहूर्तावर दागिने खरेदीसाठी आणि बाइक जिंकण्यासाठी आपल्या जवळच्या चंदुकाका सराफ स्टोअरला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन चंदुकाका सराफचे चेअरमन किशोरकुमार शहा व संचालक सम्यक किशोरकुमार शहा यांच्यातर्फे करण्यात आले आहे. ऑफर मर्यादित कालावधीसाठी, नियम व अटी लागू. अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक : १८०० २६७ ८५५५.




# घर अंगण संस्थेचा वर्धापन दिन साजरा

**नाशिक :** घर अंगण संस्थेचा वर्धापन दिन साजरा झाला. पुष्पलता ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिकांचे किंवा त्यांचं घरात असणं किती महत्त्वाचं आहे. ते घरात असतील तर आपल्या मुलांना आजी-बाबांचं प्रेम मिळते. त्यांचा ही वेळ जातो हेच 'ती'च रामायण या नाटकातून पटवून देण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाला विशेष पाहुणे अंजली नारायणे, संदेश नारायणे, राजेंद्र आव्हाड उपस्थित होते. घर अंगण संस्थेच्या संस्थापक आशा भोईर यांनी नाटकाचे लेखन केले. सचिव अनिता पाटील यांची संकल्पना होती. आलेल्या पाहुण्यांचे संस्थेनी टाकाऊ वस्तूपासून सुंदर टिकाऊ वस्तू म्हणजे घराची प्रतिकृती भेट म्हणून दिली. कलाकार पुष्पलता ठाकूर, अरुणा सोनावणे, जया अघाव, नलिनी शार्दूल, अनिता पाटील, ऋतुजा आव्हाड, उषा सूर्यवंशी, आशा भोईर, पूनम भोईर, बालकलाकार, विवान डोंगरे, आरध्य आव्हाड, आदिरा आव्हाड, अंगद रोकडे यांनी कार्यक्रमाला शोभा आणली.

## जाहीर नोटीस (दस्त गहाळ झालेबाबत)

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन -** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका सिन्नर पैकी सिन्नर नगरपालिका हद्दीतील व **कसबे सिन्नर** शिवारातील मिळकत **स.नं. ८५५/१ते३/६**(जुना स.नं. ११४४) मधील बिनशेती **प्लॉट नं. १६ यांसी क्षेत्र १८७.०० चौ.मी.** यांसी आकार रू. ६७-०० पैसे. यांसी चतु:सिमा - मंजुर ले-आऊटप्रमाणे

सदर मिळकत **श्री. अजय राधु निकम** यांनी **सौ. उज्वला रविंद्र लोखंडे** यांचेपासुन मे. दु.नि.सो. सिन्नर यांचे समक्ष हजर राहुन **दस्त क्र. ११३४/२००९, दि. ०६/०३/२००९** अन्वये **कायमचे खरेदीखत** चा दस्त लिहून घेतलेला होता. त्यानंतर सदरची मिळकत ही **श्री. प्रविण शिवाजी खताळे व श्री. कैलास गणपत खताळे** यांनी खरेदी घेतलेली आहे. खरेदीखतावेळी **श्री. अजय राधु निकम** यांनी सदर मुळ दस्त हा **श्री. प्रविण शिवाजी खताळे** यांना दिलेला होता. परंतु सदरचा **कायमचे खरेदीखत दस्त क्र. ११३४/२००९** हा मुळ दस्त **श्री. प्रविण शिवाजी खताळे** यांचेपासुन सिन्नर बस स्थानक परिसरात गहाळ झालेला आहे. व शोध घेतला असता सापडुन आलेले नाही. सदर **कायमचे खरेदीखत दस्त क्र. ११३४/२००९** चा **श्री. प्रविण शिवाजी खताळे व श्री. कैलास गणपत खताळे** यांनी कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीरपणे सांगितले आहे. मुळ दस्त व नोंदणी पावती कुणास आढळुन आल्यास त्यांनी खालील पत्त्यावर **३(तीन)** दिवसांच्या आत संपर्क साधावा. कळावे. ही जाहीर नोटीस.

सिन्नर, दि. १६/०१/२०२५. **आमचे मार्फत प्रसिध्द**

श्री. चेतन केशव सोनवणे (ॲडव्होकेट)
रा. धोंडविरनगर, ता. सिन्नर, जि. नाशिक. मो.नं. ८९७५९४९४९०

# गडाख टीचर्स सोसायटीची नेत्रदीपक प्रगती

## संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त संस्थापक अध्यक्ष मोगल यांचे प्रतिपादन

**सिन्नर : प्रतिनिधी**

अवघ्या १५४ रुपयांत सुरू केलेल्या श्रीसूर्यभानजी गडाख सेकंडरी टीचर्स सोसायटीने ४३ वर्षांत मोठी झेप घेतली आहे. सोसायटी ८४ लाख रुपयांहून अधिक झालेल्या नफ्याच्या प्रमाणात सभासदांना त्यांच्या ठेवींवर २९ लाख रुपयांपेक्षा अधिक व्याज वाटप करत आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे गौरवोद्गार या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दौलतराव मोगल यांनी काढले.



सिन्नर तालुक्यातील देवपूर येथील श्री. सुर्यभानजी गडाख सेकंडरी टीचर्स सोसायटीच्या ४३ व्या वर्धापनदिनानिमित्त अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रुपेश कुऱ्हाडे, उपाध्यक्ष शुभांगी मोगल, कार्यवाह नानासाहेब खुळे, ज्येष्ठ संचालक एकनाथ खैरनार, एस. एल. चौधरी, बाबासाहेब डुंबरे, राजेंद्र गडाख, रावसाहेब तांबे, देविदास कामडी, बापू,चतुर, सुनील सानप, दिलीप देशमुख, किशोर जाधव, भागवत आरोटे, रामेश्वर मोगल, वैशाली पाटील, देवपूर हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. आर. जहागिरदार, शहा विद्यालयाचे पर्यवेक्षक माधवराव शिंदे, प्रमोद बधान, रवी गडाख, सारिका उबाळे, सुरेखा गुरुळे, अलका कोतवाल, नवनाथ पाटील, अशोक कळंबे आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष रुपेश कुऱ्हाडे व संचालक एकनाथ खैरनार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचालक व सभासदांनी संस्थेचे दप्तर व स्व.नानासाहेब गडाख यांच्या प्रतिमेचे पूजन केले. वर्धापनदिन यशस्वीतेसाठी मॅनेजर वसंत निरगुडे, सुनील उगले, वैभव गडाख आदींनी परिश्रम घेतले.

### २९ लाख १६ हजार रकमेच्या व्याज वाटपास सुरुवात

संचालक मंडळाच्या बैठकीत संस्थेला झालेल्या नफ्याच्या प्रमाणात सभासदांच्या ठेवींवर शेकडा ६.५ दराने व्याज वाटप करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सभासदांना सुमारे २९ लाख १६ हजार इतके व्याज वाटप करण्यात येणार आहे. हे व्याज २ एप्रिलपर्यंत सभासदांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. याची सुरुवात संस्थापक अध्यक्ष दौलतराव मोगल यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात सभासदांना धनादेश वाटप करून करण्यात आली.

## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन -** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी व तालुका सिन्नर पैकी कसबे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील नगरपरिषद हद्दीतील **स.नं. ८४८ (११५२)/१+२+८४९(११५०)/१/२** मधील बिनशेती **प्लॉट नं. ६५ यांसी क्षेत्रफळ ३०१.४४ चौ. मी** यांसी बिनशेती आकार रू. २१७-०० पैसे व **प्लॉट नं. ६६ यांसी क्षेत्रफळ २९३.१६ चौ. मी.** यांसी बिनशेती आकार रू. २११-०० पैसे. यावर बांधकाम केलेल्या **यशवंत प्राईड या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका नं. ६३ (त्रेसष्ट) यांसी एकुण बांधीव बिल्टअप क्षेत्रफळ ८२०.०० चौ. फुट म्हणजेच ७६.२० चौ.मी.** यांसी चतु:सिमा - मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे.

वर नमुद मिळकत ही आमचे पक्षकार **श्री. नारायण दिनकर मुंगसे, सौ. रोहिणी नारायण मुंगसे** यांनी सदर मिळकतीचे मालक **सौ. स्वाती रामनाथ जाधव** यांचेपासुन खरेदी घेणेबाबतचा व्यवहार झालेला आहे. व सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत मालक **सौ. स्वाती रामनाथ जाधव** यांनी आमचे पक्षकार **श्री. नारायण दिनकर मुंगसे, सौ. रोहिणी नारायण मुंगसे** यांना सांगितलेले आहे.

सबब वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीसपत्र, अन्न, वस्त्र, वारसदार, लिज, कोर्ट हुकुमनामा, साठेखत इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **०७ (सात)** दिवसांचे आत मुळ कागदपत्रांसह आमचे कार्यालयात येऊन आमची खात्री पटवुन द्यावी अन्यथा सदरील मिळकत निर्वेध असल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, तदनंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. सबब सदरची जाहिर नोटीस ही आमचे पक्षकार **श्री. नारायण दिनकर मुंगसे, सौ. रोहिणी नारायण मुंगसे** यांचे सांगणेवरून प्रसिध्दीस. कळावे. ही जाहीर नोटीस.

सिन्नर, दि. २९/०३/२०२५. **आमचे मार्फत प्रसिध्द**

श्री. संदिप अशोक आहेर (ॲडव्होकेट)
सिन्नर न्यायालय, सिन्नर, जि. नाशिक. मो.नं. ९९७५८३९५९७

## जाहीर नोटीस

**ॲड.चेतना निलकंठ अलई, नि.६**

**नाशिक रोड येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनीअर डिव्हिजन सो. यांचे कोर्टात, नाशिक**
**श्रीमती. के. बी. गीते सो. यांचे कोर्टात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३५/२०२५**

**१) श्री. सुभाषचंद्र प्रीतमचंद बजाज,** वय ७९ वर्षे, व्यवसाय - निवृत्त,
राहणार - बी ४०, प्रेमनगर सीएचएस लिमिटेड कोपरी कॉलनी,
आनंद सिनेमाच्या मागे, ठाणे पूर्व, ठाणे - ४००६०३
**२) सुषमा रमण खुल्लर,** वय - ७२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी,
राहणार - ५ ए, गोपाल भवन, अंधेरी कुर्ला रोड, पिरामल गार्डनजवळ, जे. बी. नगर,
व्हीटीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९
**३) कृष्णाकुमारी प्रीतमचंद बजाज,** वय - ८४ वर्षे, व्यवसाय - निवृत्त, .... **अर्जदार**
रा. बी ४०, प्रेमनगर सीएचएस लिमिटेड कोपरी कॉलनी, आनंद सिनेमाच्या मागे, ठाणे पूर्व, ठाणे - ४००६०३

**विरुद्ध**

**कोणीही नाही ...जाबदेणार**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार **श्री. सुभाषचंद्र प्रीतमचंद बजाज** व इतर यांनी मयत **कै. दिव्यदेव चरणदास पाल (पॉल)** यांचे कायदेशीर वारस म्हणुन उत्तराधिकार दाखला **(Succession Certificate)** मिळणेकामी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**कै. दिव्यदेव चरणदास पाल (पॉल)** हे **दि. १२/०४/२०२४** रोजी मु. पोस्ट. कुळगाव, बदलापूर, अंबरनाथ, ठाणे येथील राहते घरी मयत झाले असुन त्यांचे नावावर नाशिक रोड येथील पंजाब नॅशनल बँक, शाखा-नाशिकरोड, येथील सेविंग खाते क्र. 0366000100210434 मधील रक्कम रुपये २७,१५३.३०/- व त्यावरील व्याज व मुदत ठेव खाते क्र. : 03660000000187 मधील रक्कम रुपये १,५०,०००/- व त्यावरील व्याज असे परत मिळणेबाबत अर्जदार यांनी कै. दिव्यदेव चरणदास पाल (पॉल) यांचे कायदेशीर वारस म्हणुन उत्तराधिकार दाखला **(Succession Certificate)** मिळणेकामी या मे. न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरचे अर्जदार यांनी केलेल्या मागणीनुसार अर्जदार यांचे लाभात वारसा दाखला देण्यास कुणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी **दि. ८/५/२०२५** रोजी सकाळी १०:३० वाजता स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयात हजर होऊन आपले म्हणणे लेखी हरकत व आक्षेप व त्याचे पुष्ट्यर्थ आपले कागदपत्रानिशी दाखल करावी. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास तर सदरहू मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत कै. दिव्यदेव चरणदास पाल (पॉल) यांचे वारस आहेत असा उत्तराधिकार दाखला **(Succession Certificate)** दाखला दिला जाईल, कळावे

ही जाहीर नोटीस आज दिनांक २९/३/२०२५ रोजी आमचे सहीने ब न्यायालयाचे शिक्क्यानीशी प्रसिद्धीस दिली आहे. **नाशिक, दिनांक : २९/३/२०२५**

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय नाशिकरोड**

**शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय नाशिकरोड**

गांवकरी Classified जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे.
**संपर्क-९८६०१३६५३६**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे. श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक.
**संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे.
**८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा
**-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

---

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफिसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

### पाहिजेत

भरवज, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथे इलेक्ट्रीक रिक्षासाठी ड्रायव्हर पाहिजे. **संपर्क- ९३२६१३८६५९**

---

महात्मा नगर (नाशिक) येथे बंगल्यासाठी विवाहित चौकीदार जोडप्याची गरज आहे. माणसाला ड्रायव्हिंगचा अनुभव असल्यास मदत होईल. स्त्रीला घरकामात मदत करावी लागेल. बंगल्याच्या परिसरात राहण्याची सोय केली जाईल. वयोमर्यादा: ४० वर्षांपर्यंत. **९६५७०४९९९१** वर संपर्क साधावा.

---

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/ ८४८४८१०५५३

### जमीन विकणे आहे

५० गुंठे जमीन विकणे आहे. सोनगिरी ते जोगटेंभी रोडटच
**९९२२२८७९५६**

### देणे आहे

विराज व्हरटेक्स, कॉलेज रोड ऑफिस भाड्याने देणे आहे
६०० स्केअर फुट, १ कार पार्किंग, स्वयं संचालित **संपर्क -** ९३७३२७१८७५ / ९३२३९०३५३९

### नावात बदल

माझे जुने नाव दिपीका अशोक पाटील असे होते आता माझे नवीन नाव **स्मिता अरूण चव्हाण** असे झालेले आहे. **आधार नं.२०७७४५७९७५८७**

### Name changed

My old name Dipika Ashok Patil has neen changed to my new Name **Smita Arun Chavan** as per **Aadhar No. 207745797587**

### नावात बदल

मै. अलका अशोक जठार मेरे पती नाम-जठार अशोक काशिनाथ, सैन्य संख्या 14352428 W रॅन्क- Ex/HAV, युनिट 67 MED, REG7 मेरे पती के आर्मी रेकॉर्ड मे मेरा नाम अलका और जन्मतिथी 19/05/1969 गलत दर्ज है. मेरा सही नाम **अलका अशोक जठार और जन्मतिथी** 03/09/1970 है. ॲफिडेव्हिट संख्या 245/ 6415 6126 81003 51529 तारीख 12/03/2025

---

माझे लग्नापूर्वीचे नाव माधुरी सुरेश रांजणगांवकर असे होते. आता माझे लग्नानंतरचे नाव **सौ.आसावरी ललीतकुमार एडके** असे झाले आहे. ॲफेडेव्हीट क्र.**35AP-039948** नुसार

## राज्यातील सर्व शाळा सकाळच्या सत्रात

**पुणे :** राज्यात उन्हाचा तडाका वाढत आहे. उष्णतेच्या या लाटेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्यातील सर्व शाळा व सर्व व्यवस्थापनाच्या शाळेची वेळ सकाळच्या सत्रात करण्याचे निर्देश शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी (माध्यमिक व उच्च माध्यमिक) आणि शिक्षण संचालक शरद गोसावी (प्राथमिक) यांनी दिले आहेत. त्यानुसार प्राथमिक शाळांसाठी सकाळी ७ ते ११.१५ आणि माध्यमिक शाळांसाठी सकाळी ७ ते ११.४५ अशी वेळ निश्चित केली आहे.विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच जिल्हा परिषद, महापालिका, नगरपरिषद यांच्या शिक्षणाधिकारी व शिक्षण प्रमुखांना हे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक परिस्थितीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने या कालावधीमध्ये बदल करता येईल, असेही सूचित करण्यात आले आहे.राज्यामध्ये वाढलेल्या उन्हाच्या कडाक्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम टाळण्यासाठी विविध संघटनांकडून शाळेची वेळ सकाळची करण्याबाबत निवेदन दिले आहे. तसेच काही जिल्ह्यांनी सकाळच्या सत्रात शाळा भरविण्याबाबत आदेश दिले आहेत. मात्र सर्व जिल्ह्यांमधील शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे निदर्शनास आले आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय, चांदशी ता. जि. नाशिक**

## जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चांदशी, ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी यादी क्र. अ आणि ब ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरून दि. २९/०३/२०२५ ते ०५/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/-ग्रामपंचायत अधिकारी सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत चांदशी, ता. जि. नाशिक**

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक NSK/13047/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:803/2024

जावक क्रमांक/५१३/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.५/०२/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक दिर्घायू चॅरिटेबल ट्रस्ट बाबत।**
**न्यासाचा पत्ता :- मुक्काम पोस्ट जानोरी, दिंडोरी, नाशिक,**
**अर्जदार- सागर सुरेश वाघ**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
| --- | --- | --- |
| १ | Amount | 5000.00 |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. 5000/- मात्र
(अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | NIL | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०५-०२-२०२५ रोजी दिली.

**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

## टायटल व्हेरीफीकेशन कामी जाहीर नोटीस

तमाम लोकांना सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
मोजे कुपखेडा, ता. बागलाण, जि. नाशिक येथील शेतमिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे-

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे | मालकाचे नाव |
| --- | --- | --- | --- | --- |
| १) | २४१/४ पैकी | ०.७८ + पो.ख. ०.०४ एकूण ०.८२ | ०.७३ | शकुंतला राजेंद्र बोरसे |
| २) | २५२ पैकी | ०.८९ + पोख. ०.०३ एकूण ०.९२ | ०.८३ | गोविंद त्र्यंबक बोरसे |

**या मिळकतींच्या चतु:सिमा महसुली रेकॉर्ड प्रमाणे.**

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकती या वरील उल्लेख केलेल्या मालकांच्या संपूर्ण मालकी व कब्जातील आहेत. गट नं. २४१/४ पैकी **शकुंतला राजेंद्र बोरसे** यांचे एकुण क्षेत्रापैकी ० हे. ४० आर. क्षेत्र असलेली मिळकत व गट नं. २५२ पैकी **गोविंद त्र्यंबक बोरसे** यांचे संपूर्ण क्षेत्राची मिळकत आमचे पक्षकारास विक्री करण्याबाबत वरील मिळकत मालकांनी व्यवहार निश्चित केला असुन योग्य ती इसाराची रक्कम देखील आमचे पक्षकाराकडुन घेतलेली आहे. सदर व्यवहार निश्चित करतेवेळी वर वर्णन केलेल्या मिळकती या संपूर्णपणे त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीतील मिळकती असल्याचे सांगुन त्या निर्वेध स्वरूपाच्या असल्याचे मिळकत मालकांनी आमचे पक्षकारास सांगितले आहे. मात्र तरीही सदर मिळकतींचे निर्वेधपणाची खात्री करण्याकरीता सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

तरी सदरच्या मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिन, लिज, मृत्युपत्र, कोर्ट हुकूमनामा, अथवा कोणत्याही दस्ताने काही हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी तसेच सदर मिळकतींवर कोणत्याही सरकारी, सहकारी अथवा खाजगी वित्तीय संस्थेचा काही कर्जबोजा बाकी असल्यास सदर वित्तीय संस्थानी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत आमचे खालील नमुद केलेल्या पत्यावरील कार्यालयात पुराव्याच्या अस्सल कागदपत्रांनिशी तशी लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध स्वरूपाच्या असल्याचे समजुन आमचे पक्षकार मिळकत मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर तसेच तोंडी हरकती घेतल्यास अथवा परस्पर वर्तमान पत्रात हरकत नोटीस प्रसिद्ध केल्यास सदर हरकती आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत.

स्थळ- सटाणा
**दिनांक - ३०/०३/२०२५**
**कळावे ही जाहिर नोटीस.**

**सही/-**
**आमचे मार्फत प्रसिद्ध**
**श्री. चंद्रशेखर नरेश पवार,** ॲडव्होकेट/नोटरी
निर्मल बिल्डींग, सरकारी दवाखान्यासमोर, सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक
मो.नं. ९८८१४०२८५०

## महत्त्वाचे

### मविप्र होरायझनच्या आरुष गायकवाडची नवोदय शाळेसाठी निवड



**नाशिक :** मविप्र संचलित येवला येथील होरायझन अकॅडमीतील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी आरुष किशोर गायकवाड याने नवोदय परीक्षेमध्ये यश संपादन केले असून, नवोदय शाळेसाठी त्याची निवड झाली आहे. या निवडीबद्दल संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर, शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता हिंगडे, शिक्षक सोनाली बारहाते, प्रीती परदेशी, स्नेहा धीवर, दीपाली भांगे, शिवप्रसाद काबरा आदींनी त्याचे अभिनंदन केले.

### भोयेगाव येथे तरुणाची आत्महत्या


**चांदवड :** तालुक्यातील भोयेगाव येथे संतोष वर्पे या तरुणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष वर्पे याने अज्ञात कारणांमुळे विषारी औषध प्राशन केले. त्याला उपचारासाठी तातडीने चांदवड येथील सुविधा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे भोयेगाव परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेची माहिती मिळताच वडनेरभैरव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस हवालदार सानप या घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

### 'टाकळी रोडवरील वृक्षतोड थांबवा'

**नाशिकरोड :** टाकळी रोडवरील रामदास स्वामीनगरमधील महाराष्ट्र हौसिंग सोसायटीजवळील भूखंडावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महापालिकेने संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रहिवासी हेमंत तपासे यांनी महापालिका आयुक्तांकडे ऑनलाइन केली आहे. वृक्षतोड सुरू असतानाचे फोटो व व्हिडिओ त्यांनी तक्रारीसोबत सादर केले आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सोसायटीच्याच एका सदस्याने बाळू केदारे या व्यक्तीला झाडे तोडण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, त्यासाठी महापालिकेची परवानगी घेतलेली नाही. या झाडांचा कोणालाही अडथळा किंवा त्रास होत नाही. तरीही अवैधरीत्या ती तोडली जात आहे. त्यामुळे परिसरातील हरितक्षेत्र नष्ट होत आहे. महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाची परवानगी न घेता झाडे तोडणे गुन्हा आहे. महापालिकेने त्वरित अवैध वृक्षतोड थांबवावी आणि दोषींवर आवश्यक कारवाई करावी. तसेच घटनास्थळी पाहणी करून भविष्यात असे प्रकार होणार नाहीत याची उपाययोजना करावी.



### नवनीत युवा चित्रकला स्पर्धेत मराठा हायस्कूलचा 'मास्टर स्ट्रोक'



**नाशिक :** नवनीत मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेत मविप्र संचलित मराठा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक तथा मविप्र सेवक संचालक चंद्रजीत शिंदे उपस्थित होते. सन २०२४-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या नवनीत युवा मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेत मराठा हायस्कूलच्या एकूण १,६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यात एकूण ४२ विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर बक्षिसे मिळाली. विशेष म्हणजे जिल्हास्तरीय यादीत विभूती ज्ञानेश्वर आहेर या विद्यार्थिनीच्या चित्राची निवड करण्यात आली. प्रमाणपत्र व चित्रकलाविषयक साहित्य देऊन तिचा सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक जगदीश डिंगे, केशव खताळे, विशाखा वाघ, चित्रलेखा नाठे व वैभव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

### 'स्वयंम' अर्ज नूतनीकरणासाठी मुदतवाढ

**नाशिक :** शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाकडून पंडित दीनदयाल स्वयंम योजना राबविण्यात येते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये स्वयंम योजनेमध्ये नूतनीकरणासाठी पात्र असलेल्या आणि मागील वर्षाचा निकाल उशिरा लागलेला असल्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी १० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदतवाढ अंतिम राहणार आहे. दरम्यान, स्वयंम योजनेचे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज आणि दुरुस्तीसाठी विद्यार्थी लॉगिंगवर पाठविण्यात आलेले अर्ज त्वरित पुढे पाठविण्यात यावे. याबाबत संबंधित महाविद्यालय व विद्यार्थ्यांना अवगत करण्याच्या सूचना सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तर प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मॅसेजवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत नूतनीकरणासाठी अर्ज सादर करावे. अन्यथा डीबीटीला मुकल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहणार असल्याचे आदिवासी विकास प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### अग्निशमनच्या इमारतीचे आज कलशपूजन

**सिडको :** नववर्ष आणि गुढीपाडव्याचे औचित्य साधत स्टेट बँक, गणेश चौकातील अग्निशमन दलाच्या नवीन इमारतीचे आज (दिनांक ३१ रोजी) सकाळी ९ वाजता कलशपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम सीएओंच्या हस्ते होणार आहे. गुढीपाडवा हा भारतीय नववर्षाचा प्रारंभ असून, या दिवशी नवा आरंभ आणि नवीन आशा जपून आगामी कार्यास प्रारंभ करणे ही परंपरा आहे. याच दिवशी सिडकोच्या अग्निशमन दलाच्या नवीन इमारतीच्या पूजनाचा कार्यक्रम आयोजित केल्यामुळे सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना याची महत्त्वाची संधी मिळणार आहे. हा कार्यक्रम अग्निशमन दलाच्या कामकाजाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कारण या नवीन इमारतीमुळे दलाच्या कार्यक्षमतेत वृद्धी होईल आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने चांगले परिणाम दिसून येऊ शकतात. या कार्यक्रमात सिडकोच्या उच्च अधिकाऱ्यांसह विविध विभागातील मान्यवरही उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमाला सिडको अग्निशमन दलाच्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### स्ट्रॉबेरी स्कूलतर्फे ५१ फूट गुढी उभारून होणार नववर्षाचे स्वागत

**नाशिक :** अक्षर संस्कार फाउंडेशन संचलित सामनगाव रोड परिसरातील स्ट्रॉबेरी स्कूलतर्फे ५१ फूट गुढी उभारून मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. रविवार दि. ३० मार्च रोजी सकाळी ९ वाजता शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत ही भव्य गुढी उभारली जाणार आहे. मराठी नववर्षाच्या पार्श्वभूमीवर स्ट्रॉबेरी स्कूलची सामनगावरोड शासकीय तंत्रनिकेतनसमोर इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतची नवीन शाळा सुरू होत आहे. हिंदू संस्कृतीमध्ये मराठी नववर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात केले जाते. स्ट्रॉबेरी स्कूलतर्फेही ५१ फूट गुढी उभारण्याचा संकल्प करण्यात आला असून, यावेळी विद्यार्थी, पालक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्कूलच्या संचालिका सायली काळे, अस्मिता काळे यांनी केले आहे. या उपक्रमासाठी मुख्याध्यापिका प्रियंका क्षीरसागर, रंजना खाती, संगीता बैरागी यांच्यासह इतर शिक्षकवृंद प्रयत्न करीत आहेत.

# नाशिकहून गोवा आता दोन तासांत; इंडिगोची दोन तारखेपासून सेवा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकहून गोवामार्गे कोईम्बतूरसाठी विमानसेवा सुरू करण्यात येत असून, २ एप्रिलपासून या सेवेचा शुभारंभ होत आहे. केवळ दोन तासांमध्ये नाशिकहून गोवा गाठणे आता शक्य होणार असल्यामुळे पर्यटनाला मोठी संधी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जातो आहे.





विविध शहरांना जोडण्याच्या उद्देशाने इंडिगो कंपनीच्या माध्यमातून विमानसेवेत विस्तार करण्याचा प्रयत्न सुरू असतो. या उपक्रमांतर्गत गोव्याची मागणी लक्षात घेता नाशिक कोईम्बतूर व्हाया गोवा अशी फ्लाइट सुरू करण्यात येत आहे.

नाशिकहून गोव्यासाठी दुपारी ३.५० वाजता उडाण घेणार आहे तर गोव्याला सायं. ५.५० ला विमान उतरणार आहे. गोव्याहून ६.१५ वाजता उडाण घेऊन ८.१० ला कोईम्बतूरला पोहोचणार आहे. कोईम्बतूरचा परतीचा प्रवास देखील दुसऱ्या दिवशी सकाळी १०.४० मिनिटांनी सुरू होईल. हे गोव्याला १२.३५ मिनिटांनी पोहोचतील. गोव्याहून १२.५५ मिनिटांनी नाशिकसाठी विमान उडाण भरेल आणि नाशिकला २.४० वाजता पोहोचेल.

केवळ २ तासांत गोवा गाठता येणार असल्याने पर्यटकांसाठी ही मोठी संधी निर्माण झाली असून, दोन तासांत गोवा गाठणे आता शक्य होणार असल्याने पर्यटकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# अजिंक्य चुंभळेंवर हल्ला करणारा संशयित जेरबंद

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**गौळाणे येथील सरपंच अजिंक्य चुंभळे यांच्यावर जीवघेणा हल्ला करणारा संशयित आरोपी गेल्या सहा महिन्यांपासून फरार होता, मात्र अंबड पोलिसांनी गुन्ह्यात पाहिजे असलेल्या फरार असलेल्या आरोपीला अटक केली आहे.**



नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती आणि माजी नगरसेवक शिवाजी चुंभळे यांचा मुलगा आणि गौळाणे ग्रामपंचायतीचे सरपंच अजिंक्य चुंभळे यांच्यावर गेल्या महिन्यापूर्वी लेखानगर येथील संपर्क कार्यालयात चार ते पाच जणांनी जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. प्रकरणाबाबत अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, पोलिसांनी यापूर्वीच यातील चार जणांचा ताब्यात घेतले होते. यातील मुख्य संशयित आरोपी फरार होता. अंबड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, संशयित आरोपी रोहित राजू मोरे (वय २१, रा. इंदिरा गांधी वसाहत, जुने सिडको) हा त्याच्या राहत्या घराच्या परिसरात आला आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ सापळा रचून आरोपीला पकडले. गुन्हे शोध पथकाच्या अधिकारी, पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या नेतृत्वाखाली व पोलिस अधिकारी सचिन करंजे, मयूर पवार, स्वप्निल जुंद्रे, अनिल गाढवे, राकेश पाटील आणि इतर सहकाऱ्यांसह आरोपीला अटक करण्यात आली. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, उपआयुक्त मोनिका राऊत आणि सहायक आयुक्त शेखर देशमुख, अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी कारवाई करण्यात आली. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक दीपक बागूल करीत आहेत.



## नाशिक जिल्हा मल्टिपर्पज संस्थेच्या चेअरमनपदी तिदमे

**नाशिक : प्रतिनिधी**

आयटी लायब्ररी जिल्हा न्यायालय नाशिक येथे निवडणूक निर्णय अधिकारी प्रदीप महाजन, सहायक निबंधक यांच्या उपस्थितीत दि नाशिक डिस्ट्रिक्ट ॲडव्होकेट्स मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. नाशिक यांची चेअरमनपदी ॲड. पांडुरंग नारायण तिदमे, व्हा. चेअरमनपदी ॲड. भानुदास गजानन शौचे तसेच सेक्रेटरी ॲड. भरत नामदेवराव ठाकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी सोसायटीचे मार्गदर्शक सीनिअर ॲड. भगीरथ एन. शिंदे तसेच सोसायटीचे ज्येष्ठ संचालक ॲड. सुदामराव गायकवाड, ॲड. अनिल विघ्ने, ॲड. संदीप पिंगळे, ॲड. धनंजय भोर, ॲड. रवींद्र ताजणे, ॲड. भास्करराव मेढे पाटील, ॲड. प्रभाकर घुमरे, ॲड. अरुण खांडबहाले, ॲड. ॲड. सविता ठुबे, ॲड. प्रेमनाथ पवार, ॲड. स्वप्ना राऊत, ॲड. किरण असोले, माजी चेअरमन ॲड. अशोक कातकाडे, ॲड. रतन ढिकले, ॲड. महेश आहेर, ॲड. भाऊसाहेब ढिकले, ॲड. नीलेश गोहाड, ॲड. दिलीप शिर्के, ॲड. गिरीश घुगे, ॲड. बाळासाहेब पवार, ॲड. संदीप बापूसाहेब गायकर, ॲड. दिलीपराव पिंगळे, ॲड. भिमाजी आरण, माजी नगरसेवक अनिल मटाले, अक्षय आहेर यांनी उपस्थित राहून सर्व नवनिर्वाचित चेअरमन व सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.

## कोयता घेऊन फिरणारा जेरबंद; दोन कोयते जप्त

**सिडको : विशेष प्रतिनिधी**





शहरात दहशत माजवणाऱ्या व प्राणघातक शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांविरुद्ध पोलीस कार्यवाही करत आहेत. या अनुषंगाने, गुन्हे शाखा युनिट क-२ कडील अधिकारी व अंमलदारांनी नाशिकरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्री अण्णा गणपती मंदिराजवळ सापळा लावून संशयित आरोपी सौरभ उर्फ बाबू रवींद्र बहोत (वय १९, नाशिकरोड) याला युनिट २ गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले.

गुन्हे शाखा युनिट २ कडील सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रेमचंद गांगुर्डे यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, एक व्यक्ती हातात धारदार कोयता घेऊन लोकांना धमकावत आहे. त्यानुसार, पोलीस पथकाने तात्काळ कारवाई केली. शंकर काळे, विलास गांगुर्डे, प्रेमचंद गांगुर्डे आणि नितीन फुलमाळी यांच्या मदतीने सदर व्यक्तीला ताब्यात घेतले. आरोपीचे नाव सौरभ उर्फ बाबू रवींद्र बहोत (वय १९, नाशिकरोड) असल्याचे त्याने सांगितले. यातील संशयिताचा कसून तपास केला असता त्याच्याकडून १,२०० रुपयांचे दोन धारदार कोयते जप्त करण्यात आले. आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाईसाठी आरोपीला उपनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईबाबत, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त प्रशांत बच्छाव आणि मा. सहा. पोलीस आयुक्त संदीप मिटके यांचे मार्गदर्शन असून, गुन्हे शाखा युनिट २ कडील अधिकारी व अंमलदारांची कार्यवाही प्रभावी ठरली आहे.

## राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकला पुरस्कार

**नाशिक :** येथील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालयाला इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (आयईटीई) कडून 'सर्वोत्तम आयएसएफ सेंटर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. एल ॲण्ड टी स्किल ट्रेनर्स अकॅडमी, आयईटीई, मुंबई पश्चिम विभागाने आयोजित केलेला हा कार्यक्रम मुंबई येथील शाह ॲण्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयईटीई दिल्लीचे अध्यक्ष सुनील, तर प्रमुख पाहुणे म्हणून एल ॲण्ड टी स्किल डेव्हलपमेंट मिशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी के. रामकृष्णन उपस्थित होते.



## नळ फिटिंगचे काम करणाऱ्यावर कोयत्याने वार

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नळ फिटिंगचे काम करणाऱ्या तरुणाला कोयत्याचा वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अक्षय ज्ञानेश्वर पाटील (वय २३, रा. अंबड) हा तरुण प्लंबिंगचे काम करतो. काल (दि. २८) पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास तो घरी होता. त्यावेळी आरोपी ऋषिकेश साहेबराव नवले (रा. उपेंद्रनगर, अंबड) व त्याचा एक अनोळखी इसम असे दोघे जण फिर्यादी पाटील याला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हातात कोयता घेऊन घराबाहेर उभे राहिले. आरोपी ऋषिकेश नवले याने घराचा दरवाजा तोडण्याच्या उद्देशाने दरवाजावर कोयता मारून त्याचे नुकसान केले, तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देऊन खिडकीवर कोयत्याने वार करून खिडकीच्या काचा फोडल्या. त्यास प्रतिकार केला असता फिर्यादीच्या हातावर कोयता मारून दुखापत केली व जाताना दोन्ही आरोपींनी पाटील याच्या घरावर दगडफेक करून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोका सांगे ब्रह्मज्ञान; स्वतः मात्र कोरडे पाषाण

## सिडकोत एकीकडे पाण्यासाठी वणवण; दुसरीकडे अपव्यय

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



नाशिक महापालिका हद्दीत विविध भागांत भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. काही भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, तर काही ठिकाणी पंधरा-पंधरा दिवसांपासून पाणी येत नाही. त्यामुळे नाशिककरांसमोर मोठ्या प्रमाणात पाणी संकट उभे ठाकले असताना, दुसरीकडे मात्र थेट सिडको विभागीय मनपा कार्यालयातच दिवसाढवळ्या वाहने धूत पाण्याचा अपव्यय सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

सिडकोतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिक ठिकठिकाणी आंदोलन, मोर्चे व निवेदन देत आहेत. सध्या सिडकोवासीय नागरिक टँकर, हातपंप, जार व बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून आहेत. या परिस्थितीमुळे लोकांमध्ये संताप वाढत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना पाणी जपून वापरण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, दुसरीकडे महापालिका कर्मचाऱ्यांकडूनच पाण्याचा अपव्यय होत असल्याचे उघडकीस आले आहे. सिडको महापालिका विभागीय कार्यालयाच्या आवारात कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पाणी वाया घालवत दुचाकी धुतली. पाणी इतक्या प्रमाणात वापरण्यात आले की, संपूर्ण परिसर जलमय झाला होता. नागरिकांनी हा प्रकार पाहताच संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. नाशिक शहरात अनेक ठिकाणी पाणीटंचाईमुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. काही भागांत आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे घरगुती वापरासाठी पुरेसे पाणी मिळत नाही. महिलांना लांब अंतरावरून पाणी भरून आणावे लागत आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाचे कर्मचारीच पाण्याचा अपव्यय करत असतील तर सामान्य नागरिकांना पाण्याचे महत्त्व कसे पटवून द्यायचे, असा सवाल उपस्थित होतो. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, संबंधित कर्मचाऱ्यांवर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

प्रशासनाने ज्या भागांमध्ये पाणीटंचाई आहे, तिथे टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा आणि पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी अधिकाऱ्यांचा राबता असतानादेखील त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना समज दिली नाही. मनपा आयुक्तांनी याबाबत तातडीने लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी, अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.


**टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नासिक, पोटतुकडी तालुका नासिक यापैकी **मौजे आनंदवल्ली** या शिवारातील व **नासिक** शहरातील मिळकत यांसी **सर्व्हे नंबर ४०/१** यापैकी **प्लॉट नंबर २६ ते २८** यांसी एकत्रित क्षेत्र ५१८-०० चौ.मी. यावरील **गणगौरव अपार्टमेंट को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.** या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील **फ्लॅट नं.१३** यांसी **चटई क्षेत्र ४२-५९ चौ.मी.** (यांसी बांधीव क्षेत्र ५१-११ चौ.मी.) यांसी चतु:सिमा नकाशाप्रमाणे आहेत. अशी मिळकत.

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, वर नमुद केलेली मिळकत ही **१) श्री.ईश्वर हिरालाल गवळी** व **२) सौ.पुनम ईश्वर गवळी** यांचे मालकी हक्काची असून सदर मिळकत ही त्यांचे प्रत्यक्ष कबजे वहिवाटीतील मिळकत आहे. तरीही सदरची नोटीस टायटल व्हेरिफिकेशनकामी दिली आहे. तथापि, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिज, जप्ती, करारनामा वगैरे बोजा असल्यास संबंधितांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **०७ (सात) दिवसांचे आत** आमचे खालील नमुद पत्त्यावर समक्ष येऊन सर्व कागदपत्रांनिशी लेखी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजणेत येईल. त्यानंतर आलेल्या हरकती आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही तसेच परस्पर वृत्तपत्रात दिलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस. नासिक. दि.३०/०३/२०२४.

**ॲड.मुकुंद रामचंद्र ओढेकर**
शिवदुर्गा बंगला, डॉ.होमी भाभानगर, नवीन मुंबई-आग्रारोड, नासिक. मो.९३२५६६८०६९


## पिंडकौल नाटकाच्या कलावंतांनी साजरा केला रंगभूमी दिन

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिक जिल्हा अहिर सुवर्णकार समाज हरिओम सांस्कृतिक संस्था, नाशिक व पिंडकौल नाटक ग्रुपच्या वतीने सोनारवाडा, नेहरू चौक, नाशिक येथे २७ मार्च रोजी जागतिक रंगभूमी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री व निफ फेस्टिव्हल नाशिकचे डायरेक्टर सुवर्णकन्या प्रियदर्शनी कनेरी, दर कोस दर मुक्कामचे दिग्दर्शक मुकुंद भुजबळ, लेखक अभिनेता श्यामदत्त विभांडिक, ज्येष्ठ रंगकर्मी राजेश जाधव, राजा पाटेकर, विनोद राठोड तसेच हरिओम संस्थेचे अध्यक्ष प्रकाशशेठ थोरात, सचिव मनोजशेठ जानोरकर, सोनारवाड्याचे पदाधिकारी सचिनशेठ वडनेरे, बापूशेठ ओझरकर व नाट्य कलावंत योगेश्वर थोरात आदी उपस्थित होते.

यावेळी प्रियदर्शनी कनेरी यांनी कलाकारांना शुभेच्छा देताना सांगितले की, नाटकासोबतच विविध कलेच्या माध्यमातून नाशिक फेस्टिव्हलमध्ये आवर्जून सहभाग घेऊन आपली कला सादर करता येते. तेव्हा जास्तीत जास्त कलाकारांनी या आपल्या नाशिक इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभागी व्हावे असे सांगितले. नाटककाराने नवीन विषय आजच्या तरुण व बाल पिढीला मार्गदर्शक ठरतील असे नाटक लेखकाने लिहायला हवे. ते नाटक मनोरंजनाबरोबर दिशादर्शक ठरायला हवे, असे मुकुंद भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. कलाकारांनी फक्त अभिनय न करता नाटकाच्या तांत्रिक बाबी लाईट, साऊंड, नेपथ्य, डिझाइन, रंगभूषा, वेशभूषा या अशा सर्व बाजू शिकायला हव्या, असे प्रतिपादन नाट्यकलावंत योगेश्वर थोरात यांनी केले. जागतिक रंगभूमी दिनाचे महत्त्व व का साजरा करावा याच्याबद्दलची माहिती नाट्य अभिनेत्री निशा चव्हाण यांनी दिली. यावेळी उपस्थित सर्व ज्येष्ठ रंगकर्मी उल्हास वानखेडे, जयप्रकाश पुरोहित, कविता होले, नीलेश अहिरराव, डॉ. जानकी नाईक, पूजा भावसार, पूनम वानखेडे, रेखा देशपांडे, सचिता काळे, अमोल अहिरराव आदींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती नागरे यांनी केले. मयूर बोराडे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संदीप आजगे, संदीप पवार, श्लोक अल्हाट, शरद पवार, पंकज माळवाल, दीक्षांत मोरे, नीलिमा मोरे, अश्विनी साळवे यांनी परिश्रम घेतले.


**जाहीर नोटीस** नि.६

दिवाणी चौकशी अर्ज नं.५११/२०२४

**ॲड.शहेबाज एस.शेख**
जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक

**नाशिक येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, नाशिक**
(**७ वे सह दिवाणी न्यायाधिश मे.राऊत मॅडम**) यांचे न्यायालयात ...

५) **शहेबाझ इकबाल शेख** )
६) **आझाद इकबाल शेख** ) **अर्जदार**
७) **मिनाज इकबाल शेख** )
१ ते ३ पत्ता - मु.पो.हरसुल, ता.त्र्यंबकेश्वर, )
जि.नाशिक-४२२२०४ )
८) **शाहीन पप्पु कादरी उर्फ शाहीन इकबाल शेख** )
पत्ता - घर नं.४, निफाड पोलिस लाईन, )
ता.निफाड, जि.नाशिक - ४२२३०३ )
**विरूध्द**
**कोणी नाही** ) **सामनेवाले**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील नामे **कै.इकबाल युसुफ़ शेख** यांचे दि.०३/०५/२०१८ रोजी सह्याद्री हॉस्पिटल नाशिक येथे निधन झालेले आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार नं.१ शहेबाझ इकबाल शेख, अर्जदा नं.२ आझाद इकबाल शेख, अर्जदार नं.३ मिनाज इकबाल शेख, अर्जदार नं.४ शाहीन पप्पु कादरी यांनी मयताचे कायदेशीर वारस घोषीत करण्यासाठी या न्यायालयात भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये दिवाणी चौकशी अर्ज दाखल केलेले आहे. त्यांचे मृत्युपश्चात कै.इकबाल युसुफ़ शेख याना अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत, असे त्यानी जाहीर केलेले आहे. त्याअर्थी सदरहु अर्जदार नं.१ ते ४ हेच मयत कै.इकबाल युसुफ़ शेख यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वत: अगर वकीलामार्फत **दि.०५/०५/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता** संबंधीत मे.न्यायालयात हजर होऊन आपले म्हणणे मांडावे.अन्यथा कोणाचीही कोणतीही हरकत नाही, असे समजुन अजदार नं.१ ते ४ यांचे नावाचा वारस दाखला देण्यात येईल. तसे कळावे, यासाठी ही जाहीर नोटीस प्रसिध्द.

कोर्टाचा शिक्का

सही/- **अधिक्षक,**
लिपीक ७ वे दिवाणी न्यायाधिश नाशिक

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय परिषदेसाठी संगमनेरच्या संदीप वाकचौरे यांची निवड



**नाशिक :** राष्ट्रीय शिक्षक परिषद नवी दिल्ली यांच्या वतीने अहमदाबाद येथे आयोजित राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संदर्भाने शिक्षक शिक्षणाला विकसित भारत २०४७ कडे वळविण्यासंदर्भातील विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी संगमनेर येथील संदीप वाकचौरे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२० अंतर्गत शिक्षकांच्या सक्षमीकरणासंदर्भात विविध प्रकारच्या भूमिका प्रतिपादन करण्यात आलेल्या आहेत. सेवा पूर्व आणि सेवांतर्गत शिक्षक सक्षमीकरणाबद्दल राष्ट्रीय शिक्षण परिषदेला विकसित केलेल्या धोरणात्मक प्रक्रियेबद्दल दोन दिवशी परिषदेमध्ये चर्चा करण्यात येणार आहे. २०४७ पर्यंत भारताच्या विकसित भारत या स्वप्नापर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षकांचे सक्षमीकरण याबाबत चर्चा होणार आहे. राष्ट्रीय शिक्षक परिषदेच्या वतीने आयोजित या कार्यशाळेतून देशभरातून विविध अधिकारी व शिक्षक सहभागी होणार आहेत. वाकचौरे यांनी शिक्षण संदर्भाने आजवर १४ पेक्षा अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, दीपक त्रिभुवन, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेचे दीपक माळी आदींसह अनेकांनी अभिनंदन केले.

### समग्र शिक्षा समिती बैठकीला मुहूर्त लागेना

**नाशिक :** समग्र शिक्षा अंतर्गत राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासंदर्भात शासनाने मार्चच्या पहिल्या आठवड्यात समिती पुनर्गठित केली. तीन महिन्यांचा अहवाल तयार करण्याचा निर्णयदेखील घेतला. परंतु या पुनर्गठित समितीची अद्याप एकही बैठक घेण्यात न आल्याने समग्र शिक्षा संघर्ष समितीच्या वतीने बैठकीच्या नियोजनाबाबत शासनाकडे विचारणा करण्यात आली आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी तीव्र आंदोलन केल्यावर मार्चच्या पहिल्या आठवड्यात शिक्षणमंत्र्यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाने तेरा सदस्यांची समिती पुनर्गठित केली. ही समिती अभ्यास करून बैठकीत सविस्तर चर्चा करेल आणि अंतिम अहवाल देणार आहे. या समितीच्या १३ सदस्यांपैकी शिक्षक आमदारांसह संघटनांच्या दोन प्रतिनिधींचाही समावेश असेल. मात्र, या संदर्भातील फाइल शिक्षण विभागातून पुढील सरकलेलीच नाही, असे संघटनेने म्हटले आहे. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती मानधन व अन्य सेवा शर्ती याचा अभ्यास होणार कधी आणि अहवाल सादर करणार कधी, असा सवाल समग्र शिक्षा संघर्ष समितीचे अध्यक्ष योगिता बलाक्षे यांनी शिक्षण विभागाला पाठवलेल्या पत्रामध्ये केला आहे. नाशिक जिल्ह्यातील समग्र शिक्षा संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष सुनील दराडे, नाशिक जिल्हा कार्यकारिणी सदस्य अनिता देशमुख, प्रमोद पगारे, काशीनाथ लाडे, महानगरपालिका मालेगाव संपर्कप्रमुख आतिक शेख व कायदेशीर सल्लागार यशवंत रायसिंग यांनी याबाबतची माहिती दिली.

## निधन वार्ता

### हौशाबाई नेवगे



**विंचूर :** संताजीनगर (विंचूर) येथील प्रगतिशील शेतकरी मधुकर पुंजाजी नेवगे यांच्या पत्नी हौशाबाई मधुकर नेवगे (७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. बाळासाहेब, संजय व शरद नेवगे यांच्या त्या आई होत.

### वत्सलाबाई आहेर



**सोग्रस :** वडाळीभोई येथील वत्सलाबाई मुरलीधर आहेर (७५) यांचे नुकतेच निधन झाले. श्री दत्त टीहाऊसचे संचालक संजय आहेर, चंद्रकांत आहेर, मंदाकिनी देशमाने यांच्या त्या मातोश्री आणि भाऊलाल आहेर व सचिन आहेर यांच्या त्या आजी होत.

### सुमनबाई काळे




**विंचूर :** येथील सुमनबाई किसनराव काळे (८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### माधुरी वराडे



**नाशिक :** दत्तनगर, पेठरोड येथील रहिवासी सुधीर किसनराव वराडे यांच्या पत्नी माधुरी सुधीर वराडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

### सुहास मोहेदिकर



**नाशिक :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक (तृतीय परीक्षा उत्तीर्ण) राम मंदिर आंदोलनातील सहभागी सुहास मोहेदिकर (८१) यांचे इंदिरानगर येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, जावई व मुलगी, नातू असा परिवार आहे.

### वासंती जाधव



**सिन्नर :** येथील खाटीक गल्लीतील रहिवासी वासंती प्रभाकर जाधव (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, तीन सुना, सहा नातू असा परिवार आहे.

# शिंदवडला द्राक्षबागेत पकडला बिबट्या

## वनविभागाचे दोन कर्मचारी जखमी, रुग्णालयात दाखल

**दिंडोरी : प्रतिनिधी**

**दिंडोरी तालुक्यातील शिंदवड येथे काल द्राक्षबागेत मुक्त संचार करणारा बिबट्या जेरबंद केला. वनविभागावर बिबट्याने हल्ला केला.दोन कर्मचारी जखमी झाले. सविस्तर वृत्त असे की, भाऊसाहेब बरकले यांच्या शेतात जनावरांसाठी गवत काढणीसाठी मनोज वाघमारे हा गेला होता. त्याने गवतात बिबट्या बघून पळाला व सर्वांना सांगितले. यावेळी बरकले यांनी इतरांना सांगून बिबट्या असलेल्या ठिकाणी दुरून पाहणी करत सदर माहिती ग्रामपंचायत सदस्य अमोल बरकले यांनी वरखेडा बीटचे ज्ञानेश्वर वाघ यांना दिली.**

वाघ यांनी वरिष्ठांना कळवले व सर्व टीम घेऊन वाघ हे शिंदवड येथे पोहचले. यावेळी बिबट्या जखमी असूनदेखील हळूहळू चालून शरद बरकले यांच्या शेतात पोहचला. बिबट्या द्राक्षबागेच्या व कांद्याच्या बांधावर बसला होता. बिबट्या बघण्यासाठी पुढे सरसावलेल्या अधिकाऱ्यांवर अचानक बिबट्याने हल्ला चढवला. संरक्षक जाळी पुढे करत बचाव करण्याचा प्रयत्न केला. सर्व वनअधिकारी कर्मचारी एकवटले व जखमी असलेले शांताराम शिरसाठ व अण्णा टेकनर यांनी जखमी असूनही बिबट्या पकडून धरला.



> सकाळी आम्हाला समजले की, शिंदवड येथे जखमी बिबट्या दिसून आला आहे. आम्ही तत्काळ शिंदवड गाठले. बिबट्याला वनविभागाने पकडून ठेवले होते. आम्ही बिबट्याला बेशुद्ध केले व १०८ वर बिबट्याचा ताप होता. पायाला जखमा होत्या. आम्ही सलाईन देऊन पुढील वैद्यकीय सेवेसाठी नेण्यात आले.
> **– डॉ. हेमराज सुखवल**

> शिंदवड येथे जखमी बिबट्या असल्याचे समजले. तत्काळ आमची टीम पोहचली. या रेस्कूमध्ये यावेळी बिबट्याने प्रतिहल्ला केला. यात आमचे दोघे कर्मचारी जखमी झाले. उपचार सुरू असून, प्रकृती ठीक आहे. आमची रेस्कू टीम जखमी बिबट्यावरदेखील उपचार करत आहे. **– सुशांत पाटील** वनपरिक्षेत्र अधिकारी, दिंडोरी


# आ. सुहास कांदेंना राज्यमंत्रिपदाचा दर्जा

## विविध जाती, भटक्या जमाती कल्याण समितीच्या प्रमुखपदी कांदेंची निवड

**नांदगाव : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या घोषणा बुधवारी (दि. २६) रात्री उशिरा जाहीर करण्यात आल्या. यामध्ये विविध जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या प्रमुखपदी नांदगावचे आमदार तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय असलेले आ. सुहास कांदे यांची नियुक्ती करण्यात आल्याने नांदगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेना समर्थकांनी आनंद व्यक्त केला आहे. आ. कांदे यांचे या निवडीनंतर अनेक मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात आले.

राज्य शासनातर्फे जाहीर करण्यात आलेल्या विविध जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या प्रमुखपदी नांदगावचे शिंदे गटाचे आमदार सुहास कांदे यांची नियुक्ती करण्यात आल्याने शिवसैनिक तसेच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करून आनंद व्यक्त केला. आमदार सुहास कांदे यांनी नांदगाव मतदारसंघातून नाशिकचे माजी खासदार समीर भुजबळ यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत विजयश्री खेचून आणली होती. पहिल्या टर्ममध्ये माजी आमदार पंकज भुजबळ यांना पराभवाची धूळ चारली होती तर दुसऱ्या टर्ममध्येदेखील समीर भुजबळ यांचा पराभव करत जणू नांदगावमधून भुजबळ कुटुंबीयांचे राजकीय वर्चस्वच संपुष्टात आणले आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती विमुक्त जाती भटक्या जमातीसाठीच्या तसेच विविध योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व देखरेख करण्याचे महत्त्वपूर्ण कामही समिती करत असते. राज्य सरकारतर्फे या समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे लागू करण्यासाठी ही समिती कार्यरत असते. आ. कांदे यांच्या या नियुक्तीनंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, नांदगाव येथील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब कवडे माजी आमदार संजय पवार माजी आमदार अनिलदादा आहेर बोराळे ग्रामपंचायतचे माजी सरपंच राजेंद्र पवार आमोदे ग्रामपंचायतचे सरपंच विठ्ठल पगार यांच्यासह राज्यातील अनेक मान्यवरांनी सुहास कांदे यांचे अभिनंदन केले.



> माझ्या नांदगाव विधानसभा मतदारसंघासह राज्यभरात विमुक्त जाती तसेच भटक्या जमातीचे बांधव, त्याचप्रमाणे भगिनींची संख्यादेखील मोठी आहे. या सर्वांची सेवा करण्याची संधी मला मिळाली आहे. त्या संधीचं सोनं कसं करता येईल, यासाठी प्रामाणिकपणे काम करेल. या समाजाच्या उन्नतीसाठी नवीन धोरणे व योजना आखून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. या समाजाला शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त कसा करून देता येईल, यादृष्टीने देखील प्रयत्न करेल. समाजाची सेवा हेच प्रथम ध्येय डोळ्यासमोर ठेवून या समाजाची सेवा करेन.
> **– आ. सुहास कांदे**

# लोककला जिवंत ठेवण्याची काळाची गरज

## सदाशिव मलखेडकर : शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**नाशिक : प्रतिनिधी**

जीवनात कितीही कठीण काळ येऊ द्या, त्यांना सामोरे जाण्यास तयार रहा, आपल्या कलेतून शासनाच्या योजनांची माहिती देणे गरजेचे आहे. लोककलेचे माध्यम मागे पडत चालले आहे. रील्सच्या या जमान्यात शाहिरीसारखा कलाप्रकार विद्यार्थी शिकत आहे. राज्य शासनाच्या या प्रयत्नांमुळे लोककलेला पुन्हा उभारी मिळेल, असे प्रतिपादन भारत सरकारच्या सूचना व प्रसारण मंत्रालयाचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी सदाशिव मलखेडकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने वाघेरे येथे दि.१५ ते २४ मार्चदरम्यान दहा दिवसीय निवासी शाहिरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून घोटी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विनोद पाटील, पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण रकिबे, ग्रामपंचायत अधिकारी सुजितकुमार सोनवणे, विस्तार अधिकारी किरण रहाडे, इगतपुरी पंचायत समिती सभापती सोमनाथ जोशी, काँग्रेस तालुका सरचिटणीस भास्कर गुंजाळ, शाहीर बाळासाहेब भगत, कळसुबाई प्रतिष्ठानचे भगीरथ मराडे, शाहीर राजेंद्र बावनकुळे, शाहीर दत्तराज जोशी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. रकिबे म्हणाले की, लोककलेचा वापर सामाजिक संदेश देण्यासाठी होत असतो, मात्र या प्रकारांत शाहिरी हा कलाप्रकार इतरांपेक्षा वेगळा आहे. शाहिरी ही प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आहे. महाराष्ट्रातील मातीत अनेक मोठमोठे शाहिर झाले आहेत. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बाळासाहेब पलटने केले तर आभार कार्यक्रमाचे शिबिर संचालक शाहीर उत्तम गायकर यांनी मानले.



**राज्यभरातून प्रतिसाद**

सुरेश भिसे (जालना), भीमराव मोरे (जाफराबाद), दत्तराज जोशी, राजेंद्र बावनकुळे, छगन बावनकुळे, याज्ञवल्क्य जोशी (नागपूर), प्रशांत भिसे (सिन्नर), रवींद्र वरुटे (टाकेद), रवींद्र रोकडे (मुंढेगाव), अशोक चांदुडे (नाशिक), शरद लोहकरे (कल्याण), आकाश पाटील (पाथर्डी), शिवाजी गायकर (संभाजीनगर), किरण बोधक (शहापूर), रवींद्र वाघ (मुलुंड), गणपत बंदावणे (मुकणे), पंढरीनाथ भिसे (अकोले), दौलत घारे (काळुसते), प्रवीण बोधक (ठाणे), गणेश बगाड (अहिल्यानगर), राधिका भागडे (मानवेढे), कल्पेश कांबळे (लातूर), ऋषिकेश नरवटे (मुकणे), जगदीश शिंदे (समनेरे), मच्छिंद्र गणाचार्य, आकाश गणाचार्य (वाघेरे), ओंकार गणाचार्य, विशाल गणाचार्य (घोटी), ओंकार गायकर, दुर्गेश गायकर (वाघेरे), आकाश दिवटे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

**विविध लोककलांचे सादरीकरण**

या शिबिरात गण, गवळण, भारूड, वासुदेव, पोवाडा, गोंधळ, छक्कड, जोगवा, परसरामी लावणी, खंडोबाचं गाणं तसेच देवीची गाणी शाहिरी पेहरावात सादर करण्यात आली.




# कौशल्य विकासाने रोजगाराच्या संधी : शिक्षणाधिकारी प्रा. मोगल

**नाशिक : प्रतिनिधी**

व्यक्तीच्या ज्ञान, क्षमता आणि कौशल्यांमध्ये सुधारणा करणे म्हणजे कौशल्य विकास. आजच्या वेगाने बदलत्या जगामध्ये कौशल्य विकास ही केवळ गरज राहिलेली नाही, तर समाजासाठी अत्यावश्यकता झालेली आहे, कौशल्य विकासाने रोजगाराच्या संधी वाढतात. उत्पादन कुशल कामगारांमुळे उत्पादकता वाढते, ज्यामुळे अर्थव्यवस्था सक्षम होते, असे प्रतिपादन मविप्रचे शिक्षणाधिकारी प्रा. शशिकांत मोगल यांनी केले

मविप्र समाजाच्या सायखेडा येथील श्री स्वामी षट्कोपाचार्यजी महाराज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित 'कौशल्य विकास' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. ए. खैरनार, डॉ. एस. व्ही. गोसावी, कार्यक्रम समन्वयक डॉ. डी. डी. काजळे, प्रा. के. एस. गोपाळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा. मोगल म्हणाले, कौशल्य विकासाचे महत्त्व आणि त्याचे फायदे लक्षात घेऊन या क्षेत्रात काम करण्याची आवश्यकता आहे. कौशल्य विकासमध्ये तांत्रिक कौशल्ये, सॉफ्ट स्किल्स आणि व्यावसायिक कौशल्ये यांचा समावेश होतो. कौशल्य विकासामुळे व्यक्ती आत्मनिर्भर बनतात आणि समाजाला योगदान देऊ शकतात. जागतिक स्तरावर स्पर्धा वाढली आहे, त्यामुळे कौशल्य विकास आवश्यक आहे.



# काचुर्ली आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**नाशिक : प्रतिनिधी**

वाढदिवस म्हटला की, सर्वसाधारणपणे आलिशान हॉटेल, रिसॉर्ट अशा ठिकाणी भव्य पार्टी... मोठमोठ्या मॉल्समध्ये खरेदी...भला मोठा केक अशा पद्धतीने सेलिब्रेशन करून अवाढव्य खर्च केला जातो. मात्र, जे लोक तळागाळातून आलेले असतात, ज्यांना परिस्थितीची जाणीव असते, असे लोक या सर्व अनावश्यक खर्चाला फाटा देत आगळावेगळा वाढदिवस साजरा करतात. आरोग्य क्षेत्रात विनामूल्य काम करणाऱ्या आरोग्य सल्लागार अमोल लगड यांनी आपला वाढदिवस अत्यंत अनोख्या पद्धतीने साजरा करून समाजासमोर वेगळा आदर्श उभा केला आहे. लगड यांनी वाढदिवसानिमित्त मविप्रच्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातील काचुर्ली प्राथमिक आश्रमशाळेतील ३३० विद्यार्थ्यांना हाउस युनिफॉर्म अन् खाऊचे गिफ्ट दिले. अचानकपणे मिळालेलं गिफ्ट पाहून विद्यार्थीही भारावून गेले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. श्रद्धा कासुर्डे, मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, आश्रमशाळेचे प्राचार्य गौतम कटारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ॲड. नितीन ठाकरे यांनी अध्यक्षीय मनोगतात या उपक्रमाचे कौतुक केले. अमोल लगड व ॲड. श्रद्धा कासुर्डे यांनीही मनोगत व्यक्त केले. लगड यांनी आरोग्य सल्लागार म्हणून सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आहे. ते सतत आरोग्यविषयी ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने मोफत सल्ला, व्याख्यान देत असतात. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेलेले असल्यामुळे त्या जाणिवेतूनच त्यांनी अशा प्रकारचा उपक्रम करण्याची इच्छा वेलनेस कोच आणि उच्च न्यायालयातील ॲड. श्रद्धा कासुर्डे यांच्याकडे व्यक्त केली.

# तयार गुढीवस्त्र, पैठणी टोपी ट्रेंडीगला

**नाशिक : प्रतिनिधी**

गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा पहिला दिवस असून महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.या दिवशी घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर गुढी उभारली जाते. गुढी ही विजय आणि समृद्धी आणि शुभ्रतेचे प्रतिक मानले जाते.साडेतिन मुहुर्तापैकी एक असलेल्या गुढी पाडव्याचा सण साजरा होत आहे. सणाच्या पूर्वसंध्येला बाजारपेठेत खण आणि पैठणी वस्त्रांनी सजलेल्या गुढीला मोठी मागणी दिसून आली.पारंपारिक खण आणि पैठणीच्या वस्त्रांनी नटलेली गुढी हे घरोघरी पहायला मिळते.यंदा तयार गुढीवस्त्रासह पैठणी,खण टोपी,आंब्याची डहाळी,तोरणसह कॉर्पोरेट गिफ्टसाठी खण डायरीला पसंती मिळत आहे.

गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला बाजारपेठेत रेडीमेड गुढीवस्त्र खरेदी करण्यासाठी गर्दी झाली होती. खण आणि पैठणीमध्ये बनविलेल्या गुढीच्या वस्त्रांना अधिक मागणी असून त्यासोबत आंब्याच्या डहाळ्या आणि तोरणांना मोठी पंसती मिळत आहे.गुढी वस्त्र पाचशे रुपयांपासून अधिक किंमतीला असून खण मस्तानीगुढीवस्त्र ४०० रुपये किंमतीला आहे.कलाकुसर केलेले गुढीवस्त्राची किंमत पाचशे रुपये आणि पैठणी तोरणाची ३५० किंमत आहे.आंब्याची डहाळी १०० प्रति एक पीस आहे.पैठणी,खण टोप्यांच्या किमती ५०० ते ६०० पर्यत आहे. ग्राहकांना दरवेळी काहीतरी वेगळे देण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यावसायीकांनी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यत खण आणि पैठणीपासून टोप्या बनविल्या आहेत.या राजेशाही लूक देणाऱ्या टोप्या सर्वांच्या पसंतीस पडत असून मागणी वाढली असल्याचे कला द डिझायनरच्या संचालिका वृषाली माहेगावकर यांनी सांगितले.





> यावर्षी कॉर्पोरेट गिफ्टसाठी खण वस्त्रांची मागणी वाढली आहे.विशेषतः खणातील डायरींना मोठी पसंती मिळत असून जानेवारी फेब्रुवारी महिन्यापासून राज्यासह परदेशातूनही या वस्त्रांना मागणी वाढली आहे.
> **– वृषाली माहेगावकर**
> संचालिका कला द डिझायनर

# निफाडची वाचन संस्कृती जोपासणारे श्री माणकेश्वर वाचनालय

**निफाड : आनंदा जाधव**

**जिल्ह्यातील ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या ग्रंथालयांमध्ये १०५ वर्षांची परंपरा असलेल्या निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालय हे विविध उपक्रमांद्वारे शहरातील एक सांस्कृतिक केंद्र बनलेले आहे. अनेक दानशूर व्यक्तींचे योगदान आणि निफाडचे आमदार दिलीप बनकर यांच्या विशेष प्रयत्नातून या वाचनालयाची सुसज्ज इमारत उभी राहिली आहे. साहजिकच आज रविवार दिनांक ३० रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर या इमारतीबरोबरच न्यायमूर्ती रानडे यांच्या स्मारकाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होत आहे.**



पहिले महायुद्ध संपल्यानंतर आपल्या देशात व जगात ज्या वेगाने राजकीय व इतर घटना घडत होत्या, त्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी तत्कालीन वर्तमानपत्राशिवाय अन्य साधन उपलब्ध नव्हते. त्यामुळे नागरिकांची ही गरज ओळखून ग्रामस्थांनी येथीलच छोटेखानी सभागृहात सभा घेऊन वाचनालय स्थापने करण्याचा विचार मांडला व त्यासंबंधी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी दिवंगत चिंतामण गाडगीळ, विष्णुपंत सोनवणे व भाऊसाहेब उगावकर या त्रिमूर्तींवर सोपवली. त्यामुळे या तिघांनी बुधवार दिनांक ९ जुलै १९१९ रोजी श्री माणकेश्वर वाचनालयाची मुहूर्तमेढ रोवली.

गेल्या १०५ वर्षांच्या वाटचालीत या वाचनालयाने अनेक चढउतार पाहिले. राष्ट्रीय विचारांनी व समाजसेवेचा वसा घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या नेतृत्वामुळे वाचनालयाची उत्तरोत्तर प्रगती होत गेली व आज तालुका 'अ' वर्ग वाचनालय म्हणून यास शासनाची मान्यता मिळाली आहे. आजमितीस वाचनालयात कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, विनोदी, नाटके, संकीर्ण, कविता, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षा अशा अनेक विषयांची सुमारे ३३३४३ ग्रंथसंपदा याबरोबरच १७ वर्तमानपत्रे, १४ साप्ताहिके, ७१ मासिके व ६५ दिवाळी अंक उपलब्ध असून, त्याचा सुमारे ७५९ सभासद व दैनिक वाचक लाभ घेत आहेत..तसे पाहता निफाड गावाला ऐतिहासिक महत्त्व आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या संस्थानांपैकी एक गाव ही ओळख. येथील फणसेवाडा उर्फ होळकरवाडा यांच्या रूपाने अस्तित्वात आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पावन झालेले स्थान, न्यायमूर्ती रानडे, सुप्रसिद्ध लेखक व संपादक माधव गडकरी इत्यादी व्यक्तिमत्त्व निफाडच्या मातीशी जोडले गेलेले आहेत.

त्यापैकी महाराष्ट्राचे सर्वज्ञ व्यक्तिमत्त्व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जन्मस्थळी राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा संकल्प केला असून, त्यासाठी त्यांचे जन्मस्थळ असलेली ३२५ चौरस मीटर जागा वाचनालयाने ०६/०६/२००९ रोजी फरोक्त खरेदी केलेली आहे. तर दिनांक १५/०८/२०१० रोजी नूतन इमारत भूमिपूजन करून लगेचच बांधकाम सुरुवात करण्यात आली. सुमारे एक कोटी २५ लाख खर्च अपेक्षित असलेल्या बांधकामास आजपर्यंत न्यायमूर्ती रानडे स्मारक व नूतन वास्तू ७२०० स्केअर फुटांचे बांधकामास एक कोटी रुपये खर्च आला असून, न्यायमूर्ती रानडे यांचे पणतू कै. रमाकांत विद्वांस व कैलासवासी वसुधाताई आपटे यांनी न्या. रानडे यांचा अर्धाकृती पुतळा वाचनालयास भेट दिला. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाद्वारा राजाराम मोहन राय प्रतिष्ठान कोलकाता यांच्याकडून रुपये २३ लाख १२ हजार ६९८ रुपये हे दुसऱ्या मजल्याचे काम करण्यासाठी अनुदान रूपाने मिळाले होते. पहिला मजला व गेस्ट रूमची फ्लोअरिंग संरक्षक भिंत व न्यायमूर्ती रानडे स्मारकाचे काम आदी उर्वरित कामासाठी निफाड विधानसभा क्षेत्राचे आमदार दिलीपकाका बनकर यांनी मंजूर केलेल्या तीस लाख रुपये निधीतून पूर्ण करण्यात आले आहे.

वाचनालयास अ वर्ग मिळावा म्हणून निफाड भूषण स्वर्गीय शांतीलालजी सोनी यांनी शांतीनगर येथे चार गुंठ्याची जागा एक हजार रुपये फरोक्त खरेदीखत करून वाचनालयास दिली आहे.

महत्वाचे



## वैनतेय विद्यामंदिरात 'गुढी माझी सुंदर' उपक्रम

**निफाड :** चैत्र शुद्ध प्रतिपदा हा दिवस भारतीय संस्कृतीत नवे संकल्प करून प्रगतीकडे वाटचाल सुरू करण्याचा हा दिवस आपण गुढीपाडवा म्हणून साजरा करतो. या दिवशी विजयाचे प्रतीक म्हणून घराच्या अंगणात गुढी उभारली जाते. भारतीय संस्कृतीची माहिती देत निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी गुढी उभारून नववर्षाचे स्वागत केले. शिक्षक गोरख सानप यांनी कार्यानुभव अंतर्गत गुढी माझी सुंदर हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांकडून आकर्षक गुढ्या तयार करून घेतल्या. सानप यांनी गुढीत वापरले जाणारे नवीन वस्त्र, कडुनिंब, हार, कलश, काठी हे वापरण्यामागचे महत्व व आध्यात्मिक कारण समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने गुढ्या सजवून नवीन वर्षांत वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, सहकार्य, प्रेम, समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रप्रेम या नैतिक मूल्यांची जोपासणा करण्याचा संकल्प केला. चिमुकल्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, संस्थेचे संस्थापक विश्वस्त ॲड. आप्पासाहेब उगांवकर, सचिव रतन वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे निफाड पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, विस्तार अधिकारी एल. के. भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता अहिरे, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.

## विषारी औषध सेवनाने तरुणाचा मृत्यू

**सिन्नर :** तालुक्यातील मऱ्हळ येथे ३६ वर्षीय युवकाने विषारी औषध सेवन केल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. म्हाळू लहानू कुटे असे मृत तरुणाचे नाव आहे. म्हाळू आपल्या राहत्या घरात विषारी औषध सेवन केल्याने त्यास उपचारासाठी नातेवाइकांनी संगमनेर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, नुकताच उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी वावी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास हवालदार बैरागी करत आहेत.

## प्रहारचे मावळे रायगड आंदोलनात



**नाशिकरोड :** रायगड येथील राज्याचे माजी मंत्री बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनात स्वखर्चाने नाशिक तालुक्यातील जवळपास ग्रामीण व शहरी भागातील ६० दिव्यांग बांधवांनी जिल्हाध्यक्ष रवींद्र टिळे, जिल्हा संपर्कप्रमुख संतोष मानकर, तालुका सचिव यशवंत सापुते, नाशिक शहर विभागप्रमुख राजेंद्र गायकवाड, विभागप्रमुख ललिता पवार यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. तालुकाध्यक्ष शरद नरवाडे, महिला तालुकाध्यक्ष, तान्हूबाई खांडबहाले ॲड. भारती महाजन, त्रंबक कड, कल्पेश करंजकर, दत्ता मांडे, दशरथ गबाले, मधुकर कसबे, दत्ता रिकामे, संतोष कांडेकर, रघुनाथ कटाळे, गौरव भावसार, गोविंद देसाई, साहेबराव बंद्रे, निंबा महाजन, नंदकिशोर बैरागी, दिलीप सोनवणे, निवृत्ती जाधव, धोंडीराम बोराडे, माणिक काकड, अर्चना खांडबहाले, राहुल जाधव, जगदीश बेरड, रामहरी बोराडे आदींसह सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भगूर शाळेत गुढीपाडवा, रमजान ईद सण



**नाशिकरोड :** नाशिक तालुक्यातील भगूर प्राथमिक विद्यामंदिर शाळेत पुस्तकांची गुढी उभारून गुढीपाडवा व रमजान ईद सणाच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी हेमंत काशीकर, कैलास भोर उपस्थित होते. यावेळी काशीकरांनी व पाटील यांनी विद्यार्थ्यांना गुढीपाडवा व रमजान ईद सणाचे महत्त्व सांगितले. उषा आव्हाड यांनी खंडग्रास सूर्यग्रहणाची घडण्याची भौगोलिक व वैज्ञानिक कारण सांगितले. सूत्रसंचालन महेंद्र महाजन तर आभार विजया चतुर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना अडके, महेंद्र महाजन, विजया चतुर, माया सिसोदिया, उषा आव्हाड इत्यादी शिक्षकांनी प्रयत्न केले.



## सिंहस्थानिमित्त पत्रके वाटून जनजागृती

**इंदिरानगर : वार्ताहर**

नाशिककर म्हणून सिंहस्थ कुंभमेळा आयोजनात आपलाही खारीचा वाटा असावा, या हेतूने श्री आदियोगी फाउंडेशन या सामाजिक संस्थेने गुढीपाडव्याचा मुहूर्त साधून नाशिकच्या गंगाघाटावरून जनजागृती अभियानाला सुरुवात केली. फाउंडेशनच्या वतीने जनजागृतीपर पत्रके गंगाघाट परिसरात वाटली.

फाउंडेशनचे सचिव नितीन पाटील यांच्या संकल्पनेतून गुढीपाडवा व मराठी नववर्षाचे औचित्य साधून एक शुभेच्छापत्र तयार करून त्याचे वाटप गंगाघाटावर आलेल्या भाविक, पर्यटक व स्थानिक नागरिकांना करण्यात आले. शुभेच्छापत्रात त्र्यंबकेश्वर-नाशिकचे धार्मिक तथा पौराणिक महत्त्व,हरित कुंभाची गरज, पर्यावरणाचे रक्षण आदी बाबींचा उल्लेख करून सिंहस्थरूपी शिवधनुष्य सर्वांनी मिळून उचलण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. येत्या दोन वर्षांत सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त श्री आदियोगी फाउंडेशनमार्फत विविध स्पर्धा व उपक्रम आयोजित करून जनजागृती अभियान राबविणार असल्याचे नितीन पाटील यांनी सांगितले. उपक्रम यशस्वीतेसाठी फाउंडेशनच्या मनीषा बोरसे-पाटील, संदीप नागरे, अनिता अहिरे, भारती जाधव, रेखा बागुल, जयश्री मोरे व ओम खैरनार प्रयत्नशील होते.

# मुसळगाव औद्योगिक वसाहतीत ५ ठिकाणी घरफोड्या

## दोन ठिकाणांहून साडेतीन लाखांचा ऐवज चोरीला

**सिन्नर : प्रतिनिधी**





मुसळगाव औद्योगिक वसाहतीतील नागरी वस्तीत शुक्रवारी (दि.२८) रात्री चोरट्यांनी धुमाकूळ घातला. तब्बल ५ ठिकाणी बंद घरांचे कुलूप आणि कडीकोयंडे तोडून तेथे घरफोडी केली. त्यातील दोन ठिकाणांहून साडेतीन लाखांचा ऐवज चोरीला गेला. एका घरातून पाच हजारांची रोकड लांबवली असून, उर्वरित दोन ठिकाणी मात्र चोरट्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले.

मुसळगाव औद्योगिक वसाहतीला लागून सिन्नर - शिर्डी महामार्गाच्या उजव्या बाजूला असलेल्या जेबी टॉवरमध्ये दुसऱ्या मजल्यावर वास्तव्यास असलेले राजेंद्र तुळशीराम जाधव (५०) हे उन्हाळा असल्याने आपल्या कुटुंबीयांसमवेत गच्चीवर झोपण्यासाठी गेले होते. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या फ्लॅटचे कुलूप आणि कडीकोयंडा तोडून आत प्रवेश करत तिथून नेकलेस, दोन अंगठ्या, ब्रेसलेट, दोन मंगळसूत्र, ७ हजारांची रोकड असा सुमारे दोन ते अडीच लाखांचा ऐवज चोरून नेला. त्यांच्याच समोरील फ्लॅटमध्ये वास्तव्यास असलेले भास्कर भीमा पाटोळे (५०) हे रात्रपाळीवर कामावर गेले होते. तर त्यांची पत्नी चंद्रकला या मुसळगाव येथील जुन्या घरी झोपण्यासाठी गेल्या होत्या. त्यांच्याही बंद घराचे कुलूप आणि कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करत एक तोळ्याचा सोन्याचा नेकलेस, ५ ग्रॅम वजनाचे कानातले टॉप्स घेऊन पोबारा केला. सोन्या-चांदीच्या सध्याच्या बाजारभावानुसार त्यांचाही सुमारे दीड लाखांचा ऐवज चोरीला गेला. एका डब्यात ठेवलेली सुमारे ७० हजार रुपयांची रोकड मात्र चोरट्यांच्या हाती लागली नाही. दरम्यान, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले असून, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### एका ठिकाणी बदलले कपडे

या इमारतीपासून शंभर मीटर अंतरावर असलेल्या आणखी तीन बंद घरांमध्ये चोरट्यांनी घरफोडी करत चोरीचा प्रयत्न केला. भाड्याने राहणारे सागर रोंगटे यांच्या खोलीतून पाच हजार रुपयांची रोकड चोरट्यांनी लांबवली. तर त्यांच्या शेजारील गोपाळ भागडे यांच्या घरात असलेले नवे कपडे चोरट्याने परिधान करत स्वतः च्या अंगातील कपडे याच घरात टाकून दिले. योगेश डांगे यांच्या घरीही चोरट्यांनी घरफोडीचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे कपडे बदलणाऱ्या या भुरट्या चोरट्यांचा मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस कसा माग काढतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### श्वान पथकाने काढला महामार्गापर्यंत माग

एकाच वेळी चार ठिकाणी घरफोड्या झाल्याने मुसळगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, हवालदार नवनाथ चकोर, गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. त्यानंतर श्वानपथक आणि ठसेतज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. श्वानाने सिन्नर – शिर्डी मार्गावर असलेल्या उड्डाणपुलाखालील चौफुलीपर्यंत माग काढला. तेथून चोरटे वाहनाने फरार झाले असावे, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.



## उद्योग, व्यापारासाठी व्हिएतनाम येथे अनेक संधी उपलब्ध

### व्हिएतनामचे व्यापारी प्रतिनिधी खा यांचा दौरा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन निमा व व्हिएतनाम येथील व्यापारी प्रतिनिधी आयोजित खरेदीदार आणि विक्रेता तसेच प्रत्यक्ष उद्योगांच्या भेटीसाठी श्री. खा हे आज नाशिक दौऱ्यावरती आले आहेत. निमा अध्यक्ष आशिष नहार व श्रीकांत पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

व्हिएतनाम येथे उद्योग व व्यापारासाठी अनेक संधी असल्याचे निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी सांगितले. भारतीय डाक विभागाने सुरू केलेल्या विदेशी पार्सल सुविधा केंद्राला खा व निमा पदाधिकाऱ्यांनी भेट दिली. सुला वाइन फॅक्टरी, गुरुदक्षिणा हॉल मधील आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल तसेच रायझिंग एक्सपोर्टर्स अकॅडमी येथे जवळपास पन्नास उद्योजकांसोबत संवाद साधून उत्पादनाचे परीक्षण केले. उद्या देखील सिन्नर, पिंपळगाव, ओझर अशा अनेक लघुमध्यम उद्योगांना भेटी आयोजित केल्या आहेत. सदर भेटीगाठीत बैठकीला आशिष नहार, मनीष रावल, राजेंद्र आहिरे, राजेंद्र वडनेरे,संतोष मंडलेचा,श्रीकांत पाटील, मिलिंद राजपूत, भावेश मानक, जयदीप राजपूत, तुषार चौधरी, स्वप्नील देवकर, भावेश वाघ आदी उद्योजक उपस्थित होते.

## शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वडिलांवर हल्ला करण्याचा प्रयत्न

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



पाथर्डी फाटा परिसरातील आर. के. लॉन्स समोरून चारचाकी वाहनातून जाणाऱ्या शिवसेना उबाठा गटाचे पदाधिकारी मदन डेमसे यांच्या वडिलांनी विनाकारण हॉर्न का वाजवता, असा जाब विचारण्याचा राग येऊन चार गुंडांनी त्या ज्येष्ठ नागरिकावर धारदार तीक्ष्ण हत्याराच्या सहाय्याने धक्काबुक्की करत चाकूच्या सहाय्याने प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न केला. यानंतर गुंडांनी त्यांच्या चारचाकी वाहनावर दगडफेक करून वाहनाची तोडफोड करीत परिसरात दहशत माजवल्याचा प्रकार घडला. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नववर्षाच्या पूर्वसंध्येला हा प्रकार घडल्याने घटनास्थळी बघ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दरम्यान या प्रकरणातील दोघा संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

याबाबत इंदिरानगर पोलिसांनी दिलेली अधिकृत माहिती अशी की, नववर्षाच्या पूर्वसंध्येला शिवसेना उबाठा गटाचे पदाधिकारी आणि बांधकाम व्यावसायिक मदन डेमसे यांचे वडील पाथर्डी गाव येथील प्रगतिशील शेतकरी बाकेराव मामा डेमसे (वय ६०, रा. पाथर्डी गाव) हे शनिवार दिनांक २९ मार्च रोजी त्यांच्या चारचाकी गाडीतून पाथर्डी येथील आर. के. लॉन्सकडून त्यांच्या कार्यालयात जात असताना पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या चार जणांनी अचानक जोरजोरात हॉर्न वाजवला. यावेळी डेमसे यांनी विनाकारण हॉर्न का वाजवतात अशी विचारणा केली असता या चारींनी घटनास्थळी जोरजोरात आरडाओरड करून धुमाकूळ घातला. यावेळी या गुंडांनी डेमसे यांना धक्काबुक्की केली. दरम्यान, यातील एकाने त्यांच्यावर धारदार शस्त्र काढून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी स्वतःचा जीव वाचवला, मात्र एवढ्यावरच न थांबता या गुंडांनी त्यांच्या लाल रंगाच्या चारचाकी वाहनाची दगडाच्या सहाय्याने तोडफोड करीत परिसरात धुमाकूळ घातला. नववर्षाच्या पूर्वसंध्येला ऐन सायंकाळी हा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. घटनेची माहिती मिळताच इंदिरानगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल होत त्यांनी यातील दोन जणांना ताब्यात घेतले आहे. अन्य दोन जण फरार झाले आहे. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत पाथर्डी ग्रामस्थांनी तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधींनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात संबंधित गुंडांवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, संशयितांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

> गेल्या आठवड्यात पाथर्डी फाटा परिसरातील दामोदर चौकात एका १९वर्षीय तरुणावर चार ते पाच गुंडांनी धारदार कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना ताजी असताना त्या गुन्ह्यातील संशयित आरोपी अजूनही फरार असताना आता पुन्हा एकदा ज्येष्ठ नागरिकावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. या घटनेमध्ये ज्येष्ठ नागरिक बालंबाल बचावले असले तरी या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

## २५ हेक्टर ९७ आर क्षेत्र विना अधिसूचित करणार

### माळेगावच्या शेतकऱ्यांच्या लढ्याला यश, ३८ व्या दिवशी उपोषण थांबवले

**सिन्नर : प्रतिनिधी**



माळेगाव औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक १ मधील कलम ३३(३) नुसार प्रस्तावित सक्तीच्या भूसंपादन क्षेत्रापैकी रस्त्याकरिता आवश्यक क्षेत्र वगळून २५ हेक्टर ९७ आर इतके क्षेत्र विना अधिसूचित करण्यासंदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कार्यवाही हाती घेतली आहे. या मागणीसाठी गेल्या ३८ दिवसांपासून सातपूर उद्योग भवन समोर उपोषण करणाऱ्या माळेगावच्या शेतकऱ्यांच्या लढ्याला यश आले असून, शनिवारी (दि.२९) एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन महेंद्र सांगळे यांच्यासह शेतकऱ्यांनी उपोषण थांबवले.

माळेगावच्या औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक एकमधील भूसंपादन क्षेत्रापैकी २५.९७ हेक्टर क्षेत्र विना अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव उच्च अधिकार समिती समोर सादर करण्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली आहे. उच्च अधिकार समितीच्या आगामी बैठकीत या प्रकरणाचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूसंपादन विभागाचे महाव्यवस्थापक संदीप आहेर यांनी उद्योग विभागाच्या सहसचिवांना यासंदर्भात विनंती केली आहे. तसे पत्र उपोषणकर्ते महेंद्र सांगळे यांच्यासह आंदोलन शेतकऱ्यांना एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी पाटील यांनी शनिवारी दुपारी दिल्यानंतर शेतकऱ्यांनी उपोषण थांबवले. अंधेरी येथील मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशिष्ट कालावधीत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन शेतकऱ्यांना दिले.

### तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

दरम्यान, दिलेल्या मुदतीत जमिनी विना अधिसूचित करण्याची कार्यवाही न झाल्यास त्याचप्रमाणे भूसंपादन प्रक्रियेतील घोटाळ्याची चौकशी, फेरमूल्यांकन व संबंधितांना अदा केलेल्या रकमेची सक्तीने वसुली न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा या शेतकऱ्यांनी दिला आहे.



**मुंबई : मुलुंड ते वडपेदरम्यान इलिव्हेटेड कॉरिडॉरची उभारणी करावी, यासंदर्भात केंद्रीय मंत्री नामदार नितीन गडकरी यांना पत्र देऊन चर्चा करताना माजी खासदार हेमंत गोडसे आदी.**

## मुलुंड ते वडपेदरम्यान इलिव्हेटेड कॉरिडॉरची उभारणी करावी

### मा. खा. गोडसेंची ना. गडकरींकडे मागणी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग -३ वर आजमितीस हेवी वाहतूक असल्याने वडपे ते मुलुंड हे वीस किलोमीटरचे अंतर कापण्यासाठी तास- दीड तासाचा वेळ लागतो. वडपे परिसरातील महामार्गाला समृद्धी महामार्ग जोडला गेल्याने भविष्यात वडपे ते मुलुंड या दरम्यान मोठी वाहतूक कोंडी होणार आहे. भविष्यातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आळंदी ते नाशिक फाट्याच्या धर्तीवर वडपे ते मुलुंड या दरम्यान इलिव्हेटेड कॉरिडॉरची उभारणी करण्याची मागणी माजी खासदार हेमंत गोडसे यांनी काल केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नामदार नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग तीनवरील नाशिक ते मुंबई या प्रवासासाठी पाच ते सहा तास लागतात. महामार्गावर सर्वत्र सुरू असलेली रस्त्यांची कामे, महामार्गावरील जड वाहतुकीमुळे महामार्गावर सर्वत्र होत असलेली वाहतूक कोंडी यामुळे वाहनधारक आणि प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर कुचंबणा होत आहे. या दरम्यान वडपे ते मुलुंड यादरम्यानचे अंतर अवघे २० किलोमीटर असतानाही दरम्यानच्या प्रवासास तास ते दीड तास लागत असल्याने वाहनधारक त्रस्त होत आहेत. याबरोबरच पेट्रोल, डिझेलची ही मोठ्या प्रमाणावर नासाडी होत आहे.

भविष्यात वडपे -मुलुंडदरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी आज माजी खासदार हेमंत गोडसे यांनी दिल्लीत जात केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नामदार नितीन गडकरी यांची भेट घेतली.

नागपूरहून मुंबईकडे जाणारा समृद्धी महामार्गही वडपे शिवारातील राष्ट्रीय महामार्ग -३ ला जोडला आहे. भविष्यात नागपूरकडून मुंबईकडे जाणारी वाहतूकही वडपेमार्गे मुलुंडला जाणार आहे. परिणामी, सहा महिन्यांनंतर वडपे ते मुलुंड या दरम्यान वाहतुकीची भीषण अशी कोंडी होणार असल्याचे माजी खा. गोडसे यांनी नामदार गडकरी यांच्या निदर्शनास दिले. यावर पर्याय म्हणून वडपे ते मुलुंड या दरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉअरची उभारणी करण्याची मागणी माजी खा. गोडसे यांनी काल केंद्रीय दळणवळण मंत्री नामदार नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

## विजेच्या अनधिकृत वापरात अधिकाऱ्यांचा सहभाग?

### ४५ दिवसांनंतरही कारवाई नाही

**सिडको : विशेष प्रतिनिधी**




द्वारका उपविभागीय कार्यालयाच्या हद्दीत दिवसाढवळ्या विजेचा मोठ्या प्रमाणत अनधिकृत वापर व्यावसायिक व वीज ठेकेदारांकडून होत आहे. तक्रारीनंतरही कार्यवाही होत नसल्याने अधिकारी सदर प्रकारात सहभागी असल्याची शंका सामाजिक कार्यकर्ते व तक्रारदार दर्शन लड्ढा यांनी व्यक्त केली आहे. सामान्य जनतेकडून जबरदस्तीने वीजबिल वसुली करण्यात येते व धनदांडग्यांना मात्र नियम धाब्यावर बसवून विजेचा अनधिकृत वापर करून दिला जातो. यामुळे महावितरणमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठला असून, नाशिकला कुणी वाली आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मागील काही वर्षांत महावितरणमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठलेला असून, नियम धाब्यावर बसवत मनमानी कारभार महावितरण अधिकारी करत असल्याचे वारंवार निर्देशनास आलेले आहे. विजेचा वापर व बिलासंबंधी नियम सामान्य नागरिकांना असून, ठेकेदार व बड्या व्यावसायिकांसाठी अधिकाऱ्यांनीच नियम धाब्यावर बसवल्याची शंका सामाजिक कार्यकर्ते व तक्रारदार दर्शन लडढा यांनी बोलून दाखवली आहे. पाथर्डी विभागात अनेक ग्राहक असे आहेत. ज्यांच्याकडे स्वतःच्या नावाची स्थायी वीज जोडणी नाही, परंतु तरी मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे विजेचा वापर सुरू आहे. त्यांच्यावर कार्यवाही करण्यास अधिकारी टाळाटाळ करत असल्याने अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय निर्माण होतो, तसेच अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर व मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्यामुळे हतबलतेने काही दिवसांपासून बघायची भूमिका त्यांनी घेणे पसंत केले आहे. अनधिकृत वीज वापर अधिकाऱ्यांच्या सहभागाशिवाय शक्य नाही, असे सामाजिक कार्यकर्ते व तक्रारदार दर्शन लडढा यांनी मत व्यक्त केले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारीवरून मागील २ महिन्यांत करोडो रुपयांचा विजेचा अनधिकृत वापर पकडला गेला असून, त्याबाबत चर्चा नसल्याने शंकेला वाव आहे. तरी मुख्य अभियंता सदर प्रकारावर कार्यवाही करतील का? असा प्रश्न उपस्थित होतो.

> महावितरण कंपनीतील अधिकाऱ्यांच्या मनमानी
>
> 
>
> कारभारामुळे नाशिकला योग्य ते विजेचे इन्फ्रास्ट्रक्चर उभारले गेलेले नाही. महावितरण अधिकाऱ्यांमध्ये भ्रष्टाचार करण्याची स्पर्धा लागलेली आहे. अनधिकृत विजेचा वापरामुळे सदर विजेचा खर्च हा सामान्य नागरिकांच्या खिशातून वसूल केला जातो. अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांच्या सूचना अधिकारी ऐकत नसल्याने दयनीय अवस्था नाशिकच्या महावितरण कार्यालयाची झालेली दिसते.
>
> **– दर्शन लड्ढा,**
> सामाजिक कार्यकर्ते

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी
■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, रविवार, दि. ३० मार्च २०२५

# गुढीपाडव्यामुळे सोन्याला झळाळी!
## भाव वाढूनही ग्राहकांची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

सण, लग्नसराईनिमित्त सोने खरेदी केले जाते. गुढीपाडव्याच्या सणाला ९१ हजार आणि २२ कॅरेट ८३ हजार ७५० रुपये सोने दर प्रतितोळा गाठला आहे. चांदीने लाखाचा टप्पा ओलांडला असला तरी मागणी कायम असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.



सोने आणि चांदी हे नेहमीच गुंतवणूकदारांसाठी सुरक्षित पर्याय मानले जातात. मागील काही वर्षांत किमतीच्या वाढीने हे पुन्हा सिद्ध झाले आहे. २020 मध्ये ज्यांनी १ लाख रुपये सोन्यात गुंतवले, त्यांची गुंतवणूक आज ५ वर्षांत २.०४ लाख रुपये झाली आहे. म्हणजेच या कालावधीत सोन्याच्या किमतीत सरासरी १०४% वाढ झाली आहे. प्रतिदिन सरासरी ५७ रुपये किमतीत वाढ झाल्याचे दिसून येते. ज्यामुळे सोने हा एक उत्तम रिटर्न देणारा पर्याय ठरला आहे. चांदीच्या किमतींमध्ये देखील अप्रतिम वाढ झाली आहे. मार्च २०२० मध्ये चांदीचा भाव ४०,२०० रुपये प्रति किलो होता आणि आज तो १,०४,००० रुपये प्रति किलो झालेला आहे. चांदीने जवळपास अडीच पटींनी परतावा दिला आहे आणि हा परतावा सरासरी ८८ रुपये प्रति दिन इतका आहे.

विशेष म्हणजे, मागील काही दशकांचा अभ्यास केल्यास, सोन्याच्या आणि चांदीच्या किमतींमध्ये सतत वाढ होत असलेली दिसते. गुंतवणुकीसाठी सोने आणि चांदी हे दोन्ही स्थिर आणि दीर्घकालीन पर्याय ठरले आहेत, ज्यामुळे आगामी काळात त्यांच्या किमतीतील वाढीचा फायदा घेत अनेक गुंतवणूकदार फायदा घेऊ शकतात.

> आगामी ४-५ वर्षांत सोन्याचे भाव २ लाख रुपये प्रति तोळा आणि चांदीचे भाव २,००,००० रुपये प्रति किलो पोहोचू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे गुंतवणूकदारांना आणखी चांगला लाभ मिळण्याची आशा आहे.
>
> - **चेतन राजापूरकर,** अध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र आयबीजेए


- झाडे लावा, जीवन वाचवा
- झाडे ही माणसाचे मित्र, उगारू नका त्यांच्यावर शस्त्र
- झाडे: निसर्गाची फुफ्फुसे
- झाडे ही निरोगी ग्रहाची गुरुकिल्ली आहे
- झाडांना आलिंगन द्या, भविष्याला आलिंगन द्या
- जतन केलेले झाड कमावलेला ग्रह आहे
- हिरवाईचे रक्षण करा, आपल्या जीवनाचे रक्षण करा
- चला फांद्या वाढवूया; आज एक झाड लावूया

सर्वांना गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. प्रदीप गायकवाड

सर्वांना गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा!
नितीन दत्तात्रय डोंगरे
कर सल्लागार व प्रमाणित लेखापरिक्षक
अध्यक्ष, नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन

सर्वांना गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा!
सौ.अस्मिता प्रमोद देशमाने
महानगरप्रमुख - शिवसेना महिला आघाडी
प्रो.प्रा.प्रमिता एंटरप्राईजेस

सर्वांना गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा!
डॉ. मुकेश्वर शकुंतला पांडुरंग मुनशेट्टीवार
सह सचिव नॅब महाराष्ट्र नाशिक

सर्वांना गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा!
राजापूरकर सराफ
पिढ्यान पिढ्यांचा सोनार

ऋतूने बदलतं हिंदू वर्ष
नवं वर्ष येताच येते बहार..
सगळीकडे दिसतो हा सुंदर बदल
असं असतं नववर्षाचं हे पर्व ...
गुढीपाडवा
आणि
हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा..!
श्री. व्यंकटेश नानासाहेब मोरे
भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा, महाराष्ट्र राज्य
अशोकस्तंभ शिवजन्मोत्सव मित्र मंडळ

सर्वांना गुढीपाडव्याच्या खूप खूप शुभेच्छा!
नं. १ निकालाची परंपरा
सरकारी नोकरीसाठी सर्वोत्तम पर्याय
१० वी/१२वी/पदवी नंतर काय?
स्पर्धा-परिक्षा सर्वोत्तम पर्याय...
सोमवारपासून नवीन बॅचेस सुरू होत आहेत.
उपलब्ध कोर्सेस
MPSC-UPSC
PSI/STI/ASO
EX-PSI / Clerk-Combine
पोलीस भरती/तलाठी स्वतंत्र बॅचेस
सरळसेवा (ग्रामसेवक/आरोग्य सेवक (क्लर्क)
CDS/NDA/ARMY/Railway/CGL
१० वी /१२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ३ वर्षे/५ वर्षे कोर्सेस
मुला मुलींना स्वतंत्र राहण्याची सोय. (होस्टेल) उपलब्ध
डॉ.भाऊसाहेब हिरे
मोबा.९३२५७१९८६८
मोटीवेशन ॲकेडमी
चौथा मजला लॉटर कॅपिटल बिल्डींग, अशोकस्तंभ नाशिक

श्री माणकेश्वर वाचनालय, निफाड, जि. नाशिक
शासनमान्य तालुका 'अ' वर्ग वाचनालय
नूतनवास्तु व न्यायमूर्ती रानडे स्मारक
गुडीपाडवा, रविवार दि. ३० मार्च २०२५ वेळ : सायं ४.३० वा.
ठिकाण : श्री माणकेश्वर चौक, निफाड
उद्घाटन समारंभ
शुभहस्ते
मा. आ. दिलीपराव शंकरराव बनकर
सदस्य निफाड विधानसभा
कार्यक्रम अध्यक्ष
मा. रमेशचंद्र त्र्यंबकराव घुगे
संस्थापक चेअरमन- सहकार महर्षी घुगे (गुरुजी) भाग्यश्री सह. पतसंस्था, निफाड
प्रमुख पाहुणे
मा. खा. भास्करराव मुरलीधर भगरे
दिंडोरी लोकसभा मतदार संघ
मधुकर शेलार
अध्यक्ष
श्री माणश्वर वाचनालय, निफाड
बोरस्ते आर्किटेक्ट्स
राहुल ठाकरे
श्रीराज बिल्डकॉन ॲण्ड असोसिएट, नाशिक
श्री. राहुल काशिनाथ धात्रक
इंजिनियर
श्री. अमोल शंकरराव जाधव
इंजिनियर
सुयोग इन्फास्ट्रक्चर
नाशिक
प्रमुख पाहुणे
मा.राजाराम छबु शेलार - प्रथम नगराध्यक्ष-नगरपंचायत, निफाड
मा.राजेंद्र सदाशिव डोखळे - संचालक-कृउबा समिती, लासलगाव
मा.शिवाजी कारभारी ढेपले - चेअरमन-निफाड वि.का.सेवा सह. संस्था, निफाड
मा.राजेंद्रकुमार चंपालालजी राठी - चेअरमन-निफाड अर्बन को.ऑप.बँक निफाड
मा. अनिल रंगनाथ पा. कुंदे - तालुकाध्यक्ष-शिवसेना तथा उपनगराध्यक्ष निफाड नगरपंचायत, निफाड
मा.डॉ. कविता नितिन धारराव - नगराध्यक्षा-निफाड नगरपंचायत, निफाड
मा.सागर सुरेश पा. कुंदे - नगरसेवक निफाड नगरपंचायत, निफाड
मा.दिलीप दत्तु पा. कापसे - माजी उपसरपंच ग्रामपंचायत, निफाड
मा.महेश हरिभाऊ जंगम - विश्वस्त श्री क्षेत्र गुड्डापुर, कर्नाटक
मा.परशरामजी साठे - नाशिक जिल्हा अध्यक्ष-मातंग आघाडी रिपाई आठवले
मा. सचिन जोपुळे साहेब - सहा.ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग
मा.सुनिल जगताप साहेब - जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नाशिक
डॉ. सौ. मेघा जंगम - उपाध्यक्ष
प्रा. बाळासाहेब कापसे - चिटणीस
राहुल दवते (सर) - सहचिटणीस
दत्तात्रय उगांवकर - हिशोब तपासणीस
ॲड. प्रविण ठाकरे - संचालक
तनविर राजे - संचालक
सुहास सुरळीकर - संचालक
नईमखान पठाण (ग्रंथमित्र) - संचालक
निळकंठ कुंदे - संचालक
बाळासाहेब कर्डीले - संचालक
प्रा. डॉ. महेश बनकर - संचालक
सुजाता तनपुरे - संचालिका
राजेंद्र खालकर - स्विकृत संचालक
राजेंद्र सोमवंशी - स्विकृत संचालक
सुनित चिखले - स्विकृत संचालक
नितीन बनसोडे - ग्रंथपाल
आनंदा जाधव 9764625806

रविवार गांवकरी
# आस्वाद
रविवार, दि. ३० मार्च २०२५


आज गुढीपाडवा, मराठी नववर्षाचा हा दिवस त्याच्या सर्वांना शुभेच्छा, उद्या होणाऱ्या रमजान ईदच्याही सर्वांना शुभेच्छा. महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार गेल्या अनेक शतकांपासून दोन्ही धर्माचे त्याचप्रमाणे इतरही धर्मांचे अनुयायी राज्यात सुखनैव राहात आहेत. एकमेकांच्या आनंदात व दु:खात सहभागी होण्याची संस्कृती महाराष्ट्राने जपली आहे. इतर राज्यांप्रमाणे इथे द्वेषाचे राजकारण चालत नव्हते. पक्ष, जातपात, धर्म पंथ यातील भेद हे व्यक्तिगत पातळीवर होते. त्याचा समाजाच्या घट्ट धाग्यांवर फारसा परिणाम होत नव्हता. आजही होत नाही. केवळ समाजमाध्यमावर जाणूनबुजून द्वेष पसरवणारे काही महाभाग सोडले तर आजही राज्यात सर्वसामान्य नागरिक एकमेकांबरोबर सुखात आहेत.



# गुढीपाडवा

**गुढीपाडवा सण आहे मोठा**
**नाही इथे आनंदाला तोटा ।**
**सण साजरा करा आनंदाने**
**सकलां जवळ करा प्रेमाने।।**

आज चैत्र शुद्ध प्रतिपदा! आजचा दिवस हा गुढीपाडवा म्हणून भारत देशात सर्वत्र मोठ्या प्रमाणात आंब्याच्या पानांनी व विविध रंगांच्या फुलांनी घरादाराला सजविले जाते. गुढी उभी केली जाते. गुढीला नैवेद्य दाखविला जातो. घरीदारी सर्वत्र अगदी मंगलमय, आनंदी वातावरण असते. वर्षभरात अत्यंत पवित्र व शुभ असे साडेतीन मुहूर्त आहेत. त्यापैकीच गुढीपाडवा हा एक पूर्ण मुहूर्त आहे. या दिवशी सर्वजण नवीन वस्त्रांची, वस्तूंची, वाहनांची व घराची ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे खरेदी करत असतात. गुढी हे सर्व मंगल मांगल्याचं प्रतीक आहे. गुढीची जी आभूषणं आहेत, त्यांचं महत्त्व खालीलप्रमाणे आहे. शुभकलश यशश्री, कडुनिंब आरोग्य, पुष्पहार मांगल्य,जटीची साडी वैभव, वेळूकाठी सामर्थ्य, संकल्प



## प्रासंगिक

**मधुकर निलेगावकर**
९४२१३७५६९१

सुपारी, स्थैर्य पाट,आसन, संस्कृती रांगोळी, श्रीफळ सिध्दी, हळदकुंकू सौभाग्य, घरासमोर गुढी उभारली असता इतक्या विविध गोष्टींची समृद्धतता माणसांना प्राप्त होते. हजारो वर्षांपासून भारतात ही धार्मिक संस्कृती, परंपरा अजूनही तेवढ्याच श्रध्देने आणि अगदी भक्तीभावाने चालू आहे. परंतु, इथे लक्षात घेण्याजोगी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हळूहळू या सणाचं महत्त्व पूर्वीसारखे आपुलकीचे आणि आत्मीयतेचे न राहता एक फॉर्म्यालिटी म्हणून साजरे केले जात असल्याचे दिसून येत आहे. सत्तरीच्या दशकात असलेल्या पिढीने तर हा गुढीपाडव्याचा नववर्षाचा सण तर दरवर्षी अगदी भक्तीभावाने साजरा केलेला आहेच! परंतु, सध्या, पन्नाशीला आलेली पिढी या सणांच्या बाबतीतील शेवटची पिढी म्हणावी लागेल. कारण २५ ते ३५ची पिढी ही करिअर करण्यातच गुंतलेली आहे. तसेच, वयाची पंधरा ते पंचवीसपर्यंतची पिढी ही बहुतेकपणे सीबीएसई, आयसीएसई या इंग्रजी शाळांच्या पॅटर्नमधील आहे. त्यामुळे मराठी बोलण्याकडे त्यांचा जास्त ओढा नसतो आणि धार्मिक गोष्टींकडे त्यांचा कल कमी असल्याचे दिसून आले आहे. कौटुंबिक स्तरावर जरी हे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले असले तरी सामाजिक स्तरावर मात्र सणांचे महत्त्व, मेळावे उत्सवांचे प्रमाण व लोकांचा उत्साह भरपूर प्रमाणात असल्याचे दिसून आले आहे. सामाजिक स्तरावरील ही धार्मिक स्थिती पाहता हजारो वर्षांपासून ही भारतीय सणांची संस्कृती अजून टिकून आहे व यापुढेही अशीच उत्तमरीत्या टिकून राहील असा आत्मविश्वास वाटतो. कोणीही कोणत्याही माध्यमातून शिक्षण घ्या, मग ते इंग्रजी असो अथवा मराठी परंतु, आपल्या संस्कृतीचे जतन व संवर्धन सर्वांनी केलेच पाहिजे. सो कॉल्ड स्वत:ला अत्यंत सुशिक्षित व अत्याधुनिक जीवनपद्धतीने जगणाऱ्या अशा काही माणसांना (स्त्री व पुरुष दोघांनाही) अशा पद्धतीने गुढीपाडवा सण आता साजरा करणे म्हणजे बुरसटलेला विचार वाटेल. त्यांनी असा विचार करणे हाच अशिक्षितपणा आहे. हे त्यांनी नीट लक्षात घ्यावे. ३१ डिसेंबरच्या रात्री १२वाजेपर्यंत मोठमोठे स्पीकर्स व डीजे लावून नाचणारे तरुण, तरुणी व अशा प्रकारचे इतरही लोक १ जानेवारी नवीन वर्ष साजरे करण्याच्या तयारीत वाटेल तसे अंगविक्षेप करीत नाचत गात असतात. पण, हिंदू संस्कृतीप्रमाणे आपला खरा सण हा गुढीपाडवा आहे. काहीजण म्हणतील माणूस आज चंद्रावर जाऊन पोहोचला आहे आणि हे काय जुन्या धार्मिक परंपरा! अहो! आत्ता माणूस चंद्रावर पोहोचला आहे.पण, संपूर्ण जगात फक्त भारताच्याच ऋषींनी तपश्चर्येच्या साधनेने लाखो वर्षांपूर्वीच शुक्रावर व चंद्रावर जीवसृष्टी नसल्याचे सांगितले आहे. तसेच, माणसांच्या आयुष्यात उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे या सणाचे, गुढीपाडव्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ते कुणालाही नाकारता येणारच नाही. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. सर्व भारतीय सण हे याचेच द्योतक आहेत.

तसेच, सर्व हिंदू लोक हजारो वर्षांपासून हे सण साजरे करीत आहेत. ही या भारत देशाची अखंड अशी धार्मिक व सांस्कृतिक जाज्वल्य परंपरा आहे. तसेच, ती आजतागायत टिकून आहे आणि अशीच पुढेही टिकून राहील यात शंकाच नाही. त्यामुळे या देशातील सर्व हिंदू भारतीयांनी या शेकडो शतकांपासून चालत आलेल्या आपल्या धार्मिक संस्कृतीचे जतन व गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वर्षाचे स्वागत धुमधडाक्यात साजरे केले पाहिजे.





# इतिहासाचे मंथन

## वेध



**राजेश शिरभाते**
९८६९५७८७२९
८८५०६७९५८६

सध्या आपल्या राज्यात इतिहासाचे मंथन मोठ्या प्रमाणावर होत आहे. ऐतिहासिक तथ्यांमध्ये संशोधन, त्यात बदल, काही पुरावे नव्याने मिळणे हे फार आधीपासून चालत होते. हे सारे मंथन इतिहासकारांमध्ये सुरू असे. त्यांच्यात काही वादही होत असतं. मात्र, एकंदरीतच हा व्यासंगी व सखोल अभ्यासाचा विषय असल्यामुळे सर्वसामान्य लोक व अनेक नेते अशा गोष्टींपासून दूर राहात. सध्या जे इतिहासाचे मंथन सुरू आहे, त्याचा खरा उद्देश वेगळाच असल्याचे दिसून येत आहे. इतिहास संशोधक एकमेकांची माहिती तपासतात, त्यात सुधारणा करतात, त्यात भर टाकतात, त्याला वेगळा दृष्टिकोन मिळवून देतात. सामान्य व कमी बौद्धिक कुवत व विषयाच्या अभ्यासापासून दूर असलेले लोकच यात अधिक हिरिरीने भाग घेत असल्याचे सध्या दिसून येत आहे. राज्याच्या सामाजिक हितासाठी ते नाही हेही आता स्पष्टपणे जाणवायला लागले आहे.

सध्या एकापाठोपाठ एक वाद जणू उकरून काढले जात आहेत असे दिसते. छावा नावाचा चित्रपट आला त्याने बॉक्स ऑफिसवर चांगला व्यवसाय केला. त्यात त्याने नव्या व उपलब्ध तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संभाजी महाराजांचा छळ प्रत्यक्ष दाखवला. त्यावर लागलीच प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. कोणत्याही चित्रपटावर प्रतिक्रिया देणे हे स्वाभाविक असते, मात्र चित्रपटाच्या माध्यमातून आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्याच्या आधारे एका धर्माला लक्ष्य करण्याचा प्रयत्न झाला. छत्रपती संभाजी महाराजांच्या विषयी सर्वांना आदर आहे, प्रेम आहे, निष्ठा आहे. त्यांच्या बलिदानाची जाणीव काही लोकांना आता चित्रपटामुळे झाली असेल, मात्र या आधीही अनेक पुस्तकांमधून त्यांचा इतिहास समोर आलेला आहे. त्यामुळे आताच नेमक्या प्रतिक्रिया व त्याही एका विशिष्ट हेतूने यात तरुणांनी न पडलेले बरे असे म्हणावेसे वाटते. संभाजी महाराजांच्या गुणांचा, त्याच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या कामगिरीचा, त्यांनी भोगलेल्या यातनांचा अभ्यास करावा, त्यांच्या विचारांना आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा हे अधिक चांगले आहे. एका बाजूला संभाजी महाराजांच्या नावाने राळ उठवणारे लोक जेव्हा कोरटकर नावाच्याएका माणसाने ज्याच्याकडे अनेक महागड्या गाड्या आहेत. जो राज्यात आरोपी असूनही महिनाभर लपून राहू शकतो, त्याच्या बोलण्यावर काहीच प्रतिक्रिया आली नाही. हे का व कसे झाले. वास्तविक पाहता चित्रपटात दृश्य छळ दिसला, मात्र कोरटकरच्या बोलण्यातून आपल्या महापुरुषांच्या आदर्शाच्या बाबतीत अनादराचे संस्कार दिसून आले. ते अधिक गंभीर आहे. त्याच्यावर कोणीही मत व्यक्त केले नाही. त्यावरून या राज्यात केवळ राजकीय हेतू लक्षात घेऊनच प्रतिक्रिया दिल्या जातात का, असे दिसून आले.


या साऱ्या गोष्टींचा या राज्यातील तरुणांनी वस्तुनिष्ठपणे अभ्यास करायला हवा. हे राज्य त्यांना पुढे चालवायचे आहे. यात बदल घडवायचे आहेत. या देशाची व या महाराष्ट्राची प्रतिमा उंचावायची आहे. त्यामुळे आपल्या राज्याच्या प्रतिमेशी व आपल्या सन्मानाच्या प्रतीकांबरोबर कोण काय खेळतो याचा विचार करायला हवा.

या कोरटकर नावाच्या इसमाने हे आरोप कोणा शेजाऱ्या पाजाऱ्यावर केले नाहीत. त्याने ते थेट एका प्रतिष्ठित इतिहास संशोधकावर केले आहेत. ते विचारपूर्वक करण्यात आले आहेत. इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणाऱ्यांना घाबरवण्याचा किंवा त्यांच्या मनात भीती निर्माण करण्याचा तर हा हेतू नाही ना. त्यानंतर या कोरटकराचे अनेक महागड्या गाड्यांमधील फोटो बाहेर आले. आपल्या पाठीमागे राज्यातील मोठी धनशक्ती उभी आहे असे तर त्याला त्यातून दाखवायचे नाही ना, असाही विचार येतो. त्यावर अनेकांनी निषेध व्यक्त केला नाही. हे अधिक गंभीर आहे. त्या उलट सर्वसामान्यांच्या गोष्टींवर लागलीच प्रतिक्रिया दिली जाते. त्यांना आयुष्यातून उठवले जाते. रायगडावरच्या वाघ्या कुत्र्याच्या समाधीचेही असेच मंथन सुरू आहे. कोरटकरच्या विरोधात एकही शब्दाची प्रतिक्रिया न दिलेले काही काही स्वयंघोषित विचारवंत जणू कुत्र्याने चितेत उडी घेतली तेव्हा ते तिथेच उपस्थित असल्याच्या आविर्भावात दावे करत आहेत.

या अशा लोकांपासून तरुणांनी जपून राहायला हवे. त्यांना केवळ स्वत:चा स्वार्थ साधायचा आहे. आपल्याला या राज्याची शांतता व सद्भाव जपायचा आहे. काही माणसांना व्याख्यानांना बोलावले जातात व ते तिथे अकलेचे तारे तोडतात. त्याच्यावर जाऊ नये. या देशाला खऱ्या इतिहास संशोधकांची, सर्व घटनांचे पुरावे शोधणाऱ्या अभ्यासकांची, घटनांचे वैज्ञानिक दृष्टीने अन्वयार्थ लावणाऱ्या विचारवंतांची गरज आहे. आपल्या राज्याची ती परंपरा आहे. या राज्यात अनेक अभ्यासक, संशोधक, वैज्ञानिकांची परंपरा आहे. त्याच परंपरेतील लोकांना तुमच्या भाषेत फॉलो करण्याची सध्या गरज आहे. तरुणांनी या सर्व गोष्टींचा आपल्या समोर बोलणाऱ्या व्यक्तीच्या शैक्षणिक, बौद्धिक, वैचारिक क्षमता व या आधीचे कार्य याचा विचार करून त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवावा हे बरे.

आजपासून नवे वर्ष सुरू होत आहे. सर्वत्र सणाचा उत्साह आहे. आनंद आहे. हिंदूंबरोबरच मुस्लिम समाजाच्या ईदचाही सण आहे. या राज्यात काही जण जर वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करणार असतील तर त्यांना त्याच्या जागी ठेवून आपण आपला सण आनंदाने साजरा करावा. सण व उत्सव हे एकट्याने साजरे करण्यासारखे नसतात. त्यात इतरांना सामील केल्यानंतरच त्याची लज्जत वाढत असते. आनंद वाढत असतो. ज्या दुधापासून गुढीपाडव्यासाठी श्रीखंड तयार होते, त्याच दुधापासून शिरकुर्माची खीर तयार होत असते याची जाणीव महाराष्ट्रासारख्या प्रगत, पुरोगामी व विचारी राज्याने ठेवावी. आनंद घ्यावा, द्यावा, वाटावा.

आजच्या डिजिटल युगात माहितीचा वेग खूप वाढला आहे. सोशल मीडियावर एका क्षणात काहीही व्हायरल होऊ शकते आणि त्याचा परिणाम थेट समाजावर, व्यक्तींवर किंवा संस्थांवर होतो. याच संदर्भात, स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा हे एक वादग्रस्त आणि चर्चेत असलेले नाव आहे. त्यांच्या व्यंगात्मक आणि रोखठोक बोलण्याच्या शैलीमुळे अनेकांना आनंद मिळतो, तर काहींना त्याचा फटका बसतो. त्यामुळे प्रश्न उभा राहतो. कुणाल कामरामुळे कुणाचे काम झाले?



# कुणाल कामरामुळे कुणाचे काम झाले?

## जीवनगाणे



**सीमाताई मराठे**
९०२८५५७७१८

### संशोधनाचा विषय :

कामरा याच्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा गद्दार या शब्दाभोवती राजकारण फिरण्यास सुरुवात झाली आहे. हे सर्व सहजच घडत आहे असे नाही तर घडवले जात आहे, असा संशय व्यक्त होत आहे. कुणाल कामराने जी टीका केली ती पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यावर अधिक होती. मात्र, मीडियात तिला एकनाथ शिंदे यांच्याशी जास्त जोडले गेले.

पण कुणालने या कार्यक्रमात मोदी, अमित शाह, उद्योगपती अंबानी-अदानी यांच्यावर टीका केली. शिंदे यांचा थेट उच्चार कोठेही केलेला नाही. ज्याच्यावर थेट टीका त्याचा बचाव नाही आणि ज्याचे नावही नाही त्याचा उघड बचाव ही गंमतच म्हणायची. कुणालमुळे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर भर मैदानात, सर्वांसमक्ष उतरून शिंदे यांचा जाहीर बचाव करण्याची वेळ आली. खरे तर शिंदे यांच्यापेक्षा फडणवीस यांनी कुणालवर अधिक संतापायला हवे.

याखेरीज टीका करणे यास आक्षेप घ्यावा तर कुणालपेक्षाही अधिक कडवट टीका राज ठाकरे यांनी अवघ्या २४ तासांपूर्वी केली. त्याची दखल घेणे आले.

विधानसभेत सगळेच खोक्याभाई असे सणसणीत विधान राज ठाकरे यांनी केले. तथापि २८८ पैकी एकाही विधानसभा सदस्यास त्यात काही गैर असल्याचे वाटले नसावे. कारण त्यावर कोणीच आवाज उठवला नाही. हा मोठा संशोधनाचा विषय आहे.

### एकनाथ शिंदे यांना डॅमेज करण्याचा प्रयत्न :

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत होते. तेव्हा अनेकांनी त्यांना गद्दार म्हणून डिवचले. तेव्हा एकनाथ शिंदे यांना काडीचाही फरक पडला नाही. उबाठा सेनेचे कार्यकर्ते-पदाधिकारी जे एकनाथ शिंदेंना गद्दार म्हणत होते. त्यातील अनेकांनी सकाळी शिंदेंना गद्दार म्हणायचे व रात्रीतून त्यांच्याच पक्षात प्रवेश घ्यायचा. स्वत:ला पावन करून घ्यायचे, असा सपाटा लावला होता. त्यावेळी देखील एकनाथ शिंदेंनी त्यांना मोठ्या हृदयाने जवळ केले. त्यांना पदे दिली. पक्षात जबाबदारी दिलीत. तेव्हा आज इतका ताण एकनाथ शिंदे यांनी कधीही घेतला नव्हता. कामरा फक्त निमित्त; खरे राजकारण देवेंद्र फडणवीस करत आहेत. एकनाथ शिंदे यांना राजकीय डॅमेज करण्याचा प्रयत्न केला जात आहे. किंबहुना शिंदेंचे राजकारणातील पंख कापण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### गद्दार म्हणजे नेमके काय :

गद्दार म्हणजे काय तर छत्रपतींच्या आदर्शांशी, महाराष्ट्रातील या पवित्र मातीशी, महाराष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांशी, संतांच्या विचारांशी, समाजसुधारकांच्या केलेल्या कार्यांचा विसर पडून स्वत:च्या स्वार्थासाठी या भूमीशी आणि येथील भूमिपुत्रांशी केलेला विश्वासघात म्हणजे गद्दारी.

राजकारणात मात्र गद्दार, दगाबाज, विश्वासघात या शब्दांना महत्त्व नाही. राजकारणात या सामान्य गोष्टी आहेत. एकनाथ शिंदे हे गद्दार आहेत असे एकवेळ जरी मान्य केले तरी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसमधून अनेक मोठे नेते भाजपवासी झालेत. ते सर्व गद्दार होते काय? यासारखे अनेक प्रश्न जनतेच्या मनात उपस्थित होतात. मात्र, या प्रश्नांना काहीही अर्थ नाही. राजकारण हे बेरीज व वजाबाकीचा खेळ असतो. त्यामुळे यात सुज्ञ जनतेने गुंतून जाऊ नये.

### विनोद व राजकारण यातील सीमारेषा :

कामराने राजकीय विषयांवर भरभरून भाष्य केले आहे, त्यामुळे स्टँडअप कॉमेडी आणि राजकारण यांच्यातील सीमारेषा अधिक स्पष्ट झाली. विनोद म्हणजे केवळ मनोरंजन नसून, तो सामाजिक आणि राजकीय स्थितीवर भाष्य करण्याचे एक प्रभावी साधन आहे, हे त्याच्या कामामुळे अधोरेखित झाले.

कुणाल कामरामुळे अनेकांच्या करिअरला चालना मिळाली. काहींना नवा दृष्टिकोन मिळाला, तर काहींना अडचणीही आल्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विनोदाच्या मर्यादा आणि सामाजिक भान या मुद्द्यांवर नव्याने विचारमंथन होऊ लागले. त्यामुळे कुणी त्याला आदर्श मानो वा टीका करो, पण एक गोष्ट नक्की- त्याच्या उपस्थितीमुळे समाजात संवाद घडतो, प्रश्न विचारले जातात आणि चर्चेला नवे आयाम मिळतात, हेही खरे.




## समाजभान

॥ प्रा. अलका सानप

तरुण-तरुणींनो वेळीच जागे व्हावे...! विवाह ही एक गंभीर समस्या होत चाललीय! जागे व्हा! अशी एक पोस्ट वाचनात आली होती. खरंय.. किती गंभीर समस्या आहे ही. बाप रे... आमच्या वेळेस नव्हते असे आणि ते सर्वांच्या हिताचे होते असे म्हटले तर काहीच चूक नाही.कारण आजची तरुण तरुणींची लग्नाबद्दलची मतं पाहता नकळत मनात विचार घर करून राहिला.

पुढील किमान ५/६ वर्षाच्या काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण-तरुणी मोठ्या संख्येने दिसतील. वृध्द झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीचं न झाल्याने वृद्धाश्रमामध्ये जाण्याची किंवा एकाकी आयुष्य काढण्याची वेळ जवळ येत आहे शंका नाही.



# विवाह : एक गंभीर समस्या

अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी ही पिढी स्वतः बरोबर पालकांना सुद्धा आयुष्याच्या वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंताना जन्म देत आहे.कारण मुला-मुलींचे लग्न झाल्यावर पालक गृहस्थाश्रमाची जबाबदारी पुढील पिढीकडे सूत्रे देऊन आपल्या निवृत्ती आयुष्याचे नियोजन करु शकतात. आता मागील पिढी आणि आताची विवाह न झालेली पिढी यांचे निवृत्तीचे आयुष्य खडतर असण्याची शक्यता खूप जास्त आहे.फक्त पैसा, प्रॉपर्टी, दागदागिने, गाडया, हॉटेलिंग, डेटला जाणे, म्हणजेच सर्व सुख नाही. कौटुंबिक आयुष्यात चांगली-वाईट आव्हाने आणि संकटे यांना सामोरे जाताना पती आणि पत्नी एकमेकांचा मानसिक आधार असतात. जीवनात पूर्णत्वाचा खऱ्या अर्थाने आनंद मिळवायचा असेल तर वाट्याला आलेलं दुःख किंवा प्रतिकूलता सुद्धा सुसह्य होते. ती एकमेकांच्या पूरक भूमिकेमुळे आणि परस्परांतील सामंजस्यामुळे.

शिक्षणाची पात्रता, आर्थिक कमाई,जमीन जुमला, राहण्यासाठी स्वतःचे घर, सौंदर्याच्या व्यापक कल्पना, ठराविक भौगोलिक क्षेत्रात म्हणजे मुख्यत: पुणे, मुंबई, नाशिक येथेच वास्तव्य असावे. याचा दुराग्रह, हट्टापायी विवाहाचे वय निघून चालले आहे. तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. तेही आपणचं आपल्यावर लादून घेतलेल्या अटी मुळेच होत आहे,हे या पिढीला लक्षात कसे येत नाही,याचेच वाईट वाटते.

खरं तर बायोडाटा बघुन किंवा त्याचा अभ्यास करून त्यातील प्रतिकूल मुद्द्यांवर कशी मात करता येईल हे बघून विवाहासाठी कशी पार्श्वभूमी तयार करता येईल, याचा विवाहेच्छुक तरुण-तरुणींनी गंभीरपणे विचार करायची वेळ आली आहे.


ठराविक बाबींचा अत्याग्रह हा आपल्या वैवाहिक आयुष्याला मारक आणि बाधक ठरत आहे आणि कल्पनांचे इमले रचूनही वास्तवात एकाकीपणे जगायची वेळ जवळ येत आहे. आयुष्याची संध्याकाळ जवळ आल्यावर हा विचार करण्यात आपण एवढी मोठी चूक केली आहे. त्याचे परिणाम वैयक्तिक आयुष्यावर तर पडणारचं आहेतच पण सामाजिक संतुलन सुध्दा बिघडणार आहे. आपल्या हिंदू संस्कृतीला सुद्धा याबाबी मारकच ठरत आहेत. स्त्री-पुरुषांच्या आयुष्याची पूर्णता ही वंशवृद्धी, मुलांचे संगोपन, शिक्षण, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम या पायऱ्यांतूनच होत असते.

आपण हिंदू संस्कृतीच्या विवाह संस्थेचा पाया आणि ढाचा उखडून टाकत आहोत. आपले अपेक्षांचे दुराग्रह आपल्याला कुठे घेऊन जात आहेत? यावर गंभीरपणे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. लोकसंख्येत वृद्ध लोकांचे प्रमाण वाढल्याने जपान सारखे प्रगत, विकसित राष्ट्र गंभीर परिणामांना सामोरे जात आहे. हिंदू घरातील वैयक्तिक विवाहाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टिकोनातून किती गंभीर आहे हे तेथील परिस्थितीचा अभ्यास केल्यास कळू शकेल.

शेवटी जी तडजोड वय वाढल्यावर करणे अपरिहार्य आहे. त्यासाठी सगळे तारुण्य पणाला लावून अपेक्षांचे ओझे किती काळ वाहायचे एवढे करुन पुन्हा आपण केलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्याचं नाहीत तर मग इतका वेळ म्हणजे वाया गेलेली अमूल्य तारुण्याची वर्षे, घेतलेले कष्ट आणि वाढलेल्या वयाचे काय..? हा प्रश्न उपस्थित होतो. आजकाल कित्येक विवाह जुळविणाऱ्या संस्था, दुवे आहेत त्यांच्याशी संपर्क साधून लवकरात लवकर वैवाहिक आयुष्याची स्थिरता कशी प्राप्त करता येईल.यासाठी काय पावले उचलावीत लागतील याचा मुळापासून विचार करायला हवा.

आज अपेक्षेचे ओझे वाढवून नाहक हिंदू मुला-मुलींचे वय निघून जात आहे. याची खंत ना मुलांना ना समाजाला ना पालकांना.आजचा काळ ,आजची परिस्थिती काही वर्षांनी तशीच राहिल,हे सांगता येत नाही.आजचा पैसा, सुख,ऐश्वर्य, आरोग्य काही वर्षांनी तसच्या तसच राहिल हे सुध्दा सांगता येत नाही. म्हणून पालकांनो आणि मुला-मुलींनो भविष्याचा विचार करुन लवकरात लवकर निर्णय घ्या. अपेक्षांच्या जंजाळात अडकून न राहता समजदारीने निर्णय घ्या. योग्य वेळेत, योग्य वयात विवाहाचा निर्णय करा. वय बसून राहत नाही. काळ निष्ठुर आहे. चुकीला त्याच्याकडे माफी नाही. आणि नंतरच्या पश्चातापाला अर्थ नाही. आयुष्य खूप सुंदर आहे,ते जगण्यासाठी आणि त्याचा हवा तसा आस्वाद यावा त्यासाठी आपल्याला वेळीच जागे होणे आवश्यक आहे. वेळीच योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. बघा तरुण तरुणींनो, योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन आपले स्वतःचे आयुष्य सुंदर करण्याचा प्रयत्न करा.

# अदावत



## मनातलं

विशाखा बल्लाळ



चहुंकडे गजऱ्याचा, पर्फुमचा सुवास, जरीच्या, वरखाच्या, टिकल्यांच्या, पैठणीच्या, पेशवाईच्या, कांजीवाराम च्या, सिल्कच्या, नऊवारी, सहावारी साड्यांचा सुळसुळाट, कोणी सोन्याचे तर कुणी मोत्यांचे, कोणी कोणी खड्यांचे, तर कोणी मण्यांचे दागिने घालून, लगबग लगबग... इकडून तिकडे, तिकडून इकडे... त्यातच ज्येष्ठ मंडळींचे हळू हळू चालणं, त्यांना हाताला धरून कोणी नात वा नातू सोफ्यावर बसवणं, चिमण्या पोरांची लपाछपी, खेळणे, बागडणे, मधूनचं गुरूजींचा खरज्या तला आवाज.....

अरे किती दिवसांनीं पाहिलं तुला.. उंच झालास रे बाबांपेक्षा

अगं, ती नमुताईंची नात गेली कां ग जर्मनीला... Scholarship मिळाली हो... हुशार बाई तिची नातवंडे बरं, अगं राधिका, इकडे ये.. काकांना नमस्कार कर हो वाकून.. काका, ही माझी नातसून.. तुम्ही नव्हता ना लग्नाला.. इतकं उल्हास पूर्ण, आनंदाचं वातावरण चहुंकडे... स्टेज गुलाबी आणि शुभ्र रंगांच्या फुलांनी सजलेले... सोनेरी अक्षरांत वधू वरांची नावे लिहिलेली... स्टेज च्या बाजूलाच सुबकतेने दोन तीन करवली, एखादी तरुण वहिनी सर्वांनी कला त्मकतेने भांडी कुंडी, डिनर सेट ठेवलेले...

अंजिरी रंगाची पैठणी, त्यावर मोत्यांची सर गळ्यांत घातलेली,

गळ्या लगत सुरेखसा नेकलेस, त्याला साजेसा सगळा शृंगार केलेला, केसांत मोगरा आणि अबोली ह्याचा सुरेख सा गजरा माळलेला.... गोऱ्या पान हातात हिरव्या बांगड्या आणि लाल लाल मेंदी....

पण लक्ष मात्र सारखं मेन दरवाज्या वर.... लवकर येतो म्हणाला होता... म्हणजे प्रत्यक्ष नाही... पण डोळ्यांनी बोलला होता... त्याचं असंच असायचं सगळं... घडघड मोकळे पणाने कधी काही बोलताच येत नव्हतं...

सगळं आपलं वागण्या तून आणि डोळ्यांतून समोरच्याने समजून घ्यायचं...

इतका वेळ वाट पाहून, वाकडी मान करू करू तिची मान दुखायला लागली.

अगं, दिव्या काय करतेस तिकडे... काकू आवाज देताहेत तुला... मुंडावळ्या तू ठेवल्यास ना...

आणि ती पटकन आत गेली...

कोणता ड्रेस घालावा, झब्बा कुर्ता, कां शेरवानी, कां हा न्यू ब्लू शर्ट... तिच्या आवडीचा रंग... शर्ट वर जाकीट घालू कां नको....

छया.... काय त्रास आहे खरंच? कसं तरी करून ब्लू शर्ट, पॅन्ट आणि जाकीट... आणि तिला आवडत असलेला गॉगल घालून घाई घाईत घड्याळात पाहून तो पायऱ्या उतरू लागला... बापरे... आता बाईसाहेब चिडणार जाम... धारदार नाकाचा शेंडा लाल लाल होणार.. कसा तिचा राग काढणार आपण... आपल्याला तर साधं बोलता येत नाही... तिला कसं मनावणार.... घामच फुटला त्याला... कसंतरी करून कार्यालय गाठलं... दहा पायऱ्या त्याला दहा डोंगरासारख्या वाटणार होत्या...

अरे यार... एक मोठी फॅमिली... पार आजी आजोबा पासून ते नातवंड, पतवंड पर्यंत चा परिवार... त्याच्या पुढेच उतरला.. मग काय... त्यांच्या चालीने चालायचं म्हणल्यावर अजून उशीर... कसंतरी गड जिंकला.. हॉल मध्ये प्रवेश तर मित्र मंडळींनी घेरलं... हातात अक्षता, गुलाब फुल, पालथ्या हातावर अत्तर.... त्याची नजर मात्र तिच्या शोधात.... कुठे गेली यार.. कोणती साडी घातलीये, कशी दिसत आहे..... कुठे गेलीये... सगळ्या साळकया माळकयां.. दिसताहेत... लेकिन हमारी जान... त्याला मोठ्याने ओरडवंस वाटलं..

तू छुपी है कहाँ.... मैं तडपता यहाँ...

बराच वेळ झाला.. हुश्य.... ती जिन्यातून खाली येतांना ओझरती दिसली... आणि नेमकं त्याचं वेळेस त्याला.. अरे, तू नवऱ्याचा जिगरी ना.... मग फेटा तो कॉम्पल्सरी....

मुलीकडंच्यांना भगवे आणि मुला कडंच्यांना लाल फेटे... अजून नाही आला हा शुभ मंगल सावधान .... मंगलाष्टक सुरु झाली... आणि नवऱ्या मुलीच्या मागे उभी असलेली ती.... आणि नवऱ्या मुलाच्या मागे लाल फेटा बांधून अजूनच हँडसम दिसत असलेला... तिला पाहून एकदम खुश झालेला... तिला आपल्या डोळ्यांत सामावून घेणारा.... तो पाहताच.... तिचे डळे भरून आले....आणि आसवं तिच्या गालावरून वाहू लागली.... हे अश्रू... त्याला पाहिल्या नंतरचे होते... कां त्याचे आपल्या वरचे प्रेम पाहून होते..

कां असंच आपल्याला देखील आई बाबांना सोडून जायचं आहे... म्हणून होते... हे तिलाच समजत नव्हतं.... हे तिलाच समजत नव्हतं....



## प्रासंगिक

॥ पंकज पाटील
९८५०४३०५७९

# फट फट फटफटी..



मोठ्या शयरातच नायी तं खेड्यापाळ्याच्या गलीबोळातून भकभक, धडधड बोंबलनारी बुलेट नाई तं दुसरी येखांदी फटफटी भलकशा जोरात चालोयनारे, आताच मिसुरडे फुटेल पोट्टे (झेंडू) तुमाले कदी ना कदी दिसले अस्तिनच. आजकाल जडीतडी फटफट्या भुर्ररर उडोयनाऱ्या या झेंडू पोराईची पैदास लैच वाडेल दिसते.

फटफटी चलोयता तं अशे काईच्या मायी होबकाळलं पुढे करत कंबळल्याले वाकोयत तिरपे-तारपे बसून फटफटी हाकलता की त्यायलें पाऊन मूळव्याद नै तं फिस्तूला तरी झाला आशीन नई तं मंग संडास तरी लागलीच अशिन असं वाट्टे.

त्याईच्याच मस्तीत चूर अशेल या पोट्ट्या सोट्ट्याईले दुसऱ्याईच्या तं नैच पन सोताच्या जीवाची बी काई फिकीर नसते. अशी गाडी हानता की ज्याच्या बाजूनं जातीन त्याच्या जिवाले घोर लावून जाता.

अन दुसऱ्या कुनाले धक्का लागला तं यायची कैच गलती बिलती नस्तेच.

दुसऱ्या कोनाचं सोडा पन सोताच्या बापाचं बी आयकून घ्याचं मन नसनाऱ्या दिवट्या झेंडूले जर कोनं हटकलं तं, याच्यातले समदे राक्षेस लग्येच जागी होता! हा झेंडू मंग सामनेवाल्याले शिवीगाय करून तेचा उद्धारबी करते. जादा झाली तं त्याचेसारख्या अनखीन चार मोकाट सांडाईले फोन घुमवून हातापाई कऱ्याले बोलोयासाटी तो तैयारच असते. इतकं करूनबी येखांदा झेंडू झोक जाऊन फटदिशी बुडावर आपटून अल्टी कल्टी पल्टी होतेच. गिरे तो बी टांग उपर असा हेका आंगात भिनेल असल्यानं ह्ये तडून

भुर्रर्रकन कल्टी माऱ्यात पटाईत असता.

काई काई झेंडूची तं कोंबडाकट हेअर स्टाईल, भली मोठी दाढी डोयावर काया कंदील अन कानात इअर फोनच्या गुंड्याबी खोचेल अस्ता. येखांदा झेंडू वयानं धोड तं येखांदा अकलेचा कांदाबी अस्ते.

वायतुकीचेच नाई तं आवाजाचे बी नियम फियम धाब्यावर बसाळून या झेंडूच्या फटफटीचा भोंगा टरकच्या भोंग्यालेबी मांगे टाकत भलत्याच डेसिबलनं खिंकायत अस्ते.

रस्त्याईच्या कानाकोपऱ्यातल्या कट्ट्याईपासून तं पानपट्ट्याईवर ह्ये झेंडू हमखास दिस्ता. ईमलच्या पुड्या तोंडात कोंबून गुटख्याचा तोम्बरा खाली करता करता पचक्या पिचकाऱ्याईनं दुकानाईच्या पायऱ्या, त्या येटोयातले समदे फुटपाथ रंगोयात सोताले ह्ये लयच धन्य समजता.

जरशेक धेंड दिस्नाऱ्या झेंडुंचे घोस चे घोस आडोश्याले येखांद्या खोपट्यात घुसून जोर लावत ठुटकं वढूवढू छातीचे पिंजरे ढिल्लेढसक कऱ्यात अलगच हरिक मानत अस्ता.

राजेहो, गरम गॅसवर उतू जावून राह्येल या लानपनाच्या (बालपणाच्या) अन नासून रायलेल्या तरूनपनाच्या या फटफट्या सरक्या लाईनवर नै आल्या तं कदी वाटोयं होईन त समजणार बी नै!

पुरुषोत्तम नाईक

# साप्ताहिक राशिभविष्य

दि. ३० मार्च ते ५ एप्रिल २०२५

### मेष : आर्थिक समृध्दी

या सप्ताहात गुरू अनुकूल आहे. रवी, मंगळ, बुध, शुक्र, राहू, केतू प्रतिकूल आहेत. शनीची साडेसाती सुरू आहे. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च मोठ्या प्रमाणावर वाढतील. नोकरदार व व्यापारी, व्यावसायिकांना अडचणींना तोंड द्यावे लागेल. प्रवास टाळा. वाहन जपून चालवा. प्रकृती सांभाळा.

### वृषभ : आर्थिक लाभ

या सप्ताहात मंगळ, रवी, मंगळ, बुध, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. पैसा येईल. मात्र मौजमस्तीत मोठाईक्यात निघून जाईल. मानसिक अस्वस्थता राहील. नोकरदारांच्या छोट्या चुकाही अडचणीत आणतील. व्यापारी, व्यावसायिकांना आर्थिक लाभ होतील. प्रकृती जपा.

### मिथुन : अचानक धनलाभ

या सप्ताहात मंगळ, बुध, शुक्र, शनि अनुकूल आहेत. गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. या सप्ताहात अचानक धनलाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नोकरदार व व्यापारी, व्यावसायिकांना अडचणीतून वाटचाल करावी लागेल. आरोग्य चांगले राहील. काळजी घ्या.

### कर्क : अचानक धनलाभ

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. मात्र शेअरमध्ये लाभ होतील. नोकरदार व व्यापारी, व्यावसायिकांनी मनावर संयम ठेवून निर्णय घेणे आवश्यक ठरेल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. सन्मानप्राप्तीचे योग येतील. आरोग्य चांगले राहील.

### सिंह : आर्थिक दिलासा

या सप्ताहात गुरू संमिश्र आहे. रवी, बुध, मंगळ, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. येणे वसूल होतील. आर्थिक दिलासा मिळेल. नोकरदार व व्यापारी, व्यावसायिकांना अडचणीतून वाटचाल करावी लागेल. शासकीय, कोर्ट, कचेरीची कामे खोळंबतील. वाहन जपून चालवा. स्थावराचे व्यवहार अडचणीत येतील. प्रकृतीची काळजी घ्या.

### कन्या : जोरदार आगेकूच

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि अनुकूल आहेत. राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. नोकरदार व व्यावसायिकांची जोरदार आगेकूच सुरू राहील. बांधकाम व्यावसायिक व्यवसाय तेजीत चालेल. नवीन घर, वाहन खरेदी होईल. प्रकृती चांगली राहील.

### तूळ : धाडस टाळा

या सप्ताहात मंगळ, बुध अनुकूल आहेत. रवी, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. नोकरदारांनी धाडस टाळणे इष्ट ठरेल. वाद टाळा. संयम पाळा. व्यापारी, व्यावसायिकांनी महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकणे लाभदायक ठरेल. प्रकृतीची काळजी घ्या.

### वृश्चिक : मंगलवार्ता कळतील

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. नवग्रहांची पूर्ण कृपादृष्टी आपल्यावर असल्याने आपल्या मनातील इच्छा पूर्ण होण्यात कुठलीही अडचण येण्याची शक्यता नाही. चंद्रभ्रमणे प्रतिकुल आहेत. आर्थिक समस्यातून मार्ग निघतील. खर्च आटोक्यात राहतील. मंगलवार्ता कळतील. शासकीय, कोर्ट, कचेरीच्या कामात यशप्राप्ती होईल. आरोग्य चांगले राहील.

### धनु : समीकरणे जुळतील

या सप्ताहात बुध, शुक्र अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. रवी, शनि, राहू, केतू, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. या सप्ताहात प्रवास टाळा, वाहन जपून चालवा. राहत्या घराबाबत प्रश्न निर्माण होतील. कौटुंबिक वादविवाद सामंजस्याने सोडवा. नोकरदारांना अडचणीतून मार्ग काढावा लागेल. व्यापारी, व्यावसायिकांची समिकरणे जुळतील.

### मकर : बढती मिळेल

या सप्ताहात रवी, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. नवग्रहांचा वरदहस्त असल्याने अडचणी दूर होतील. कामे मार्गी लागतील. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. नोकरदारांना बढती मिळेल. व्यापारी, व्यावसायिकांचे उपक्रम यशस्वी होतील. मनावर संयम ठेवा. वाद टाळा. संघर्ष प्रसंगी श्रीरामनाम स्मरण करा. प्रकृती चांगली राहील.

### कुंभ : अडचणींवर मात

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती, मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. अडचणींवर मात कराल. आर्थिक दिलासा मिळेल. मदतीचा हात सहाय्य करेल. नोकरदारांना अडचणी सतावतील. व्यापारी, व्यावसायिकांचे अडकलेले पैसे वसूल होतील. आरोग्य प्रश्नांकडे नीटपणे लक्ष पुरवा.

### मीन : काळजी घ्या

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र, मंगळ अनुकुल आहेत. शनिची साडेसाती, गुरू संमिश्र आहे. राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. नोकरदारांवर कामाचा जास्त ताण पडेल. व्यापारी, व्यावसायिकांनी विचारपूर्वक नियोजन करावे. शासकीय, कोर्ट, कचेरीच्या कामास विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रकृतीची काळजी घ्या.

धरण उशाला, कोरड घशाला! अशी स्थिती सध्या शहराची झाली आहे. मागील आठवडा नागरिकांसाठी जणू अग्निपरीक्षा घेणाराच होताा. सलग दोन दिवस पाणीपुरवठा न झाल्याने त्यातून नागरिकांना झालेल्या तारांबळीचे चित्र शहरभर दिसून आले. पाणीप्रश्नावरून सत्ताधारी भाजपसह विरोधी पक्षातील ठाकरेंची सेना व मनसेने आयुक्तांसमोर थयथयाट करत शहरातील पाणीबाणीला प्रशासन जबाबदार असल्याचा रोख व्यक्त केला. मात्र, वर्षानुवर्षे पालिकेत सत्तेची फळे चाखणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी पाणीपुरवठ्यासाठी काय केले ? त्यामुळे पाणीटंचाईचे पाप कुणाचे? प्रशासनाएवढेच राजकीय नेते जबाबदार नाहीत का? असा सवालही केला जाऊ लागलाय. दरम्यान, मराठवाड्याची तृष्णा भागविण्याचे काम गंगापूर, दारणा धरणातून होते, त्याच नाशिकमधील नागरिकांवर पाण्यासाठी आंदोलन करण्याची वेळ आल्याने यास जबाबदार कोण? असा रोष नाशिककरांच्या तोंडी आहे. नागरिकांनी यंदा विक्रमी २४६ कोटींचा कर व चाळीस कोटींची पाणीपट्टी भरूनही पाण्यासाठी मारामार करावी लागत असल्याने कर तरी का भरायचा, असा संताप व्यक्त केला जातोय. पेटलेल्या पाणीटंचाई समस्येतून मनपा प्रशासन मार्ग कसा काढणार हे पहावे लागणार आहे.

# पाणीटंचाई; कुणाचे पाप?



मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडून शहरात दररोज ५७० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. लोकसंख्येच्यादृष्टीने हे मुबलक पाणी आहे. मात्र, पुरवल्या जाणाऱ्या पाण्यापैकी नागरिकांना अवघे साठ टक्केच पाणी जात असल्याचे धक्कादायक चित्र आहे. यात पाणीगळतीसोबतच पाणीचोरीचा कळीचा मुद्दा आहे. त्रयस्थ संस्थेमार्फत महापालिकेने पाण्याचे ऑडिट केले असता त्यावेळी काही बाबी समोर आल्या. शहरातील बहुतेक जलवाहिन्या जीर्ण झाल्याने पाणीगळती होते. मात्र, पाणीगळती दहा टक्के असली तरी उर्वरित तीस टक्के पाणी मुरतेय कुठे? याचे अद्याप उत्तर नाही. तत्कालीन उपायुक्त श्रीकांत पवार यांच्यासह मनपा अधिकाऱ्यांनी अनधिकृत नळकनेक्शन घेणाऱ्यांवर कारवाईला सुरुवात केली. मात्र, तेथेही राजकीय नेत्यांनी अडथळे आणले. कारवाईप्रसंगी कोणी ना कोणी राजकीय नेत्यांचे कार्यकर्ते, जवळचे असल्याने या मोहिमेत मिठाचा खडा टाकण्याचे पाप केले. सिडको, सातपूर भागातील पाणी अनियमितता व कमी दाबाने होण्यास व्हॉल्व्हमन कारणीभूत असल्याचे बोलले जाते. सदर व्हॉल्व्हमन काही राजकीय नेत्यांच्या सांगण्यावरून काही प्रभागात जास्त तर काही ठिकाणी कमी पाणी सोडले जाते. पंचवीस वर्षांपासून नोकरभरती न झाल्याने विविध विभागाचे काम आउटसोर्सिंगद्वारे केले जात असून, यात व्हॉल्व्हमनदेखील आहे. शहरात पाणी सोडण्यासाठी महापालिकेची सक्षम यंत्रणा नसल्याचे यावरून दिसून येते. व्हॉल्व्हमनवर अवलंबून असल्याने पाणीपुरवठा करताना दुसऱ्याच्या इशारा व काम होत असल्याने याचा फटका सर्वसामान्यांना बसतो आहे. अमृत दोन योजनेंतर्गत तब्बल साडेतीनशे कोटींच्या जलवाहिन्यांचे जाळे विस्तारले जाणार आहे. परंतु, वर्षभरापासून निविदा रखडली आहे. जलवाहिन्यांचे काम झाले तर पाणीगळतीचा प्रश्न सुटेल. वरील कारणे शहरातील पाणीटंचाईला कारणीभूत आहे. दरम्यान, जायकवाडी धरण समूहात ६५ टक्क्यांपेक्षा पाणीसाठा असल्यास मेंढीगिरी समितीच्या शिफारशीनुसार खाली पाणी सोडावे लागते. अनेकदा पाणी सोडण्यास नाशिकसह नगरमधून विरोध होतो. मात्र, कितीही विरोध असला तरी जायकवाडीत पाणीसाठा कमी असल्यास मराठवाड्याला पाणी सोडावेच लागले.

गेल्या वर्षी दुष्काळ असूनही नाशिकमधून तीन टीएमसी पाणी सोडावे लागले. यंदा वरुणराजाची कृपा झाल्याने आणि जायकवाडीत मुबलक पाण्यामुळे आवर्तन करण्याची वेळ टळली. खाली पाणी सोडण्याची वेळ न आल्याने नाशिककरांना यंदा मुबलक पाणी मिळेल. कुठेही पाणीटंचाई भासणार नाही, असा भाबडा समज नाशिककरांचा होता. मात्र, महापालिका प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. मागील काही दिवसांपासून सहाही विभागातील नागरिकांना पाण्यासाठी



लक्ष्यवेध
|| गोरख काळे
९५४५६१५३५५

आंदोलने, निवेदने द्यावी लागत आहे. शुक्रवारी आयुक्तांसमोर पाणीप्रश्नावरून मांडलेल्या समस्या पाहता प्रशासनाने आता तरी दखल घेतली तर बरे होईल, अशी म्हणण्याची वेळ रहिवाशांवर आली आहे. यापूर्वी सिडकोतील पाणीप्रश्नावरून ठाकरे गटाचे माजी नगरसेवक डी. जी. सूर्यवंशी, शिंदे सेनेत गेलेले दीपक दातीर यांच्यासह शिंदे सेनेने महापालिकेतच ठिय्या दिला होता. प्रभागातील पाणीप्रश्न सोडवत नाही तोवर उठणार नसल्याचा पवित्रा महिलांनी घेतला. पाणीपुरवठ्याचे तेव्हाचे कार्यकारी अभियंता रवींद्र धारणकर यांच्या कारभारावर तेव्हा आंदोलकांनी आरोप केले होते. पंधरा दिवसांत पाणीप्रश्न सोडवण्याचे आश्वासन बोळवण केली गेली. मात्र, पुढे याप्रश्नी काहीही होऊ शकले नाही. काहीच दिवसांपूर्वी पाथर्डी फाटा परिसरातील नागरिकांनी माजी नगरसेवक भागवत आरोटे यांच्या नेतृत्वाखाली शहर अभियंता संजय अग्रवाल यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले गेले. त्याआधीही जेलरोडमधील महिलांचा हंडा मोर्चा असो की, सिडको, पंचवटीतील आंदोलन असो. शहरातील पाणीप्रश्न पेटताच राहिला आहे. उलट दिवसेंदिवस पाणीप्रश्न गहन होत चालला आहे. कोट्यवधीचा कर भरूनही पाणी मिळत नाही. यामुळे नागरिकांचा संतापाचा उद्रेक होतो आहे. याचीच प्रचिती शुक्रवारी महापालिकेत दिसून आली. नाशिकमधून जाणारी गोदावरी अहिल्यानगर जिल्ह्यासह मराठवाड्याला संजीवनी देते. परंतु नाशिकमधील नागरिकांना महापालिका पुरेसे पाणी देत नसल्याचे वास्तव आहे. पाठपुरवठा करूनही पाण्याची सोय होत नाही. शनिवार, रविवारी दोन दिवस पाणीपुरवठा खंडित झाल्याने शहरात अभूतपूर्व गोंधळ उडाला. मात्र, याव्यतिरिक्तही शहरातील सिडकोसह पाथर्डी फाटा, पंचवटी, अंबड या भागात पाण्याची समस्या कायम आहे. स्मार्ट सिटीने स्काडा मीटर बसविण्यासाठी व काही ठिकाणच्या जलवाहिन्यांचे काम हाती घेतले. मात्र, अनागोंदी कारभार अशी ओळख असलेल्या स्मार्ट सिटीमुळे पुन्हा एकदा नाशिककरांना फटका बसला. स्मार्ट सिटीमुळे शहरात पाणीबाणी स्थिती उद्भवल्याचा दावा महापालिकेने करत हात वर केले. मनपा आयुक्त खत्री यांनी शहरात पाणीपुरवठ्याकडे लक्ष देऊन प्रश्न सोडवण्याची खात्री दिली असून, नागरिकांची देखील खत्रींवर काहीकाळ खात्री असेल. परंतु बोलाचाच भात बोलाचीच कढी असे पाणीप्रश्नावरून होता कामा नये म्हणजे झाले. नागरिकांना रस्ते, पार्किंग, वाहतूक कोंडी या समस्येने बेजार करून ठेवले असून, त्यात पाणी समस्येची भर पडली आहे.





सध्याच्या काळात व्यक्त होण्यासाठी सहज एका क्लिकवर माध्यम उपलब्ध झाल्याने प्रत्येक जण आपल्या भावनांना वाट मोकळी करून देत आहे. नामांकित व्यक्तींसह सामान्य नागरिकदेखील सोशल मीडियावर व्यक्त होत आहे. आपले विचार व्यक्त करण्याचा अधिकार राज्यघटनेने जरी आपल्याला बहाल केलेला असला तरी व्यक्त केलेल्या विचारातून सामाजिक तेढ निर्माण होणार नाही, सामाजिक सलोखा बिघडणार नाही आणि कोणाच्या धार्मिक भावनांना ठेच पोहोचणार नाही याची काळजी प्रत्येकानेच घेणे आवश्यक आहे. मात्र, सध्या असे होताना दिसत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली वाटेल ते बोलले जात असल्याने वादंग निर्माण होत आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार थैमान घालत आहे. प्रत्येकाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे निश्चितच रक्षण व्हायला हवे. मात्र, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्वैराचार यामधील सीमारेषेचे भान प्रत्येकाने बाळगणे आवश्यक आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य की स्वैराचार?

राज्यात गेल्या काही दिवसांत घडलेल्या प्रकरणानंतर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा चांगलाच चर्चेत आला. पत्रकार प्रशांत कोरटकर यांनी महाराजांविषयी केलेले आक्षेपार्ह वक्तव्य व कॉमेडियन कुणाल कामरा याने केलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवरील विडंबन गीत यामुळे राज्यात वादंग निर्माण झाले. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली विचार व्यक्त केल्यानंतर सामाजिक तेढ निर्माण होत असेल तर अभिव्यक्तीवर मर्यादा असाव्यात का, असाही प्रश्न आता चर्चिला जात आहे. दुसरीकडे सोशल माध्यमातून कोणाही विषयी सहज व्यक्त होत असताना, खालच्या पातळीवर जात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली ट्रोलिंग केले जाते. त्यामुळे यानिमित्ताने ट्रोलिंग करण्याची अभिव्यक्ती आहे का, असा प्रश्न निर्माण होतो आहे.

विनोदवीर कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासंदर्भात विडंबन गीत केले. या गाण्यावरून राज्याच्या राजकारणात बरीच चर्चा झाली. शिंदेंच्या शिवसेनेकडून यामागे शिवसेना ठाकरे गट असल्याचा आरोप करण्यात आला, मात्र त्यांच्या आरोपात तथ्य असेल की नाही हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. तथापि, राज्याच्या प्रतिष्ठित पदावर असलेल्या व्यक्तीबद्दल विडंबन गीत करताना मर्यादा पाळण्याबरोबरच भान ठेवणे देखील गरजेचे आहे, असा सूर उमटताना दिसत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकरणावर भाष्य करताना म्हणाले, अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. तर दुसरीकडे पत्रकार प्रशांत कोरटकरने देखील छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केले. कोणी तरी विनाकारण वाद निर्माण करणाने सामाजिक वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न करत असेल तर निश्चितच कारवाई होणे गरजेचे आहे.

नामांकित व्यक्तींनी जसं व्यक्त होताना मर्यादा बाळगायला हव्यात तशा मर्यादा सोशल मीडियावरही व्यक्त होताना असणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य जेव्हा स्वैराचार होते. त्यातून वादच निर्माण होतात. सध्याच्या काळात विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली वाटेल ते विचार व्यक्त केले जातात. बऱ्याच वेळा ते विचार नसतात तर अविचारच असतात. सामाजिक माध्यमातून व्यक्त होणे सोपे झाल्याने प्रत्येकजण मत व्यक्त करत आहेत. ही स्वागतार्ह बाब असली तरी यातून अनेकदा वाद निर्माण होत



करंट इश्यू
अश्विनी पांडे

आहेत. आजच्या काळात विचार व्यक्त केल्यानंतर त्या विचारांना वैचारिक मुद्द्यांचा आधारे विरोध न करता ट्रोलिंगच्या माध्यमातून विरोध केला जातो. ट्रोलिंग करणे हा विषय आता नवीन राहिलेला नाही. राजकीय नेते, कलावंत, खेळाडू, पत्रकार, सामाजसेवक यांच्या एखाद्या कृतीनंतर, विचारानंतर मनमुराद ट्रोलिंग केले जाते. विनोद निर्माण करेपर्यंत ही ट्रोलिंग सर्वांसाठीच आनंददायी असते. याचा आनंद ज्यांची ट्रोलिंग होते तेही घेत असतात. मात्र, अनेक वेळा सर्व मर्यादा तोडत व्यक्तिगत टीका केली जाते. त्यावेळी कारण नसताना त्या व्यक्तीला मानसिक तणाव तर निर्माण होतोच.. ट्रोलर्सलाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. मात्र, त्यांच्या समोरच्या व्यक्तीच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालण्याचे काम केले जाते.

ट्रोलिंग होणे तसे नवीन नाही. या आधीही अनेक जण ट्रोल झाले आहेत. राहुल गांधी, नरेंद्र मोदी, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, शरद पवार, उद्धव ठाकरे, विराट कोहली, अनुष्का शर्मा, कंगणा रणावत यांची ट्रोलिंग होणे नेहमीचेच झाले आहे. मात्र, सार्वजनिक जीवनात असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरून व्यक्तिगत आयुष्यावर टीका करणे निंदनीय आहे. व्यक्तिगत जीवन कसे जगायचे हा प्रत्येकाचा व्यक्तिगत प्रश्न आहे. सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीवर आक्षेपार्ह टीका करणे, खालच्या दर्जाचा विनोद, धमकी देणे, अर्थहीन कमेंट करणे नेहमीचेच झाले आहे. पण या ट्रोलिंगमुळे त्या व्यक्तींना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. एखाद्या विषयावर अभिव्यक्त होण्याचा अधिकार घटनेने सर्वांनाच दिला आहे. पण अभिव्यक्त होत असताना कोणाचेही वैयक्तिक वाभाडे काढत त्यांना लाजीरवाणे वाटतील अशा प्रतिक्रिया देणे चुकीचे आहे. अनेक जण ट्रोलिंगच्या भीतीने व्यक्त व्हायचे टाळत आहेत. हे व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालण्यासारखे आहे. त्यामुळे पुन्हा एकदा अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्वैराचार या मुद्याची चर्चा होताना दिसत आहे. मात्र, व्यक्त होण्याला निश्चितच मर्यादा असायला हव्यात. नामांकित व्यक्तींनी जसे व्यक्त होताना आपल्या वक्तव्याचे पडसाद उमटणार नाहीत याचा विचार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सामान्य नागरिकांनी देखील सोशल मीडियावर ट्रोलिंग करताना मर्यादा पाळणे निश्चितच गरजेचे आहे. तरच अभिव्यक्ती स्वातंत्र्यही जपले जाईल आणि सामाजिक वातावरणही सौहार्दपूर्ण राहण्यास मदत होईल.

**सोशल मीडियाच्या प्रभावामुळे गुन्ह्यांचे स्वरूप बदलत चालले आहे. पूर्वी क्षणिक संतापामुळे गुन्हे घडायचे, पण आता योजनाबद्ध पद्धतीने, शांत डोक्याने गुन्हे केले जात आहेत. कुटुंबातीलच एक घटक असलेल्या व्यक्तीकडून जीव घेण्यापर्यंत मजल जाणे म्हणजे क्रूरताच आहे. त्यामुळे कुटुंबसंस्था धोक्यात आली आहे, असे वाटू लागले आहे.**



# मर्डर मिस्ट्री !

दोघांच्या नात्यात तिसऱ्या कोणामुळे अस्थिरता आली असेल, आपले म्हणणे नीट ऐकून घेतले जात नसेल किंवा आपल्या मनाप्रमाणे आपली हक्काची व्यक्ती वागत नसेल अशा वेळी वाद न घालता थंड डोक्याने त्या व्यक्तीचा काटा काढण्याची क्रूरता वाढली आहे. नुकत्याच घडलेल्या विचित्र घटनांची कौर्यता नक्कीच सामाजिक स्वास्थ्य बिघडवणाऱ्या आहेत.

नाशिकरोड येथील दोन भावांना होळीच्या दिवशी मागील भांडणाची कुरापत काढून खून केला. सिडको शुभम पार्क येथील मुलाला मागचा राग मनात ठेवत हल्ला केला. त्यात त्याचा जीव गेला. तसेच बंगळुरूच्या घटनेत राकेश खेडेकर या व्यक्तीने पत्नीची हत्या केली. राकेश आणि त्याची पत्नी गौरी सांबरेकर मुंबईत राहत होते. पोलिसांच्या माहितीनुसार गौरी आणि राकेशचे क्षुल्लक कारणावरून वाद झाले. राग अनावर झाल्याने गौरीचा चाकू भोसकून खून केला.

दुसऱ्या प्रकरणात संभाजीनगर येथील सिल्लोड येथील एका दाम्पत्याने चारही मुले जन्माला आली म्हणून दत्तक मुलगी सहा महिन्यांपूर्वी पाच हजारांत विकत घेतली. आयात फईम शेख असे या मुलीचे नाव आहे. आयातचा जीव घेणाऱ्या आई फौजिया शेख व पती शेख फईम शेख यांचा गुन्ह्यात सहभाग होता.

मेरठ येथील हत्याकांडात प्रियकराच्या मदतीने पतीचे तुकडे करून ड्रममध्ये सिमेंटने पॅक केले. मेरठ येथील सौरभ राजपूत याची पत्नी मुस्कान आणि तिचा प्रियकर साहिल यांनी नियोजन करून हत्या केली. श्रद्धा वालावलकर हत्याकांडाची क्रूरता, लहान मुलांना चटके देऊन मारणे, पाळणाघरातील मुलांना, ज्येष्ठांवर अमानवीय अत्याचार करणे अशा घटनांमधून नात्यातील ओलावा संपत चालल्याची जाणीव होते. खुंटलेला संवाद, उच्चभ्रू जीवनशैली जगण्यासाठीची धडपड, पैसा, वर्चस्व, नातेसंबंधातील अहंकार आदी कारणांमुळे गुन्हेगारी कृत्य करण्याची मानसिकता तयार होत आहे. त्यातही थंड डोक्याने गुन्हा करताना परिणामांचा विचार केला जात नाही. एखादा गुन्हा आपण करीत आहोत आणि त्याची शिक्षा आयुष्यभर किंवा फाशीच्या स्वरूपात संपूर्ण आयुष्य मातीमोल होऊ शकते याचा विचारही डोक्यात अशा वेळी येत नाही. त्या व्यक्तीविषयी राग मनात भरलेला असतो. व्यावहारिकता आणि भावनाशीलता या दोन परस्पर विरोधी मानसिकता असतात. व्यावहारिक विचार करताना भावनेला मागे ठेवले जाते. या व्यक्तीपासून आपल्याला काय फायदा आहे हे पाहिले जाते. फायदा नसेल, आपल्या मार्गात अडचण वाटत असल्यास त्या व्यक्तीचा काटा काढला जातो. तर भावनिक नात्यातही आपला अधिकार असलेल्या व्यक्तीबाबत चुकीचे काही सहन केले जात नाही. आपली इच्छा, गरजेनुसार समोरच्या व्यक्तीने वागण्याचा अट्टहास असतो. कधी आर्थिक, शारीरिक गरजा पूर्ण न झाल्याने आवडत्या व्यक्तीचाही खून झाल्याचे पहायला मिळते. तू मेरी नही तो किसी और की नही अशी



प्रतिबिंब
देवयानी सोनार

मानसिकताही दिसून येते.

पूर्वी सायंकाळी कुटुंबातील सर्वजण एकत्र बसून जेवणासह गप्पांचा आनंद घेत असत. त्यामुळे कोणाचे काय सुरू आहे याची माहिती एकमेकांना असायची. मात्र, आता सोशल मीडियाचा वाढता वापर डोकेदुखी ठरत आहे. त्यातच मालिका, सिनेमे यात क्रौर्याची परिसीमा दाखविली जात असल्याने मानसिकतेवर परिणाम होत आहे. समाज आणि मनोरंजन क्षेत्रातील घटना आदानप्रदान होत असतात. जे समाजात घडते ते मनोरंजन क्षेत्रात दाखवितात तर जे मनोरंजन क्षेत्रात घडते त्याची समाजापर्यंत धग पोहोचते. अत्यंत धावपळीचे जीवन, बदलती जीवनशैली, आर्थिक स्थैर्य मिळविण्यासाठी चाललेली चढाओढ यामुळे नातेसंबध टिकविणे जिकिरीचे होत चालले आहे. कुटुंबातील संवाद हरवत चालला असल्याने कुटुंब प्रमुखापासून ते अगदी लहान सदस्याच्या आयुष्यात काय चालले आहे याची पालकांनाही कल्पना नसते. मुळात आई-वडील दोघे कमावते असल्याने क्वांटीटीपेक्षा क्वालिटी टाइम देणे अपेक्षित असताना तो मुलांना दिला जात नाही. त्यामुळे भावनांचा कोंडमारा होतो. यामुळे अनेकदा मनातील खदखद बाहेर येते गुन्हेगारी कृत्यातून. कुटुंबातील प्रत्येकाच्या हातात मोबाइल, टीव्हीचा रिमोट असतो. त्यामुळे कुणाला काय हवे, कोणत्या वेळी कसली गरज आहे, मानसिक कोंडमारा होतो का याचा विचार वेळोवेळी संवादाने व्हायला हवा. कुटुंबाने ठराविक वेळ एकत्र घालवावा, सुज्ञ पालकांनी वेळीच आपण किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या समस्या ओळखून योग्य तो संवाद, डॉक्टरांची, समुपदेशकांची भेट घेत योग्य मार्गावर आणायला हवे.

असो, सद्यस्थितीत घडलेल्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडले असून, क्षणिक सुखासाठी, मोहापायी आणि क्षुल्लक कारणातून एखाद्याच्या गळ्याचा घोट घेईपर्यंतची वेळ एखाद्यावर येते, ही बाब नक्कीच पुढील पिढीसाठी आदर्शवत नसून, नैतिकता आणि चारित्र्याचा दागिना प्रत्येकाने काळजापासून जपून ठेवण्याची गरज आहे, एवढेच!

# मांगल्याचे प्रतीक - गुढीपाडवा



**संस्कृती**
**विनोद जाधव**
**९७६३२८२०७७**

चैत्र शुक्ल प्रतिपदा हा दिवस म्हणजे गुढीपाडवा आणि हिंदूंचा नववर्ष दिन म्हणून साजरा केल्या जातो. बदलत्या काळाला अनुसरून आपण सर्वांनी गुढीपाडवा साजरा करताना आध्यात्मिक व धार्मिक विधीसह विज्ञानवादी दृष्टिकोन जोपासायला हवा. प्रेम,एकात्मता व आरोग्याची काळजी कशी घ्यावी याचा संदेश देऊन हिन्दू संस्कृतीची जोपासना करून गुढीपाडवा हा सण साजरा करावयाचा आहे. सर्वप्रथम या दिवशी शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरवणे आणि नंतर गरम पाण्याने स्नान करावे म्हणजे अभ्यंग स्नान करावे. अभंग स्नान करताना देश कालखंड कथन करावे. या देश काल कथनातून लक्षात येते आपण किती लहान सूक्ष्म आहोत व या विश्वाच्या अफाट काळावरून कल्पना येते यातून,आपला अहंकार गळून पडतो. स्नानानंतर आंब्याच्या पानांची तोरणे सिद्ध करून प्रवेशद्वारावर लावावे. त्यातून समृद्धीचे प्रतीक असणारे तोरण याचा संदेश देतो कि, भारत देशासह संपूर्ण विश्व सुख,शांती समृद्धीन नांदावं.

प्रथम नित्य कर्म देवपूजा झाल्यानंतर वर्षप्रतीपदेला महाशांती करावी. शांतीचा प्रारंभी ब्रह्मदेवाची पूजा करावी कारण या दिवशी ब्रह्मदेवांनी विश्वाची निर्मिती केली आहे. आपल्या समस्त प्राणिमात्रांसाठी विश्वाची निर्मिती करून त्यांचे आपण उपकृत आहोत याचे स्मरण ठेवावे. त्यांचे पूजन करून त्यांना नमस्कार करावे. या सुंदर सृष्टीचं जतन करून, संवर्धन करणे हे आपले कार्य असून, एक मानव या नात्याने वेगवेगळ्या प्रदूषणातून तिची हानी होणार नाही याची शपथ घ्यायला हवी. या दिवसानिमित्त दानाला खूप महत्त्व आहे. चैत्र या महिन्यामध्ये उन्हाळ्याची चाहूल लागलेली असते त्यामुळे या काळात उदकदान (पाणी)अतिशय श्रेष्ठ सांगितले आहे. त्यासाठी पाणपोई उभारून तहानलेल्यांना पाणी पाजण्याचे सत्कर्म करायला हवे. तीव्र उन्हात तहानलेल्यांची तहान भागवून आत्मा तृप्त केल्यास उच्च कोटीची पुण्य लाभते. त्याचबरोबर संस्कृती जोपासण्याचे माध्यम म्हणजे धर्मग्रंथ. आध्यात्मिक व धार्मिक पुस्तके दान देऊन हा सण साजरा केल्यास, सणसमारंभाचे महत्त्व नव्या पिढीला समजण्यास मदत होईल.

या गुढीपाडवाच्या निमित्ताने ज्याप्रमाणे,आपण जानेवारी महिन्याच्या प्रारंभी नववर्षाची शुभेच्छा पत्रे आपल्या नातेवाईकांना व मित्रमंडळींना पाठवत असतो,त्याचप्रमाणे चैत्र शुक्ल प्रतिप्रदेश अर्थात या दिवशी हिंदू नववर्ष दिन या निमित्ताने एकमेकास शुभेच्छा देऊन नातेवाईक तथा मित्र मंडळींना शुभेच्छापत्र पाठवणे चालू करावे. कारण आज खरा आपला वर्षारंभ आहे व या शुभेच्छा पत्राच्या माध्यमातून गुढीपाडवा या सणाचे महत्त्व टिकून राहील.

मांगल्याचे प्रतीक म्हणून सूर्योदयानंतर लगेचच गुढी उभारावी. मोठ्या वेळूच्या बांबूच्या उंच टोकास पिवळ्या रंगाचे भरदारी कापड बांधून, त्यावर साखरेच्या गाठी, कडुनिंबाची कोवळी पाने, आंब्याच्या डहाळे, लाल फुलांचा हार बांधून वर चांदी तांबे किंवा पितळीचा लोट्याचा कलश लावून, सजवून उडी उभारावी.

उभारताना ती मुख्य दरवाजाबाहेर उंबरठ्यालगत भूमीवर उभारावी. गुढी अगदी सरळ उभी न करता पुढील अंगाला थोडीशी झुकलेल्या स्थितीत उभारावी व सुंदर रांगोळी काढून नैवेद्य अर्पण करावा.

गुढीपाडव्या या सणाच्या निमित्ताने कडुलिंबाचा प्रसाद ग्रहण करावा. कोवळी पाने,चण्याची भिजलेली डाळ, मध, जिरे आणि थोडासा हिंग एकत्र करून प्रसाद सिद्ध केल्यास तो सर्वांना वाटावा. हे सर्व पदार्थ आपल्या आरोग्यासाठी अतिशय लाभदायक आहे. त्यातून रोगप्रतिकारशक्ती वाढते व उन्हाळ्यासारख्या उष्ण ऋतूत शरीराची दाहकता अस्वस्थता दूर होते.

गुढीपाडव्याच्या दिवशीशेतकरी बांधवानी नांगरणी करावी. नांगराच्या क्रियेने खालची माती वर येते. मातीच्या सूक्ष्म कणांवर प्रजापती लहरींचा संस्कार होऊन बीज अंकुरण्याची भूमिची क्षमता अनेक पटींनी वाढते. त्याचप्रमाणे आगामी लागवडीची पिके उत्तम प्रकारे बहरून येतात व उत्पन्नामध्ये वाढ होते.

अशाप्रकारे सूर्यास्ताच्या वेळी गुळाचा नैवेद्य दाखवून नमस्कार करून गुढी उतरवावी. नवचैतन्य अन मांगल्याचे प्रतीक असणारा असा हा हिन्दू नववर्ष म्हणून गुढीपाडवा हा सण धार्मिक विधीसह बदलत्या काळानुसार वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून साजरा केल्यास, सण साजरे करण्यामागील हेतू उद्देश व संकल्पना काय आहे याची नवीन पिढीला जाणीव होईल. या माध्यमातून सण व उत्सव याबद्दलची ओढ निर्माण होईल व संस्कृती टिकून राहण्यास मदत होईल.

# नववर्ष





**संस्कार**
**नेहा कुलकर्णी -जोशी**

सण म्हटलं की साफसफाई नवीन खरेदी गोडाधोडाच हे सारं आलंच. गुढीपाडवा हा आनंदाचे प्रतीक म्हणून साजरा केला जाणारा सण आहे. हा सण साडेतीन मुहूर्तांपैकी एक सण आहे. या सणाच्या निमित्ताने नवनवीन गोष्टी आपल्या हातून होतात. गुढीपाडवा हा मराठी नूतन वर्षाचा पहिला दिवस मानला जातो. ओळखला जातो. वर्षाच्या पहिल्याच दिवशी संपूर्ण वर्षभर आपण काय काय करणार आहोत हे ठरवले जाते.

ते ठरवलेले संपूर्ण वर्षभर नित्य नियमाने करणे ही आपली जबाबदारी आहे. गुढी उभारताना गुढीला आपण ज्या ज्या वस्तूंनी सजवतो त्या वस्तूंचा ( गोष्टींचे) गुणधर्म स्वतःमध्ये आपण उतरवले तर खऱ्या अर्थाने सण पूर्णत्वास जाईल.

गुढीला आपण जो साखरेचा हार वाहतो त्याचा गोडवा आपल्या वागण्यात, स्वभावात आपण रुजवला पाहिजे.

त्याचप्रमाणे या दिवशी जो गोड पदार्थ आपण नैवेद्यास करतो जसे की, श्रीखंड पुरीचा त्या श्रीखंडाचा गोडवा आपल्या वाणीत आपण उतरविला तर आपण आपली माणसं जोडून ठेवू शकतो.

त्याचप्रमाणे कडुलिंबाचा जो पाला आपण गुढीला वाहतो. त्याचा गुणधर्म हा कडू आहे. त्याचप्रमाणे आपल्या आयुष्यातील कडू आठवणी गोष्टी आपल्या कडुनिंबाच्या गोळीप्रमाणे गिळून टाकल्या तर संपूर्ण आयुष्य चांगले जाईल.

हा गुढीपाडवा साजरा करताना या गोष्टीचा आपण विचार केला तर आपल्या स्वतःच्या दृष्टीने आपला सण पूर्णत्वास नक्कीच जाईल. तुम्ही करून बघा मीही करणार आहे.

सर्वांना गुढीपाडवा मराठी नूतन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

# किटकिट





**सहजच**
**॥ सविता दरेकर**

खूप वर्षांनी आता कुठे राधा मनमोकळे पणे जगायला लागली होती.

दिवसभरात ती आता नित्यनेमाने स्वतःसाठी काही वेळ राखीव ठेवू लागली. त्यात व्यायाम, चालणे, संगित ऐकणे, वाचनासारखे छंदात रमु लागली होती.

सासू-सासरे, दीर जावा, दोघींची मुले असं एकत्र कुटुंब. राधा घरात मोठी होती. तिच्याकडूनच समजूतदारपणाच्या अपेक्षा जास्त होत्या.

राधाचा नवरा आणि दीर व जाऊबाई नोकरीला होते.

तिच्या दैनंदिनीत कानाभोवती सतत सुचनाची, वेळेत काम नाही झाले तर होणारी घरातील सदस्यांची किरकिर, थोरामोठ्यांच्या कुणाच्या मनासारखं नाही वागलं तर किटकिट ठरलेलीच.!

रोजच्याच या तणावातून आता राधा बाहेर पडु लागली होती. तिला रुपासारखी दिलखुलास जगणारी मैत्रीण भेटली होती. यामुळे आता राधा घरातही आनंदाने कर्तव्य कर्म करु लागली.

खरय ना, जीवाभावाची मैत्री आयुष्यात असलीना कि जगणं सहज सुंदर सुलभ होतं.

त्यात मग मैत्रिणीशी भेटीगाठी, दिलखुलास गंप्पागोष्ठी, कधीतरी बाहेर फेरफटका,तर कधी एखादे वेळी स्वयंपाकाला सुट्टी देत हॉटेलमधे जेवणाची मेजवानी होत असतेच.

असच एक दिवस राधा पटपट काम आवरुन रुपाची वाट बघत बसली होती.

अधीरतेमुळे वेळही संपत नव्हता म्हणून पेपर वाचत बसली.तेवढ्यात दाराची बेल वाजली.

रुपा आली असेल म्हणून राधाने आनंदाने दरवाजा उघडला. रुपा छान जिन्सटॉप घालुन आली होती. तिचे स्मित हास्य, बोलके डोळे, तिच्यातल्या चैतन्याची ओळख व्हायला पुरेसं होतं.

राधाने आनंदाने तिला आत बोलवून बस म्हणत सरबत आणायला किचनमधे गेली.

छान थंड सरबताचा स्वाद घेत रुपा म्हणाली, अरे वा राधा, तुझ्यासारखाच गोडवा तू बनवलेल्या प्रत्येक पदार्थात उतरतो बघ.

काहीतरीच काय रुपा, नको झाडावर चढवू तू आता.

या क्षणी मला मनशांती हवीय गं,चल निघुया बाहेर फिरायला.

तुझ्या सोबत हसतखेळत वेळ घालवून मला उत्साही वाटतं पुढचे काही दिवस आनंद टिकून रहातो माझा.

नाही तर घरात रोजचीच किटकिट आता नकोशी झालीय.!

काय गं राधा बरीय ना!

एवढी काय अपसेट वाटतेय तू आज?

आज तर रविवार मग घरातील बाकी मंडळी कुठे गेलेत ?

तु सर्वाना सांगितलं होतं ना आपण बाहेर जातोय असं!

हो गं बाई थांब जरा किती किटकिट करतेय. तुझ्या प्रश्नांची उत्तरं द्यायला मला वेळ तर दे!

आधीच घरातले सगळेच माझ्याभोवती सतत कामांची अपेक्षांची लिस्ट ठेवत किटकिट करत असतात.सगळेजण कामासाठी बाहेर पडतात तेव्हा कुठे मला घरात शांतता भेटते.

आज गेलेत सगळे एका कार्यक्रमाला. मुलांनाही घेऊन गेले.

मी मुद्दाम थांबले जरा बरं वाटत नाही म्हणून तुला बोलवले.

हो बाई सॉरी विसरलेच मी, बोल तू ऐकते मी शांततेत.

बर चल मी आवरते पटकन.

दहा मिनिटात निघुया मग बोलते तुझ्याशी.

मोकळ्या हवेत मनमोकळे पणे आपलासा वेळ मिळतो फिरायला तेव्हा कुठं फ्रेश होतं मन.

दोघीजणी दूर डोंगररांगाकडे नदीकिनारी असलेल्या महादेव मंदिरात जातात.

दर्शन घेऊन बाहेर येत समोरच्या झुळझुळ पाण्याच्या प्रवाहात

पाय ठेऊन निवांत गप्पा करत बसतात.

बोल राधा काय सांगायचय तुला?

राहु दे रुपा, माझं काही नवीन नाही..

रोजचच तेचतेच रडगाणं असतं,मानलं तर छोटं नाही मानलं तर मोठं.!

पण मी चिडचिड करते आणि काही वेळानंतर विसरुन नव्याने बघते.मग होते आपोआप शांत. बाकी काही नाही.

चल सोड ते सर्व,हे बघ इथला निसर्ग किती समाधान मनशांतीचा अनुभव देतो आपल्याला!.


हे वाहतं पाणी या खळखळाटातून जणू नादमय संगित भासतं मनाला

नदीकाठचं हे शिवालय आत्मचैतन्याची अनुभती देते.

रोजच्या दैनंदिन दगदगीतून मानवी जन्मात खरं तर हीच शांतता, हेच चैतन्य समाधान शोधायचं असतं आपल्याला. पण मन भटकत राहतं भौतिक सुखाच्या शोधातच!

# इस्लामच्या पाच स्तंभाची माहिती - इस्लाम परिचय

**कलाकृती - इस्लाम परिचय**
**लेखक - मौलाना वहीदुद्दीन खान**
**प्रकाशक : अब्दुस समद खलिल अहेमद**







**परिचय**
**प्रशांत वाघ**
**७७७३९२५०००**

उद्या सोमवारी जगातील मुस्लिम समाजात साजरा केला जाणारा सण म्हणजे रमजान ईद. गेल्या एक महिन्यापासून जगभरात रमजान या पवित्र सणाच्या निमित्ताने मुस्लिम बांधवांचे उपवास चालू आहेत. रमजानच्या पवित्र मुहूर्तावर लेखक मौलाना वहीदुद्दीन खान यांनी लिहलेली इस्लाम परिचय नावाची मराठी भाषेतील कलाकृती वाचनात आली. अतिशय अर्थपूर्ण असलेल्या या कलाकृतीच्या मुखपृष्ठावरील संदर्भ मला खूपच भावले.

इस्लाम परिचय या कालाकृतीच्या मुखपृष्ठावर वाळवंटातील निरव शांतता, अंतहीन वाळू आणि वर आकाश, विस्तीर्ण माळरानातून दोन पदरी रस्ता क्षितिजाकडे चढत्या दिशेने जातांना दाखवला आहे. या सडकेच्या एका बाजूला काळा डांबरी तर दुसऱ्या बाजूला थोडा कच्चा रस्ता दाखवला आहे तर रस्त्याच्या दोन्हीबाजूला शुष्क जमीन आहे. या मुखपृष्ठाला अतिशय सुंदर कल्पकतेने सजवले असून यातून वैश्विक पातळीवरील अर्थ मला जाणवला आहे.

अरेबिक भाषेत हदीस आणि सुन्ना असे दोन शब्द फार महत्वाचे आहे. सुन्ना या शब्दाचा अर्थ रस्ता असा आहे याचा धार्मिक आणि वैश्विक पातळीवर अर्थ सांगायचा म्हटले तर सुन्ना म्हणजे जीवनाचा असा मार्ग जो अल्लाहला (परमेश्वराला) आवडतो आणि परमेश्वराने हा रस्ता त्याच्या सर्व मार्गदर्शकांच्या माध्यमातून समस्त मानवाला आपले जीवन जगण्यासाठी दिला आहे.

या रस्त्याचे (सुन्नाचे) दोन प्रकार अल्लाह (परमेश्वराने) सांगितले आहेत - जे अल्लाहच्या मार्गावर स्वेच्छेने नियमितपणे चालतात त्यांना स्वर्ग (जन्नत) सुखाची प्राप्ती होते व जे हा मार्ग सोडून भरकटतात त्यांना नरक (दोजक) प्राप्त होतो. हदीस या इस्लामिक शब्दाचा अर्थ आहे निवेदन किंवा वृत्तांकन, मुस्लीम समाजाचे प्रेषित मुहम्मद पैगंबर साहेब यांनी जे उपदेश दिले आहे त्याच्या नोंदी किंवा या उपदेशाचा वृत्तांत यालाच हदीस असे म्हटले आहे.

इस्लाम परीचय या कलाकृतीच्या मुखपृष्ठावर जो दोन पदरी रस्ता दाखवला आहे याचा दुसरा अर्थ मला जाणवला आहे तो म्हणजे कुरआनच्या शिकवणीचे दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत त्यातील पहिले वैशिष्ट्ये म्हणजे अल्लाह (परमेश्वर) एकच आहे आणि यावर विश्वास ठेवणे म्हणजे अद्वैतवाद आणि त्याचीच प्रार्थना करणे. तर दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे मानवातील बंधुभाव अर्थात मनुष्यजात एकच आहे आणि या सर्वांना समान हक्क आहे म्हणजेच ईश्वर, परमेश्वर (अल्लाह) एकच आहे आणि सर्वांसाठी एकच न्याय आहे असा अर्थ या दोन मार्गातून मला जाणवला आहे

इस्लाम परीचय या कलाकृतीच्या माध्यमातून लेखक मौलाना वहीदुद्दीन खान यांनी इस्लामचे पाच मुख्य स्तंभ सांगितले आहेत. प्रेषित पैगंबर यांनी म्हटल्याप्रमाणे या मुख्य पाच आधार स्तंभावर इस्लामची इमारत उभी आहे

पहिला स्तंभ म्हणजे श्रद्धा (ईमान) - अल्लाहवर श्रद्धा म्हणजे सर्व या सृष्टीचा निर्माता त्याच्यावरविश्वास असायला पाहिजे,ज्याने अल्लाह, परमेश्वरावर श्रद्धा बाळगणारा माणूस स्वतःला परमेश्वराचा सेवक समजू लागतो. जेव्हा गाढ झोपेतून माणूस उठतो तेव्हा त्याला परमेश्वराने त्याच्यावर कृपा केलेली असते.

दुसरा स्तंभ म्हणजे सलात (नमाज) - दैनंदिन जीवनातील केलेल्या चांगल्या वाईट कृतीबद्दल अल्लाह, परमेश्वरापुढे गुडघे टेकून परमेश्वरच्या, अल्लाहच्या श्रेष्ठत्वापुढे झुकणे, म्हणजेच नमाज. अल्लाहने आपल्याकडून चांगले कार्य करून घेतले असेल तर त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि आपल्या हातून काही अनुचित घडले असेल तर अल्लाहपुढे गुडघे टेकवून कबुली देणे आणि त्याबद्दल क्षमा मागणे म्हणजेच नमाज अदा करणे होय. नमाज अदा केल्याने मनातील अहंभाव लोप पावतो.


तिसरा स्तंभ म्हणजे उपवास (सौम) - आयुष्यभर मानव टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी धावपळ करीत असतो, कधी कधी या धावपळीत काही घटीत घडले तर संयम ढळतो, उपवासामुळे संयम आणि मनोधैर्य वाढते आणि गरीब कुटुंबावर जी उपासमारीची समस्या दैनंदिन दिवशी भेडसावते याची रोजामुळे याची जाणीव होते यासाठी इस्लाममध्ये उपवासाला महत्व आहे.

चौथा स्तंभ म्हणजे दानधर्म (जकात) - अल्लाह, परमेश्वराने प्रत्येकाला धन दौलत कमावण्याचा मार्ग दिला आहे, त्यातून काही धन हे ज्याने हे मिळवून दिले त्याच्यासाठी राखून ठेवून व ते गोरगरीब असतात त्यांना दान करणे.

पाचवा स्तंभ म्हणजे हजयात्रा - मानवी जीवनात यात्रेला अतिशय महत्व आहे. जीवनात आधी प्रपंच करावा नेटका आणि मग परमार्थ साधावा असे प्रत्येक धर्मात म्हटले आहे. आयुष्याच्या संध्याकाळी मानवी देह परमेश्वराच्या सानिध्यात रहावा म्हणून तीर्थ यात्रा केल्या जातात. हिंदू धर्मात काशी यात्रा केली जाते तशीच मुस्लीम समाजात हज यात्रेला फार महत्व आहे. हजयात्रा अल्लाहभिमुख जीवनशैलीची एक शिकवण आहे.

लेखक मौलाना वहीदुद्दीन खान यांनी इस्लामचा थोडक्यात परिचय या कलाकृतीतून करून दिला आहे. प्रकाशक अब्दुस समद खलिल अहेमद यांनी प्रकाशन करून वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

# चित्तथरारक 'रॅगिंगचे दिवस'





**पुस्तक : रॅगिंगचे दिवस**
**लेखक : सुहास काशीबाई विश्वास कोळेकर**
**मुखपृष्ठ : अरविंद शेलार**
**पृष्ठे : १३० मूल्य : २५०**
**प्रकाशक :- घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन, पुणे**

**पुस्तक परिचय**
**रमेश वाघ**
**९९२१८१६१८३**

बऱ्याचदा तुमची आमची वाचनाची सुरुवात कोणीतरी काहीतरी वाचायला सुचवले, म्हणून होत असते. कित्येकदा सगळे वाचतात म्हणून वाचा, किंवा वेळ घालवण्यासाठी वाचा अशा प्रकारची आपली वाचनाची सुरुवात होत असते. परंतु एकदा वाचनाचा प्रवास सुरू झाला की, बहुतेक वाचकांची गाडी ही आत्मचरित्र किंवा चरित्र वाचण्याकडे वळते. त्याला कारण असे की, चरित्राच्या वाचनातून एक प्रकारचा जीवन-अनुभव वाचकाला मिळत असतो. त्या चरित्राशी साधर्म्य साधणारे प्रसंग जर आपल्या जीवनात घडलेले असतील, तर त्या कथेसोबत वाचकालाही तादात्म्यता साधता येते. जीवन जगताना कोणत्या प्रसंगाला कसे सामोरे जायचे, याचे शिक्षण देखील त्या चरित्राच्या माध्यमातून घेता येते. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे वाचनाचा मुख्य हेतू म्हणजे मनोरंजन, तो सुद्धा साध्य होतो. अनेकदा काल्पनिक कथांपेक्षा वास्तवातल्या कथा या जास्त रंजक आणि उद्बोधक असतात.

सुहास काशीबाई विश्वास कोळेकर यांचे 'रॅगिंगचे दिवस' हे डायरीवजा आत्मचरित्रात्मक पुस्तक या व्याख्येमध्ये बसणारे आहे. निवेदनाची शैली प्रथम पुरुषी एकवचनी असल्याने लेखक वाचकांशी संवाद साधतो आहे असेच वाटते. अशा प्रकारचं निवेदन थेट मनाला भिडतं. त्यामध्ये कुठलाही आडपडदा नसल्यामुळे समोर प्रत्यक्ष घटना घडत आहेत असं जाणवतं.

प्रत्येक गोष्टीचं वर्णन अतिशय तपशीलवारपणे लेखकाने या छोटेखानी पुस्तकातून केलेलं आहे. लेखकाचं कॉलेजचं जीवन हे फक्त लेखकाचं नसून ते वाचकांचं देखील आहे, असं वाटतं. आपण आपल्या कॉलेजच्या दिवसांमध्ये पुन्हा जाऊन ती गोष्ट अनुभवतो आहोत, अशा प्रकारचा अनुभव वाचकाला हा ग्रंथ वाचताना येतो. हे सुहास कोळेकर यांच्या लेखणीचे यश आहे.

प्रत्येकाला ग्रंथातील वर्ण्यविषय आणि आशय आपलासा वाटतो. कारण त्याची पार्श्वभूमी ही नव्वद टक्के मराठी वाचकांच्या पार्श्वभूमीशी नातं सांगणारी आहे. तुम्हा-आम्हा प्रत्येकाला घरी सुट्टीला गेल्यानंतर घरच्या कामांमध्ये मदत करावीच लागते. शेतकऱ्याच्या विश्वामधील असाणारे भावप्रसंग थोड्याफार फरकाने प्रत्येकाच्या जीवनात सारख्याच प्रमाणात घडत असतात. अगदी तशाच प्रकारची कामे सुहास कोळेकर यांनी देखील कॉलेजमधून घरी सुट्टीला आल्यानंतर आणि कॉलेजला ॲडमिशन घेण्यापूर्वी केलेली आहेत. त्यामुळे लेखकाच्या भावनेसोबत वाचक सुद्धा स्वतःला जोडून घेतो.

जशी आपल्या मनामध्ये दुविधा असते, की कोणत्या शाखेला, कसा प्रवेश घेऊ, अशा प्रकारच्या दुविधेतून लेखकाचा प्रवेश नागपूर कृषी महाविद्यालयामध्ये होतो. नागपूरचे कृषी महाविद्यालय रॅगिंगसाठी कुप्रसिद्ध असते. तिथे प्रवेश घेतल्यानंतर रॅगिंगचे एकाहून एक जीवघेणे अंगावर काटा आणणारे प्रसंग अतिशय प्रत्ययकारी पद्धतीने लेखकाने उभे केलेले आहेत. त्या वर्णनाच्या माध्यमातून रॅगिंग आपल्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष उभी करण्यामध्ये लेखक सुहास कोळेकर यशस्वी झालेले आहेत.

ज्यांनी रॅगिंगचा अनुभव घेतला असेल त्यांना त्या प्रसंगांचा कडवटपणा लक्षात येईल. ज्यांना रॅगिंगचा अनुभव नसेल, त्यांना सुद्धा रॅगिंग म्हणजे किती जीवघेणा प्रकार होता, ते या पुस्तकातून लक्षात येईल. या रॅगिंगचे आणि इतर गोष्टींचे वर्णन करताना जे शब्द साहित्यामध्ये सभ्यता म्हणून टाळले जातात, त्या शिव्यादेखील लेखकाने सर्रास वापरलेल्या आहेत. अर्थात त्यामुळे कुठल्याही प्रकारचा अश्लीलतेचा भाव त्यातून दिसत नाही. ओघाने कथाभागात येणारा आशय म्हणून ते आवश्यकही आहे.

कॉलेज संपताना महाराष्ट्रातल्या वाशिम, वर्धा या ठिकाणी फिरताना ग्रामीण भागामध्ये अजूनही जात वास्तवाचे चटके किती पोळणारे आहेत याचा अनुभव पुस्तक वाचताना येतो. अजूनही सामान्य माणूस जातीची चौकट ओलांडून विचार करीत नाही. हे सुद्धा चालता-चालता लेखकाने दाखवून दिलेले आहे. तुम्ही कितीही रॅगिंगच्या अनुभवातून तुम्ही गेलेला असाल किंवा त्रास झालेला असेल तरीदेखील आपले कॉलेज हे प्रत्येकाचे आवडीचे असते. म्हणून त्याविषयीचा एक जिव्हाळा आणि आपुलकी देखील पुस्तकातून समोर येते. अरविंद शेलार यांनी अतिशय नेटके मुखपृष्ठ साकारलेले आहे. चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील यांनी अतिशय मेहनत घेऊन पुस्तकाला जागतिक दर्जाचे निर्मितीमूल्य प्रदान केले आहे.

जर तुम्हाला जुने दिवस पुन्हा जगायचे असतील, तर या पुस्तकाच्या रूपाने ते जगायला मिळतील. ज्यांना कोणाला रॅगिंग काय प्रकार असतो, हे माहीत नसेल त्यांना या पुस्तकातून ते अनुभव येईल. कॉलेजचा माहोल कशा प्रकारचा असतो, तिथली गॅदरिंग, स्नेहसंमेलन, मुलांची भाषा, कुठल्या प्रांतातील मुलं कशा प्रकारचे गटतट करून राहतात, हे सुद्धा या पुस्तकातून वाचायला मिळतं. लेखकाची भाषा अतिशय साधी, सरळ, सोपी आहे. त्यामुळे पुस्तक वाचताना कंटाळा येत नाही. किंबहुना एका बैठकीमध्ये ते तुम्ही वाचू शकता. प्रत्येक मराठी माणसाने वाचावे असे हे पुस्तक आहे.

**माती म्हणजे हजारो कण सजीव जिवाणू आणि विविध बुरशींपासून तयार झालेला एक जिवंत घटक. माणसाच्या घातक हस्तक्षेपामुळे तिचा सजीव पणा दिवसेंदिवस निर्जीवतेकडे वाटचाल करत आहे, जो निश्चितच आपण सर्वांसाठी धोकादायक ठरणार आहे.**






# पीक अवशेषांचा वापर



कृषिसाधन
सोनाली कदम
कृषी सहाय्यक

शेतामध्ये पिक उत्पादन निघाल्यानंतर पिकाचे अनेक अवशेष तसेच शिल्लक असतात. अशा वेळी उपयुक्त उत्पादन हाती आल्यानंतर अनेक शेतकरी उरलेले पीक अवशेष शेतातच जाळून टाकतात. एकाच वेळी सर्व अवशेष, गवत जळून जात असल्यामुळे बहुतांशी शेतकरी हाच पर्याय निवडतात. पण यामुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामांचा यावेळी विचारच होत नाही. संपूर्ण शेत आगीत होरपळून निघताना जिवंत मातीमधील हजारो उपयुक्त जिवाणू देखील मरतात.

संपूर्ण पणे निर्जीव शेतजमीन फक्त आपल्या एका कृती मुळे शिल्लक राहते. ऊस शेतीमध्ये तर सर्रास हा प्रकार बघायला मिळतो. गेल्या दहा वर्षांत अशा घटना ज्या शेतात झाल्या त्या शेतातून उत्पादन मिळणे आता बंद होताना दिसत आहे. हे सर्व थांबवलं तरच आपण पुढील काळात शेती करू शकतो हेच वास्तव आहे आणि ते आपण एकात्मिक पद्धत अवलंबून नक्कीच साध्य करू शकतो. शेतातून निघणारे पिक अवशेष हे आपली माती सजीव ठेवण्यासाठी उत्तम माध्यम आहे. म्हणून पिक अवशेष आपण रोटाव्हेटर करून जमीनीत गाडून सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी वापर करु शकतो. हे पीक अवशेष लवकर कुजविण्यासाठी अनेक उपयुक्त जिवाणू आणि बुरशीचा वापर करु शकतो उदा. ट्रायकोडर्मा, डिकंपोजर इ. दुसऱ्या पिकांमध्ये तसेच फळझाडांमध्ये जैविक आच्छादन म्हणून देखील या पिक अवशेषांचा वापर फायदेशीर ठरतो. गव्हाच्या काडासारख्या काही लवकर न कुजणारे अवशेष शेतात न जाळता आपण ते एकत्रित करून एका ठिकाणी जाळून नंतर ती राख शेतात पसरवू शकतो. यामुळे शेताचं नुकसान होणार नाही आणि मोठ्या प्रमाणात कार्बन शेतात उपलब्ध होईल .

**पीक अवशेष शेतात वापरण्याचे फायदे**

✻ पीक अवशेष जमिनीत मिसळल्याने सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते, त्यामुळे मातीचा पोत सुधारतो. माती अधिक भुसभुशीत आणि सुपीक होते.

✻ अवशेष कुजल्यावर जिवाणू, बुरशी आणि गांडुळे यांसारख्या सूक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते, जे मातीची सुपीकता वाढवतात.

✻ अवशेषांमुळे जमिनीत ओलावा टिकून राहतो, त्यामुळे पाण्याचा योग्य वापर होतो आणि सिंचनाची गरज कमी होते.

✻ अवशेषांमुळे माती वाऱ्याने किंवा पावसाने वाहून जाण्याचा धोका कमी होतो, ज्यामुळे जमिनीची प्रत खराब होत नाही.

✻ जमिनीतील पाण्याची धारण क्षमता वाढते आणि माती मोकळी व सुपीक राहते.

✻ अवशेष कुजल्यावर नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम यांसारखे आवश्यक अन्नद्रव्ये मोकळे होतात, त्यामुळे खतांची गरज कमी होते.

✻ पीक अवशेषांचा थर जमिनीवर राहिल्याने तणांची वाढ मर्यादित होते, कारण त्यांना आवश्यक सूर्यप्रकाश मिळत नाही.

✻ कार्बन संचयनाच्या माध्यमातून हरितगृह वायू कमी करण्यास मदत होते. हवामान बदलाशी सुसंगत शेतीस मदत होते.

✻ काही प्रकारच्या अवशेषांमुळे जमिनीत नैसर्गिक प्रतिकारशक्ती निर्माण होते, जी काही रोगांना प्रतिबंध करते.

✻ जैविक खतासारखा उपयोग होऊन रासायनिक खतांच्या वापराची गरज कमी होते, परिणामी उत्पादन खर्च कमी होतो.

**वापर करण्याची पद्धत**

✻ पीक कापणीनंतर उरलेले अवशेष (पाने, खोड, मुळे) जमिनीवरच टाकून द्यावेत.हे अवशेष जमिनीवर एक प्रकारचे आच्छादन (मल्चिंग) तयार करतात, जे जमिनीत ओलावा टिकवण्यास मदत करते. ट्रॅक्टर किंवा रोटाव्हेटरच्या साहाय्याने पीक अवशेष चांगल्या प्रकारे मातीत मिसळावे.

✻ अवशेष लवकर कुजण्यासाठी त्यावर जैविक कंपोस्टिंग पदार्थ फवारावेत. ऊस, भात आणि गव्हाच्या अवशेषांसाठी ही पद्धत उपयुक्त आहे. पीक अवशेषांचा उपयोग कंपोस्ट तयार करण्यासाठी करता येतो.

✻ गवत, पाने, भुसा, पालापाचोळा आणि शेणखत एकत्र कुजवून सेंद्रिय खत तयार करता येते. कडबा, भाताच्या वाळलेल्या काड्या आणि सेंद्रिय कचऱ्याचा यामध्ये वापर करता येतो.

अशा प्रकारे आपण शेतातच पिक अवशेषांचे व्यवस्थापन केले तर मातीचा सेंद्रिय कर्ब वाढून जलधारण क्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी मोठा फायदा होईल. तसेच माती आणि पर्यावरण संवर्धन करणे शक्य होईल.

# शुद्धलेखन



प्रतिबिंब
॥सुजाता येवले

(उत्तरार्ध)




शिकवण्या घ्यायला सुरुवात केल्यानंतर जी मुले पहिल्यांदा माझ्याकडे आली त्यांच्या पालकांनी कोरोना आणि शिक्षक यांच्या नावाने खूप कांगावा केला. त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण सगळेच पालथ्या घड्यावर पाणी. ऑनलाइन मी सुद्धा शिकवल्यामुळे त्यातल्या अडचणी माहिती होत्या म्हणून समोर आलेली मुले चॅलेंज समजून शिकवायला सुरुवात केली. पण इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना दोन आकडी संख्यांच्या बेरीज वजाबाकी ज्ञान नाही. जोडाक्षरे ही धड काढता येत नाही पण मोबाइलमधले कित्येक ॲपची मला माहिती नाही त्यांचे ज्ञान त्यांना होते. इंटरनेटवर कित्येक प्रश्नांची उत्तरे त्यांना लिलया शोधता येतात. त्यासाठी त्यांनी वापरलेले क्लृप्त्या तर माझ्या आकलना पलीकडच्या होत्या. पण ती उत्तरे जर वहीत लिहायला सांगितली तर त्यांच्या चेहऱ्यावर शिक्षणाविषयी नफरतीचे भाव सहज वाचता येत होते. त्यांना शुद्धलेखन लिहिण्याची बळजबरी सुद्धा करून बघितली, तुटपुंज्या फी मध्ये त्यांचा अभ्यासाचा एक तास वाढवून बघितला पण परिस्थिती अगदी पहिले पाढे पंचावन्न. त्यांच्याकडून लिहून घेणे म्हणजे पेशन्सचा कस लागतो. सगळ्यात विशेष म्हणजे इयत्ता नववीची मुले एक ते दहा पाढ्यांमध्ये सुद्धा असंख्य चुका करतात. गणितात वर्ग घन सॉरी स्केअर, क्युब, फॅक्टरायझेशन, स्केअर रूट काढणे, पायथागोरसचे थेरम कसलीही माहिती नाही. सायमल्टेनियस इक्केशन्स, ग्राफ, कॉर्डीनेट जॉमेट्री, कन्स्ट्रक्शन कसलाही गंध नाही. हीच परिस्थिती इतरही सर्वच विषयांच्या बाबतीत. इंग्लिश मीडियम मध्ये शिकणारी मुले प्रत्यक्ष इंग्लिश या विषयापासूनच अत्यंत दूर आहेत. मराठी अँड हिंदी रिडींग नो वे आय कान्ट असे मराठी हिंदी मातृभाषिक मुले म्हणतात. आणि त्यांचे पालक त्यांना दुजोरा देतात. मराठी हिंदी इंग्लिश या तीनही भाषा वापरून एक वेगळीच भाषा यांची तयार झालेली आहे. त्यातही मराठी हिंदी इंग्लिश हे मूळ शब्द अमुलाग्र बदललेले आहेत. घेतलेल्या चॅलेंज पासून हार पत्करावी लागते की काय? असे वाटू लागले पण परत आदरणीय सरकारी शैक्षणिक धोरण मदतीस धावून येते. हर प्रकारे मदत करून या मुलांना येनकेन प्रकारे पास करणे हे या धोरणाचे वैशिष्ट्य दिसते. मग या धोरणात शिकवण्याची, ज्ञान देण्याची तळमळ बोथट न झाली तरच नवल! याविषयी एका शिक्षण अधिकाऱ्यांशी थोडेसे बोलणे झाले होते त्यावेळी त्यांनी जे उत्तर दिले ते अवाक् करणारे होते. त्यांच्या म्हणण्यानुसार जर मुले नापास झाली तर त्यांच्या मनावर परिणाम होतो. अगदी आत्महत्येपर्यंत ते पोहोचतात. हे सगळं टाळायचे असेल तर मुलांना पास करणे योग्य. हसावे की रडावे ते कळत नव्हते. आत्महत्या केलेल्या मुलांच्या सर्व केसेस जर अभ्यासल्या तर अभ्यासामुळे आत्महत्या करणारी खूपच कमी आहेत. इतरही असंख्य कारणे त्याला कारणीभूत होती. मग त्याचा विचार का नाही होत? अभ्यास हे आत्महत्येला कारण असावे हे बुद्धीला पटतच नाही.

आमची आई आमच्या डोक्यांना मातीचे मडके म्हणायची. मग वर्गात छडी खाल्ली तर आधी आम्ही काय चूक केली ते विचारायची नंतर कुंभाराचे उदाहरण देऊन म्हणायची 'तुमच्या डोक्यांना छान आकार देण्याचे ते काम करत असतात. मग प्रसंगी थोडे बडवले गेले, भाजले गेले तरी हरकत नाही.' नंतर शिक्षकांची तक्रार करण्याची परत कधी हिम्मतच झाली नाही. आज त्यांनी केलेल्या शिक्षा नाही पण सर्वांग सुंदर शिक्षण आणि त्यांचे मुळातच प्रेमळ चेहरे आणखी ममतामयी भासु लागतात. असे वाटते आजही शाळेच्या वर्गात बसावे. मराठी शाळेच्या शहाबादी फरशीवर बसावे; दहा ओळी शुद्धलेखनाच्या लिहाव्या, पाटीवर मस्त चौकोन आखुन शक्य तितके पाढे लिहावेत. आणि आईसारखे बेडसे मॅडमने जवळ घ्यावे. एखादे प्रमेय सोडवावे एखादी भौमितिक आकृती काढावी आणि सुर्यवंशी सरांची कौतुकाची थाप मिळवावी. कुठलेतरी बैलेंस केमिकल इक्केशन लिहावे आणि आपली वही सावकार मॅडमने संपूर्ण वर्गात कौतुकाने फिरवावी. कुठलीतरी ऐतिहासिक घटना लिहावी त्याच्याकडे कापडणीस मॅडमने अनिमिष नेत्रांनी आपल्याकडे बघावे. एखादे छान निसर्ग चित्र रेखाटावे आणि रंगवावे आणि शेवाळे सरांनी ते कॉरिडॉरमधल्या काचेच्या कपाटात ठेवावे. किंवा माझी शाळा हा निबंध लिहावा आणि भामरे मॅडमने त्याला उत्तम असा शेरा द्यावा.

शिकवण्याच्या व्यापात जेव्हा वाटले यांना शिकवणे आवाक्या बाहेर होत आहे, मग एक तास त्यांना जवळ बसवून गप्पा माराव्या असे ठरवले. सहज गप्पांमधून त्यांच्या शिक्षणाविषयीच्या अनास्थेचे कारण जाणून घ्यायचे होते. आणि एक एक धक्कादायक प्रकार समोर येत गेला! त्यांच्या मतानुसार शिकून समजा नोकरी करायची किंवा बिजनेस करायचा म्हटले तरी सगळीकडेच कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर होत आहे तर इतक्या लिहिण्या -वाचण्याच्या भानगडीत का पडायचे? सगळीकडेच कॅल्क्युलेटर असणार आहे, मोबाइल असणार आहे किंवा बिलिंगसाठी मशीन असणार आहेत तर बेरजा वजाबाकी किंवा गुणाकार भागाकार का शिकायचे? व्याकरणाच्या चुका तर कॉम्प्युटर, मोबाइल पण दुरुस्त करते मग त्या चुकांचे आम्ही इतके टेन्शन का घ्यायचे? भूमितीतल्या कॉर्डीनेट जॉमेट्री किंवा ट्रिग्नोमेट्रीचा उपयोग भविष्यात काय?

वाचक हो खरच सांगते कित्येक प्रश्नांना उत्तरच नव्हते. तरीही रेटा लावून मी पुढे बोलायचे ठरवले त्यांना जगातल्या कित्येक विद्वानांची उदाहरणे दिली त्यांनी अभ्यासासाठी केलेली मेहनत वर्णन करून त्यांना सांगितले. ज्ञानेश्वरांपासून रघुनाथ माशेलकरांपर्यंत उदाहरणे देऊन पटवण्याचा प्रयत्न केला, मुलींना प्रतिभाताई पाटील, इंद्रा नुई, भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन, सुधा मूर्ती आणि असंख्य उदाहरणे त्यांच्यापुढे ठेवली आहे. पण त्यांची हुशारी माझ्यापेक्षा काकणभर जास्तच वाटते. जसे की हुशार व्यक्ती ज्यांनी शाळा कॉलेजची तोंडही बघितली नाहीत पण ते अत्यंत यशस्वी व्यावसायिक आहे ही उदाहरणे माझ्यापुढे ठेवली. त्यात आईन्स्टाइन, मेंडेलीव्हस ते सचिन तेंडुलकर पर्यंत लता मंगेशकर, आशा भोसले आणि कित्येक पुरुष महिला यांची उदाहरणे होती. वाचकांनीच आता माझ्यासारख्यांना मार्गदर्शन करावे या मुलांना समुपदेशन कसे करावे? शेवटी धाकदपटशा दाखवून त्यांच्या मनात अभ्यासाविषयी गोडी निर्माण करावी असे वाटू लागले आहे. योग्य होईल का?

# वसंतोत्सव आणि चैत्रारंभ





मनमोकळे
अंजली रहाणे-थेटे

वर्षभराच्या संपूर्ण ऋतुचक्रातील हा कालावधी अगदी सुखावणारा अन् आल्हाददायक असतो. जणू तापलेल्या दुधात हळुवार साखर टाकावी अन् ती विरघळून त्या कडक दुधाला उकळी येताच त्या शर्करेच्या गोडव्यात स्थिरावून थंड होताच जसे वर जमलेल्या सुबक सायीसारखा हा वसंतोत्सव आणि चैत्रआरंभ

वसंतोत्सवात कधी तप्त उन्हाच्या झळांनी तर कधी शीतल संध्येतली ती गार गार हवा.. कधी तहानेने व्याकूळ झालेले पक्षी तर कधी झिऱ्यातली खळखळनारी नितळ निरनक्षी .. कधी उन्मळून पडणारी पिवळी पाने तर कधी बहरणारी पालवी असे सुखद क्षण ह्या नयनांना टीपण्यास मिळतात. ओसाड डोंगरावर दिसतो झाडपाला जगण्याची धडपड करताना तर नदीच्या मध्यात गेलेल्या पाण्यात जीव जंतू आत आत ओलाव्याच्या कुशीत शिरताना... एकाकी रस्त्याच्या कडेला पाणपोई जेव्हा दिसते तेव्हा माणुसकीच्या दुष्काळात भर उन्हात जणू पाऊस पडावा असं दृश्य पाहून माणुसकी ही जीवंत होते. वर्णावा तितका थोडा असा लाघवी एक एक क्षण नयनसुख देतो आणि हया वसंताची उधळण करतो.

ह्या सुंदर निसर्गात सुरेल कोकिळा गाणं गाते अन् सुवर्ण क्षणांना सुशोभित करण्यासाठी पिवळसर तपकिरी तर लालभडक रंगात तो गुलमोहर जसा गालात हसत हसत बहरतो.. गुलमोहर प्रेयसीच्या भेटीसाठी अधीर झालेला हा जणू एक प्रियकर दिसतो. तिला पहावयास व्याकूळ झालेला तो जणू रंग शृंगाराचा वर्षाव करत प्रेमाच्या बहरलेल्या सावलीत अच्छादून तिलाच मोहित करतो.

रंगबेरंगी गुलमोहराची पाने फुले अन् त्या फुलांची सुगंधीप्रीत मोहर घालते. रवीतेज भास्कर जसा शंकराने तांडव करावा तसा शिघ्र कोपलेला असतो तेव्हा तो बहरतो .आसुसलेल्या धरणीला जेव्हा ओलाव्याची आस असते. भेगाडलेल्या मातीला जेव्हा गारव्याचा आसरा हवा असतो तेव्हा तो बहरतो. तप्त उन्हाच्या झळांनी देह सारा लाही लाही होतो. अन् सर्वच त्या कहालीत विसव्याचा ठाव शोधत फिरतात तेव्हा तो बहरतो.

वसंतात निसर्गाला उसंत मिळते आणि चैत्र पालवी नव्यानं शुभारंभ करते. कडुनिंब कडवट क्षण काढून लिंबोळ्याचे बिजांकुर करते आणि चाफा अबोल भावना बोलक्या करतो.हारड्या - करड्या सूख दुःख क्षणांना सोबतीला घेत आयुष्याची दोरी नात्यांची काठी उभी करतो. त्या आयुष्याच्या दोरीची गाठ कधी सैल तर कधी घट्ट करत आनंदाचा पाडवा साजरा करत भविष्याची गुढी उभारून नववर्ष नवनवीन भरारी घेत राहो अन् निरंतर आयुष्याची नांदी होत राहो

श्रीरंगा..

# एक वृद्धव्यथा



अनुभव
अशोक येवला
नाशिक

मृत्यूचे प्रवेशद्वार हळूहळू दिसू लागले आहे. मी रांगेत उभा आहे. आत जाणाऱ्यांची प्रचंड गर्दी आहे. कुणी म्हातारे, तरुण अगदी लहान मुले सुद्धा जाताना दिसत आहेत. तिथले द्वारपाल त्यांना भराभर आत सोडत आहे.

मला मात्र तो 'रांगेतच थांबा' असे खुणावत आहे. व सांगतो आहे 'तू तिथेच थांब, तुझे हृदय आम्हाला सांगत नाही तोपर्यंत तुला आम्ही आत जाऊ देणार नाही. आत येणाऱ्या सगळ्यांची स्थिती हीच असते; त्यांच्या हृदयाने सांगितले तेव्हाच आम्ही त्यांना आत प्रवेश देतो.'

'हृदयाची एक झडप तुझी धडधडते आहे; परंतु ते पूर्ण बंद होत नाही तोपर्यंत थांब. कदाचित तुझे इतर अवयव धडपड करतील, रागावून हातपाय आपटतील, तुला आडवे सुद्धा पाडतील, डॉक्टर त्यांच्या प्रयत्नांनी तुझे हृदय सुरळीत करण्याचा प्रयत्न करतील, पण ज्या दिवशी त्याची क्षमता संपेल तेव्हाच विना विलंब, एका क्षणाचीही वाट न बघता आमच्या महाद्वारातून तू आत येशील'.

आत मध्ये अतिशय सुंदर व सुखद वातावरण आहे. सगळा भावभावनांचा कल्लोळ मिटलेला असेल. चंदनाच्या सुगंधाचा दरवळ असेल. अमृताचे झरे वाहत असतील.

भगवान विष्णू लक्ष्मीसह शेषनागावर विसावलेले आहेत. एका बाजूला बर्फाच्छादित कैलास पर्वत शिखरावर माता पार्वती सह शिव भगवान विराजमान आहेत. बाळगणेश आणि कार्तिकेयाच्या बाललीला बघत आनंदी होत आहेत. सभोवती नंदीसोबत शिवगण आहेत. सर्वच वातावरण आल्हाददायक आहे. एकदा तुझे नश्वर शरीर पंचमहाभुतात विलीन झाले की बाहेरील तुझे नातेवाईक, आप्तजन म्हणतील हा कैलासवासी झाला, वैकुंठवासी झाला.

मुले मुली व इतर सुह्द खूप दुख करतील. पण तुझ्या आठवणींना हृदयाच्या तळवटीत ठेवुन पुन्हा त्यांच्या जीवनाशी ते समरस होतील. कधीतरी तुला आठवून सद्‌गदितही होतील. तू मात्र सुखी व आनंदाचा अनुभव घेशील.

# स्पर्धा परीक्षा : शाप की वरदान?



मनमोकळे
मयूर बागूल
७२१८८३६६०१

**थांबून-थांबून सुटला डाव,**
**पळून पण कुठं मिळतोय वाव,**
**आगगाडीच्या धुक्याप्रमाणे,**
**उडून जाते स्वप्नांची हाव..**

भारतामध्ये सरकारी नोकरी ही म्हणजे एक प्रतिष्ठेची बाब आहे. त्यामुळेच हजारो लाखो तरुण (एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी) सारख्या परीक्षांची तयारी करत असतात. पण ह्या प्रवासात संघर्ष, अपयश, मानसिक तणाव यांचा सामना करताना अनेक युवक निराश होतात. १००० स्पर्धकांच्या पाठीवर एक स्पर्धक आपलं स्वप्न पूर्ण करतो बाकी स्पर्धकांचं काय? कोणी यांचा विचार केलाय का! यशाचे नगाडे वाजतात पण अपयशाला कोणी विचारत देखील नाही..म्हणूनच प्रश्न उभा राहतो स्पर्धा परीक्षा - शाप की वरदान?



एम.पी.एस.सी. परीक्षेत यश मिळालं की एक सन्मानजनक आणि जबाबदारीची सरकारी शासकीय नोकरी मिळते. समाजसेवा करण्याची संधी मिळते, देशासाठी काहीतरी करण्याची भावना जागृत होते. त्यामुळेच अनेक तरुण त्यांच्या आयुष्याची काही वर्षं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी समर्पित करतात. पण हे कितपत योग्य आहे?.. आजची तरुण पिढी ह्या नौकरी कडे फक्त प्रतिष्ठा - सम्मान - सुरक्षितता आणि आरामदायक काम अश्या पद्धतीनेच बघतात.

ही परीक्षा म्हणजे काही खेळ नाही आणि स्पर्धक म्हणजे खेळणं नाही. वर्षानुवर्षं अभ्यास, सतत अपयश, मानसिक तणाव, आणि आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे अनेक युवक टोकाचं पाऊलही उचलतात. काही जण पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होतात, पण बहुतांश उमेदवार अनेक प्रयत्न करूनही अपयशी ठरतात. कुटुंबाची अपेक्षा, समाजाची टोमणे आणि स्वतःच्या मनाची घालमेल - या सगळ्या गोष्टींना हे युवक सामोरे जातात.

एम.पी.एस.सी.सारख्या परीक्षांमध्ये यशाचा टक्का अत्यंत कमी असतो. त्यामुळे अनेक युवक निराश होऊन स्वतःला कमी लेखू लागतात. तू अजूनही अभ्यासच करतोय? हा प्रश्न खुपचं मनाला टोचणारा वाटतो, पण तोच अनेकांनाही वेदनाही देतो.

जरी अंतिम निकाल सकारात्मक नसेल तरी हा प्रवास शिकण्यासारखा असतो. ज्ञान वाढतं, व्यक्तिमत्त्व सुधारतं, विचारसरणी प्रगल्भ होते. एक गोष्ट मात्र खरी - ही परीक्षा यशस्वी झालेल्यांसाठी वरदान असते, पण अनेक प्रयत्न करूनही अपयश आल्यास तो श्राप वाटू शकतो.

**दूर अशा त्या किनाऱ्यावरती**
**सुंदर अशी एक सांज होते,**
**एकांत झालेल्या त्या वाटेवरती**
**एकलीच एक भ्रांत होते,**
**खूप चाळलीत ही नशीबाची पानं**
**आता माझ्यावर आधारित एक पान हवं,**
**माझ्या परिस्थितीला तोड देणारं**
**माझंही शेवटचं पान हवं,**
**माझंही शेवटचं पान हवं....**

**योग्य दृष्टीकोन -**

एम.पी.एस.सी. म्हणजे आयुष्य नाही, तर फक्त एक संधी आहे. त्यात यश मिळालं तर उत्तमच, पण नाही मिळालं तरी जीवन संपत नाही. पर्यायी करिअरच्या संधी उघड्या आहेत. म्हणूनच, ही परीक्षा देताना योग्य दृष्टिकोन ठेवणं महत्त्वाचं आहे.

**शेवटी काय?**

स्पर्धा परीक्षा वरदान आहे की शाप, हे त्या व्यक्तीच्या अनुभवावर अवलंबून आहे. काहींसाठी ते आयुष्य बदलणारं स्वप्न असतं, तर काहींसाठी न संपणारा संघर्ष आणि फक्त संघर्ष! महत्त्वाचं म्हणजे अपयश आलं तरीही स्वतःवर विश्वास ठेवणं आणि वेगवेगळ्या वाटा शोधणं गरजेचं आहे. शेवटी, परीक्षा कोणतीही असो, सर्वात मोठी परीक्षा आयुष्याचीच असते!

आपण सर्व स्वप्न बघतो, तसेच प्रत्येकाची स्वप्नही वेगवेगळी असतात, स्वप्नांना मर्यादा नसतात, खरंय! पण ते त्या त्या वेळेपूरता मर्यादित सुद्धा असतात, स्वप्नांचाही एक कार्यकाल असतो, जेव्हा त कार्यकाल संपतो तेव्हा आपली स्वप्नही संपतात, आपल्याला जीवन हें अगदी लिमिटेड मिळालं आहे, अनलिमिटेड मिळालं असतं तर आपले जीवन काहीतरी वेगळंच राहिलं असतं..असो!

# नार-पार : देर आए... दुरुस्त आए...!



(उत्तरार्ध)

नारपार, तान-मान, औरंगा, अंबिका, दमणगंगा इ. पश्चिमवाहिनी नद्यांमध्ये विपुल जलसंपत्ती आहे. काही ठिकाणी नैसर्गिक वळण बंधारे, तर काही ठिकाणी बोगदा-चारीद्वारे हे पाणी पुढे गिरणा पात्रात आणता येईल. तापी खोऱ्यातील १९० टी.एम.सी., नाशिक जिल्ह्यातील १४६ टी.एम.सी. तर नर्मदा धरणातील जवळपास १८ टी.एम.सी. (३५४ टी.एम.सी.) इतक्या पाण्याचा दुष्काळी भागासाठी उपयोग करता येईल. त्यादृष्टीने जलद प्रयत्नांची आवश्यकता आहे. शासनाला या योजनांची उपयोगिता कळून चुकली असून, त्यादृष्टीने शासन प्रयत्नशील असल्याचे दिसून येते आहे, ही जमेची बाजू म्हटली पाहिजे.

जलसंपदा विभागाकडील सिंचन अहवाल, वेळोवेळीचे आराखडे, तांत्रिक माहितीनुसार, तापी-गिरणा खोरे अतितुटीचे, तर गोदावरी खोरे तुटीचे असल्याचे पूर्वीच स्पष्ट झालेले आहे. या खोऱ्यातील पाण्याचा पूर्ण वापर झालेला असल्याने, तुटीच्या खोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध असलेल्या खोऱ्यातून पाणी परिवहन करुन आणणे, हे अनिवार्य ठरते. नार-पार, दमणगंगा प्रकल्पाचे स्वरूपाविषयी यापूर्वीच बरीच माहिती व तांत्रिक आराखडे, वेळोवेळी प्रसिध्द झालेत. राजकीय सोयीनुसार वा प्रासंगिक उद्देशाने योजनेचे स्वरूप पुन: पुन: बदलले गेले, ही देखील वस्तुस्थिती आहे. ठराविक कालावधीत पून: पून: नविन माहिती समोर येऊन, विशिष्ट भागाला पाणी मिळेल, त्याचे प्रमाण इतके राहील, न पेक्षा याभागाला पाणी मिळणारच नाही, ते कमी असेल, याच भागाला पाणी मिळेल इ. संभ्रम निर्माण करणारी, पण त्यास कुठलाही तांत्रिक आधार नसलेली माहिती पुन: पुन: जाहीर होत असे, त्यातून जनतेत अन्यायाची भावना वाढून, शिवाय वाद देखील उपस्थित होत. अशी परिस्थिती उद्भवली की, नेमके पश्चिमवाहिनी खोऱ्यात पाणी किती ? ते कुठे व किती प्रमाणात मिळणार आहे? याविषयी खात्रीने काहीच सांगता येणार नाही ! असे चित्र अनेकदा निर्माण झाले. मी जेव्हा नाशिक जिल्ह्यातील पाण्याच्या तुटीचा, एकूण गरज व उपलब्धतेचा अभ्यास केला, तेव्हा मला ही गोष्ट प्रकर्षाने समजून आली.

अधिक सविस्तर माहिती घेतली असता, पश्चिमवाहिनी नद्यांतील पाणी पूर्वेकडेस वळविणे, हा एकमेव पर्याय, टंचाई प्रदेशाला वरदान ठरू शकतो, हेही स्पष्ट झाले. खासगी अभियंत्यांची मदत घेऊन मी पश्चिमवाहिनी नदी खोऱ्यांचे व त्यातील उपलब्ध जलसंपत्तीचे सर्वेक्षण करुन घेतले.आणि स्वतंत्र प्रकल्प अहवाल तयार केला. सर्वेक्षणात योजनेच्या पहिल्या टप्यात ५ जिल्ह्यातील २५ तालुक्यांसाठी ५३:५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असल्याचे दिसून आले. नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, कळवण, दिंडोरी, बागलाण, मालेगाव, चांदवड, नांदगाव, येवला, जळगांव जिल्ह्यातील चाळीसगाव, पारोळा, एरंडोल, पाचोरा, भडगाव, अमळनेर, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील वैजापूर, गंगापूर, कन्नड, खुलताबाद, छत्रपती संभाजी नगर, पैठण, धुळे जिल्ह्यातील धुळे व परिसरातील मोठा भाग,



ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा अशा २५ तालुक्यांचा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात समावेश होतो. वॉटरग्रीडने या योजनेची व्याप्ती खूप मोठी होती. त्यातून अहिल्यानगर, उत्तर महाराष्ट्र, खानदेशसह पुढे विदर्भ, मराठवाड्यापर्यंत पश्चिम वाहिनी नद्यांतील योजनेचा लाभ होणे, या पहिल्या प्रकल्प अहवालानुसार सुनिश्चित होते.

नार-पार-दमणगंगा खोऱ्यात १४० ते १६० दघफुट (टीएमसी) पाणी उपलब्ध असल्याचे एका स्वतंत्र अभ्यासातून दिसून आले. तर डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखालील सिंचन आयोगाच्या अहवालानुसार दमणगंगेच्या खोऱ्यात तब्बल ८३ टीएमसी आणि नारपारच्या खोऱ्यात ५० टीएमसी पाणी उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले. मात्र केंद्रीय जल योजना, सी डब्ल्यु सी, व डब्ल्यु डी.ए.ने सुधारित पाणी उपलब्धता जी निश्चित केली, त्यानुसार दमणगंगेच्या खोऱ्यात ५५ टीएमसी आणि नारपारच्या खोऱ्यात २९ टीएमसी पाणी उपलब्धता निश्चित केली. वेगवेगळ्या अभ्यासातून भिन्न-भिन्न माहिती समोर येत गेली. महत्वाकांक्षी प्रकल्पाचे मंजुरीसाठी व्यापक जनजागृती महत्वाची ठरणार असल्याने मी पक्षभेद तसेच तसेच कुठलाही किंतु-परंतु मनात न बाळगता दि : ३१/८/१९९७ व दिनांक २४/९/२००२ रोजी दोन वेळेस उत्तर महाराष्ट्र विकास पाणी परिषदेचे आयोजन केले. परिषदेसाठी मी संबंधित खात्याचे मंत्रीगण, लाभक्षेत्रातील आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जलतज्ज्ञ, पाणी प्रश्नाचे जाणकार-अभ्यासक यांना आमंत्रित केले. दुसऱ्या पाणी परिषदेस खुद्द शरदरावजी पवार यांचेबरोबरच सिंचन आयोगाचे अध्यक्ष तथा आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे, मा. विधानसभाध्यक्ष मधुकररावजी चौधरी, तत्कालिन विधानसभाध्यक्ष अरुणभाई गुजराथी, बबनरावजी पाचपुते, तत्कालीन नियोजन मंडळाचे अध्यक्षरत्नाकर महाजन, अर्थमंत्री जयंतरावजी पाटील, कामगार राज्यमंत्री डॉ. हेमंतराव देशमुख, पाटबंधारे राज्यमंत्री बाळासाहेब थोरात, तापी पाटबंधारे महामंडळाचे उपाध्यक्षराजाराम महाजन, कोकण पाटबंधारे महामंडळाचे उपाध्यक्ष मोतीराम पवार आदिंसह मान्यवर उपस्थित होते. मी आयोजिलेल्या पहिल्या पाणी परिषदेसही तेव्हाचे पालकमंत्री सुरेशदादा जैन, समाजकल्याणमंत्री, घोलप, पाटबंधारे राज्यमंत्री गुलाबराव गावंडे, गृहराज्यमंत्री गजानन कीर्तिकर, उत्तर महाराष्ट्रातील खासदार-आमदार लोकप्रतिनिधी, महापौर,

**मागोवा**

**डॉ. प्रशांत व्ही. हिरे**
**माजी मंत्री**

नगराध्यक्ष, जि.प., पं.स. सदस्य, नगरसेवक उपस्थित होते. प्रकल्पाविषयीची जनजागृती व सामुहीक प्रयत्न व्हावेत, यासाठीच मी हे आयोजन केले, एकाच व्यासपीठावर उपयुक्त चर्चा परिषदेत घडून आली.

फक्त श्रेय नामावलीकरिता वरीलप्रमाणे नावे मी घेतलेली नाही, तर पश्चिम वाहीनी नद्यांतील पाणी पूर्वेकडेस वळविण्यासंबंधीची महत्वाकांक्षी योजना साकारण्यासाठी ह्या मान्यवरांचा सहकार्य लाभावे, यासाठी मी त्यांना केलेली विनंती, आणि विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन, या मंडळींनी माझ्या प्रयत्नांमध्ये मला त्यांचेपरीने साथ दिली. त्याबद्दल या लोकांचे नामनिर्देश केलेच पाहिजे. या भावनेतून मी हा नामोल्लेख केला. समाजात एकीकडे काही लोक दुष्काळ-टंचाईग्रस्तांची पिडा, दु:ख, जाणून माझ्या प्रयत्नांना पाठबळ देत होते, तर त्याचवेळी संकूचित विचारधारा असलेली मंडळी देखील जोमात होतीच, त्या लोकांनी विरोध करण्याचा करण्याचा प्रयत्न केला, आणि असे कुठले पाणीच नाही, नार-पार प्रकल्प हे तर मृगजळच, अशी जाहीर थट्टा चालविली. मला त्याचे वाईट वाटले नाही. पण एक अत्यंत उपयुक्त-बहुउपयोगी प्रकल्पाला झालेल्या विलंबाचे, धनीसुध्दा हेच लोक ठरलेत, याचीही नोंद या घडामोडीची दखल घेतांना घेतली जाईल.

नार-पार-गिरणा प्रकल्पाचे पाणी उपलब्धतेच्या आकडेवारीवरुन लक्षात येते की, न्याय हक्क म्हणा वा गरजेनुसार किंवा जेव्हढे अपेक्षित होते (किमान ५० ते ६० टीएमसी) त्यापेक्षा खूपच कमी (१०.६४ टीएमसी), पाश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी कसमादे व उत्तर महाराष्टातील दुष्काळी भागाला प्राप्त होणार आहे. मात्र असे असले तरी, या पाण्याचे महत्व मुळीच कमी लेखले जाऊ नये. येणाऱ्या निकटच्या काळातच हे पाणी किती मुल्यवान आहे ? हे सिध्द झाल्याशिवाय राहणार नाही. संदर्भाने दूरदृष्टीचा विषय निघालाच आहे, तर या योजनेच्या उपयोगितेला अत्यंत सुक्ष्मपणे समजून घेणाऱ्यांमध्ये तत्कालिन पंतप्रधान कै. नरसिंहराव यांचे नांवही मला अग्रक्रमाने घ्यावेच लागेल. मी करुन घेतलेल्या खाजगी सर्वेक्षणाचा अहवाल माझे हाती येताच, मी तो विनाविलंब राज्य सरकारकडे सादर केला. योजनेची व्याप्ती, खर्च पाहता, हा अहवाल केंद्र सरकारकडे देण्याची गरज आहे, हे मी जाणले आणि माझे पत्र जा.क्र.३५५ दि. २८/६/१९९५ अन्वये मी सविस्तर प्रस्ताव कै.श्री.नरसिंहराव यांना टिप्पणी, आकडेवारी व अन्य अनुषंगिक माहितीसह सादर केला.

देशात प्रतिवर्षी पडणारा दुष्काळ, अवर्षण, शेतकऱ्यांचे असह्य झालेले जगणे, शासनाकडून दुष्काळ निवारणासाठी, प्रतिवर्षी तात्पुरत्या उपायांवर केला जाणारा प्रचंड खर्च, पुन: पुन: उदभवणारा दुष्काळ, त्याचवेळी पश्चिमवाहीनी नद्यांचे कोणताही वापर न होता प्रतिवर्षी वाया जाणारे प्रचंड पाणी, देशातील प्रमुख नद्यांना, दरवर्षी येणारा महापूर, त्यामुळे मोठ्याप्रमाणात होणारी जिवीत व वित्त हानी, या सगळ्या गोष्टी कै.नरसिंहराव यांचे समक्ष विषद करताना, वाढत्या लोकसंख्येची गरज, लोकसंख्या वाढीचा प्रचंड दर आणि मर्यादित साधनसंपत्ती या गोष्टींचे इत्यंभूत व अचूक आकलन कै.नरसिंहराव यांनी त्वरीत केले. माझा नदीजोड प्रस्ताव त्यांनी लगोलग केंद्रीय जलस्त्रोत मंत्रालयाकडे उचित आदेशासह पाठविला. सदरहू मंत्रालयाने तातडीने मला पत्र देऊन (जा.क्र. ६/३/९५, पीआय दि : ५/८/१९९५) प्रकल्पासंबंधीची अतिरि अनुषंगीक माहिती मागविली, मी त्याची त्वरीत पतूर्ता केली (पत्र जा.क्र.४९५ दि : २५/९/१९९५). सर्व अहवालांचे अवलोकन करुन कै.नरसिंहराव यांनी राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पास चालना देण्याचा निर्णय घेतलाच, पण त्वरीत कार्यवाहीचे आदेश दिलेत, आणि तेथूनच राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाचा प्रवास सुरु झाला. तत्कालिन राष्ट्रीय नदीजोड प्रकल्प आराखड्यात अंतर्भूत असलेले अनेक लहान-मोठे प्रकल्प पुढील काळात अस्तित्वात आलेत व येत आहेत, यातून लाभक्षेत्रातील जनतेचे, शेतकऱ्यांचे जीवन काही प्रमाणात सुसह्य झाले, व होईल. कालांतराने राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाचे आराखडे बदलले गेलेत. राज्या-राज्यात पाणी वाटपावरुन तंटेबखेडे झालेत. प्रांत, जिल्हा, विभाग अशा भेदा-भेदमुळे प्रकल्पाचा प्रवास कुंठीत झाला. पर्यायाने सन १९८०-८५ पासून आज २०२५ पर्यंत पश्चिमवाहीनी नद्यांतून किती प्रचंड पाणी कोणताही वापर न होता वाया गेले, याची नुसती कल्पना केली तरी, मनाला वेदना होतात. कारण राज्यात सदैवच मोठ्या भागाचे पाचवीला दुष्काळ पुजलेला, शेतक ऱ्यांची आर्थिक विवंचना न संपणारी..! त्यामुळे आत्महत्येचा दु:खद मार्ग अनुसरणारा शेतकरी. सिंचनाला पाणी नाही, पिक नाही, तर उत्पन्न नाही, पैसा नाही, त्यांचे अठरा विश्वे दारिद्रय दूर व्हायचे नांव घेत नाही. त्याचवेळी राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाने, गर्तेत अडकलेला नार-पार प्रकल्प, प्रचंड पाण्याचा होणारा नाश, उघड्या डोळ्यांनी पाहणे भाग पडले, असो.

एकंदरीतच, नार-पार, गिरणा नदीजोड प्रकल्पाचे स्वरुप लहान असू द्या, क्षमता, व्यापकता मर्यादित असू द्या, पण येणाऱ्या भविष्यकाळाकडे पाहता अक्षरश: ओंजळभर पाण्याचे महत्वही समजून घ्यावेच लागेल. पाण्याचे काटेकोर नियोजन गरजेचे आहे. पाण्याची उधळपट्टी विनाशाचे कारण ठरु शक्ते. जागतिक जलतज्ज्ञांनी सदरचे इशारे यापूर्वीच देऊन ठेवलेले आहेत. त्यामुळे पाण्यासंबंधी जे काही प्रयत्न होत असतील, त्यास श्रेयवादाच्या भानगडीत न पडता आणि प्रयत्न करणाऱ्यांचे मार्गात काटे न पेरता अगदी खुल्या दिलाने किंबहुना अंत:करणातून सर्वांनी साथ देण्याची गरज आहे. कर्मवीर भाऊसाहेब हिरे, लोकनेते व्यंकटराव हिरे तसेच माझ्या मातोश्री श्रीमती पुष्पाताई हिरे यांनी व्यापक लोकहित व जनकल्याणाचा जो वारसा मला सुपूर्द केला, त्यास अनुसरुनच मी जनतेच्या दीर्घकालीन हिताच्या पाणीप्रश्नाकडे आकृष्ट झालो. कोणतीही तमा, फिकीर न बाळगता, सोबत मिळाली तर सर्वांबरोबर आणि नाही मिळाली तर ''एकला चलोरे'' या तत्वाने माझ्यापरीने मी प्रयत्न करत राहिलो न थांबता ! त्याचीच परिणती आज नार-पार-गिरणा प्रकल्पाच्या रूपाने आपण पाहतो आहोत.

निश्चितपणे कै.नरसिंहरावांप्रमाणेच, श्रीमती सोनियाजी गांधी, मा.श्री.शरदरावजी पवार, कै.बाळासाहेब ठाकरे, कै.मनोहररावजी जोशी, कै.गोपीनाथजी मुंडे, कै .विलासराव देशमुख, ना.श्री.नितीनजी गडकरी, श्री.सुरेश प्रभु, श्री.पृथ्वीराज चव्हाण आणि अन्य मंत्रीगण, अधिकारी, लोकप्रतिनिधी, जलतज्ज्ञ अशा कितीतरी महानुभावांनी अत्यंत व्यस्त असतांनाही मला नदीजोड प्रकल्पासाठीच्या माझ्या प्रयत्नात सहकार्य, प्रोत्साहन देण्याचे काम केले. ना.श्री. देवेंद्र फडणवीस व ना.श्री.अजितदादा पवार यांचा पुढाकार सुध्दा लक्षणीय ठरला, हे पण मान्य करावे लागेल, त्यातही ना.श्री.अजितदादांनी तर वेळोवेळी मी मांडलेल्या पाणी प्रश्नात वरचढ राहून सहभाग घेतला व ठोस निर्णयासाठी आग्रह धरला. येणाऱ्या भविष्यकाळात नदीजोड प्रकल्पातील विविध लहान मोठे प्रकल्प प्रत्यक्ष साकारतील, जिथे-तिथे नंदनवन फुलेल, शेतकरी कष्टकरी, जनतेचे नष्टचर्य संपुष्टात येईल, पण जेव्हा-केव्हा नारपार नदीजोड प्रकल्पाच्या प्रवासाचे अवलोकन, पुनर्विलोकन केले जाईल, वा होईल तेव्हा, या प्रकल्पास मार्गस्थ होण्यासाठी ज्या-ज्या व्यक्तींनी आपल्या आयुष्यातील अनमोल वेळ खर्ची पाडला, कारणी लावला, त्याची समाजाने यथार्थपणे नोंद घेणे, दखल घेणे, हे देखील अनिवार्य ठरते. येणाऱ्या पिढीने हा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेऊन समाजाचे, आपण देणे लागतो, याची सदैव जाणीव बाळगली पाहिजे. सामर्थ्यशाली देशासाठी ही भावना अत्यंत महत्वप्रद सिद्ध झाल्याशिवाय राहणार नाही!

# शिंदेगावात विकासगंगा



**चहा विक्री ते गावचे सरपंचपद हा अतिशय असा खडतर आयुष्याचा गाडा ओढणारे आणि कधी इथपर्यंत येण्याचा विचार मनात देखील न आणणारे शिंदे ग्रामपंचायतीचे दहा महिन्यांपूर्वी सरपंच म्हणून विराजमान झालेले बाजीराव जाधव यांनी गावच्या विकासात खऱ्या अर्थाने आघाडी घेतली आहे. नुसतेच विकासकामे न करता सामाजिक दृष्टिकोनदेखील नजरेसमोर ठेवून त्यांनी गावातील छोटे-मोठे व्यासायिकांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्यावसायिक गाळे उपलब्ध करून देत भाडेतत्त्वावर हक्काची जागा दिली. आता तर वॉर्डातील समस्या जाणून घेण्यासाठी सरपंच आपल्या दारी स्तुत्य उपक्रम राबवून समस्यांवरती मात करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिवाय, गावात ऑक्सिजनचा नवीन उपक्रम राबवून सर्वच नागरिकांना अधिक ऑक्सिजन मिळवून देण्यासाठी नवीन आगळीवेगळी झाडाची लागवड करून हा उपक्रम प्रत्यक्ष कृतीत येत्या काही दिवसांत सर्वांच्या सहकार्यातून उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

गावात अनेक विकासात्मक कामे झाली. पंरतु गावातील प्लास्टिकचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून एक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत गावातील कुटुंबाला एक किलो प्लास्टिकला अर्धा किलो साखर मोफत देऊन एक महाराष्ट्रात आदर्श निर्माण केला असून, घेतलेल्या प्लास्टिकपासून गट्टू बनविण्यात येणार आहे. त्यापासून चौक, रस्त्याचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. पंचक्रोशीतील गावांचेदेखील प्लास्टिक ग्रामपंचायत घेणार असल्याने प्लास्टिकचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

शिंदे गावचे सरपंच बाजीराव जाधव यांनी वयाच्या २० व्या वर्षी गावातच चहा, नाश्त्याचे एक छोटेसे हॉटेल टाकून शिंदे ग्रामपंचायतमधील सदस्यांना चहापाणी घेऊन जायचे ते बाजीराव जाधवांना कोणताही राजकीय वारसा नसतानाही वीस हजार लोकसंख्येच्या गावचे सरपंच होणे ही सोपी गोष्ट नसून, त्यांनी अवघ्या दहा महिन्यांत जवळपास अंदाजे चार-पाच कोटी रुपयांची विकासकामे केली. शिवाय अंदाजे पाच कोटींची कामे प्रस्तावित आहे. याकामी सर्व ग्रामपंचायत सदस्य व नागरिकांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाल्याचे सांगितले. महायुती शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यानेच गावचा विकास होत आहे. मात्र, लोकप्रतिनिधीची काम करण्याची मानसिकता कशी आहे, यावरदेखील गावचा विकास होणे महत्वाचे आहे. आज बाजीराव जाधव हे माजी जिल्हा परिषद सदस्य संजय तुंगार याच्या माध्यमातून जून २०२४ मध्ये सरपंचपदी विराजमान झाले. बाजीराव जाधव यांना पहिल्या निवडणुकीत त्यांना पराभवाचा

**दृष्टिक्षेप**

**सुनील पवार**
**पळसे**

सामना करावा लागला, मात्र दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीत त्यांनी चांगले मताधिक्य घेऊन ते विजयी झाले.

शिंदेगावचे सरपंच झाल्यानंतर नवीन वसाहतीत अंतर्गत कॉंक्रिटीकरणाचे रस्ते, पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न, छोट्या मोठ्या व्यवसायिकांना हक्काचे दुकान असावे याकरिता व्यावसायिकांकडून जवळपास दीड लाख रुपयांची अनामत रक्कम घेऊन रस्त्यावर बसणाऱ्या व्यावसायिकाला हक्काची जागा उपलब्ध करून दिली. आज शिंदे गावातून जाणाऱ्या सायखेडा रस्त्यावर स्वनिधीतून ११६ व्यावसायिक गाळ्याची निर्मिती करून रस्त्यावर बसणाऱ्याला हक्काची जागा दिली, तसेच भाजी मार्केट शेड अंतर्गत ६२ गाळ्याची उभारणी करून व्यावसायिकांना भाडेतत्त्वावर दुकाने दिली. जुनी वेस ही जवळपास दोनशे वर्षांची असून, त्या पुरातन वास्तूची जपवणूक व्हावी यासाठी पंधरा लाख रुपयांचा निधी खर्च करून आकर्षक असे ऐतिहासिक वेसीचे काम प्रगतीपथावर असून, गावच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे. एवढेच नव्हे तर दलित वस्ती अंतर्गत भूमिगत गटार, रस्ता कॉंक्रिटीकरण, देवी रस्ता अशी अनेक विकासात्मक कामे आज पूर्ण होत आहेत.

**प्रस्तावित कामे**

शिंदेत जवळपास पाच-सहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून काही प्रस्तावित कामे आहेत. त्यात प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकालगत जॉगिंग ट्रॅक, ग्रीन जिम व बालगोपाळासाठी गार्डन (१ कोटी), गावांतर्गत कॉंक्रिटीकरण रस्ता (२ कोटी), चौक सुशोभीकरण (१ कोटी), मल्लखांब व कुस्ती आखाडा अंदाजे रक्कम (५० लाख), स्मशानभूमी सुशोभीकरण, औद्योगिक वसाहतीत रस्ते व पथदिवे (१ कोटी) तसेच राजवाडा येथे बौद्ध स्तूप (१कोटी) असे अनेक प्रस्तावित कामेदेखील असून, ती कामे काही दिवसांतच पूर्ण करणार असल्याचा मानस असून, या सर्व कामांचे लोकार्पण एप्रिलमध्ये नाशिकचे पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्या हस्ते होणार आहे.

# मंत्री महोदयांना नम्र निवेदन!



नाशिक जिल्ह्याचे कर्तृत्ववान आदर्श शिक्षणमंत्री दादाभाऊ भुसे यांना सर्व शिक्षक संघटना, नाशिक जिल्हा शिक्षक, शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने नम्र निवेदन करण्यात येते की, साहेब तुम्ही महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री आहात. याबद्दल सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. शिक्षकांमध्ये तुमच्याबद्दल मोठा आदर आहे. परिस्थितीची तुम्हाला जाणीव आहे, अनेक शिक्षक शिक्षकेतर संघटनाना वाटू लागले की शैक्षणिक क्षेत्रात निश्चितच चांगला बदल होईल. भ्रष्ट अधिकारी, बोगस प्रकरणे, अनेक वर्ष सातत्याने एकाच जिल्ह्यात सेवेत असलेले अधिकारी यांची हमखास बदली किंवा निलंबन होईल या आशेवर शिक्षक तुमच्या निर्णयाची वाट पाहत आहेत. अरेरावी आणि उद्धट वर्तन करणारे शिवीगाळ किंवा अंगावर धावून येणाऱ्या अधिकाऱ्याना चाप बसेल याची वाट शिक्षक बघत आहेत. तुम्ही त्यावर निश्चितच कडक आणि प्रखर निर्णय घ्याल या आशेवर शिक्षक अवलंबुन आहेत. तुम्ही शाळा शाळामध्ये जाऊन प्रत्यक्ष भेट देत आहात त्याबद्दल तुमचे विशेष आभार. महोदय, जिल्हा शिक्षण विभाग हा अत्यन्त भ्रस्ट आणि बोगस प्रकरणांचा, दलालांचा जिल्हा म्हणून ख्याती झाली आहे. त्याला शिक्षण विभागातील शिक्षण उपसंचालक कुठेतरी आळा घालत आहेत पण वर्तमानपत्रातील बातम्यांतून किती भ्रष्ट कारभार सुरू आहे हे कित्येकदा हे स्पष्ट झाले आहे.

या जिल्ह्यात अनेक अधिकाऱ्यांवर एसीबीच्या कार्यवाही झाल्या आहेत. मंत्रालयातून कुणाचे तरी बोगस आदेश आणून शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची त्याद्वारे अडवणूक केली जात आहे. मात्र ते आदेश दाखवले जात नाही अशा प्रकारची लॉबी आहे. तीन वर्षे कुठलीही शाळा नाहीत, मुले नाहीत, शिक्षक शाळेत हजर नाहीत त्या शिक्षकांना वेतन केले जाते कारण त्याच्यामागे आर्थिक उलाढाल झालेली असणार हे उघड आहे. मात्र २२ वर्षे मुले आहेत, इमारत आहे, शिक्षक अनुदानावर आहेत अशा शाळांचे शिक्षक प्रणालीवरून अचानक नाव काढले जाते, असेही महाभाग अधिकारी या जिल्ह्यात आहेत. विशेष म्हणजे ते याच जिल्ह्यात वेगवेगळ्या विभागातच ठाण मांडून बसले आहेत. त्यांचे कोणी मंत्रालयात हस्तक आहेत का? तेही बघायला हवे. त्यांच्या आर्थिक संपत्तीची एसीबीमार्फत चौकशी केली तर मोठे घबाड हाती मिळेल. या अधिकाऱ्यांची साखळी असून हे अधिकारी तात्काळ बदलले पाहिजेत किंवा निलंबित केले पाहिजेत. यापूर्वी महापालिकेच्या शिक्षणाधिकारी सुनीता धनगर, वैशाली वीर, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक दिगंबर साळवे इत्यादींवर एसीबीने कार्यवाही केली आहे, सध्या महापालिकेचे प्रशासन अधिकारी बी.टी. पाटील यांच्या कारवाया सर्वत्र गाजतच आहेत. धुळे, जळगाव जिल्ह्यात तर शेकडो बोगस प्रकरणे



**कटाक्ष**

**के. के. अहिरे**
**९९६०६०३१८२**

झाल्याचे स्वत: शिक्षण उपसंचालक डॉ. बी. बी. चव्हाण यांनी गुन्हे दाखल करून सिद्ध केले आहे. एक वेतन अधीक्षक वरिष्ठांना अजिबात न जुमानता, बिनधास्तपणे अत्यन्त मग्रुरीत, आमदार खासदार या सारख्या लोकप्रतिनिधींना न जुमानता आमदाराचा नातजावई सांगून शिक्षकांना अरेरावीची उत्तरे देतो, लाचेबाबत शिक्षक संघटना सभेत सर्वांसमोर, मी स्वत: घेत नाही मला इतर लोक आणून देतात हे शिक्षक संघटनेच्या सभेत बिनधास्त बोलतो याचा अर्थ काय? लोक समोर येऊन बोलत नाहीत याचा अर्थ भ्रष्टाचार होतं नाही असा समजावे का? शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बेजार झाले असून, त्यांची तुमच्यावर आशा आहे. कर्मचाऱ्यांची राजरोस लूट होत असून, सामान्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पुरता घायाळ झाला आहे. अशी अनेक प्रकरणे आपल्या जिल्ह्यात झालेली असून, शिक्षक संघटनाची आपल्या उपस्थितीत सभा घेतली तर ते आपल्या निदर्शनास निश्चित येईल. बोगस प्रकरणाबाबत स्वत: शिक्षण उपसंचालक गुन्हे दाखल करतात याचा अर्थ निश्चितच या शिक्षण विभागात बोगस प्रकरणे झाली आहेत हे स्पष्ट होते. त्यात दोन-तीन अधिकारी हे निश्चितच भ्रष्ट असल्याच्या शिक्षकांच्या तक्रारी आहेत. मात्र, ते वेळ आली तर लिपिकांची नावे सांगतात आणि ते सुटतात. काही लिपिक महिलाही भ्रष्टाचारात गुंतलेल्या आहेत. शिक्षक, शिक्षकेतर संघटनांच्या सभेत तक्रारींचा पाढा वाचला जातो, सभेत तात्पुरते होय म्हटले जाते, मात्र पुन्हा तीच परिस्थिती असते. सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रकरणात सुद्धा मलई मागितली जाते, वेळेवर त्यांची प्रकरणे काढली जातं नाहीत. बॅक डेटेड प्रकरणे शोधली तर करोडो रुपयांची प्रकरणे सापडतील. दलालाना पैसे दिले की चुटकी सरसी प्रकरणे निघतात. समायोजन प्रक्रियेत मोठ्या फुशारकीने गप्पा मारणाऱ्या अधिकाऱ्यांचे समायोजन कोणत्याही संस्थेने स्वीकारले नाही हा शिक्षण विभागाचा मोठा आदर आहे. कोर्टाच्या आदेशाचा अवमान केला जातो म्हणून बरेच अधिकारी कोर्टाच्या प्रकरणात अडकलेले दिसतात. कोर्टात कर्मचाऱ्यांना जाण्याची गरजच का भासावी याचा अर्थ चुकीच्या प्रकरणांना मंजुरी हे स्पष्ट होते. प्रथम शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली पाहिजे. शिक्षणाधिकारी मान्यता देत असताना शालार्थ आयडी हा एक लाच घेण्याचा प्रकार सध्या सुरू झाला असून, मग शिक्षणाधिकारी मान्यतेला अर्थच कुठे राहतो. पूर्वी एकदा मान्यता मिळाली की, संपले. आता खरे तर अनेक नियम काढून शिक्षकांची होरपळ चालू आहे. शिक्षकांच्या महत्त्वाच्या अडचणी सोडवा आणि शिक्षकांकडून भरपूर कामे करून घ्या. शिक्षकांनीही आदर्श कामे केलीच पाहिजेत या मताचे आम्हीही आहोत. पालकांनी त्यासाठी लक्ष घातले पाहिजे. शाळेच्या गरजा शासनाने सोडवल्या पाहिजेत, जिथे भ्रष्ट कारभार चालतो अशा संस्थांना नक्कीच कुलूप लावले पाहिजे. शिक्षण संस्था आपल्या कुटुंब चालवण्यासाठीच आहेत अशी काहींची धारणा बसली असून, ते लोक शासनाचे पैसे तर लुबाडतातच पण शिक्षकांनाही ते खूप लुबाडतात. या सर्व बाबींची त्रयस्थामार्फत चौकशी करून खरे काय आहे ते आपण समजावून घेऊन निश्चितच यात बदल घडवून आणाल, अशी अपेक्षा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आहे.

# मुली पळून का जातात?



**समाजभान**

अनिल उदावंत
ज्येष्ठ प्रशिक्षक, समुपदेशक व साहित्यिक
९७६६६६८२९५



जानेवारी आणि फेब्रुवारी या मागील केवळ दोनच महिन्यांत अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातून शेकडो मुली घरातून पळून गेल्याचे वृत्त नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. शहरी आणि ग्रामीण भागातून अशा रीतीने घर सोडून पळून जाणाऱ्या मुलींचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. महाराष्ट्र राज्याच्या कॅनव्हासवर अशा रीतीनं पळून जाणाऱ्या मुलींचा आकडा खूपच मोठा असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होतं. एका अर्थानं मुलींनी घर सोडून पळून जाणं हा एक फारच मोठा सामाजिक प्रश्न बनला आहे.

एखादी मुलगी घर सोडून पळून जाते, तेव्हा तिच्यासह तिच्या कुटूंबाच्याही चारित्र्याचा प्रश्न उभा राहतो. पळून गेलेल्या मुलीला आणि तिच्या पाठीमागे त्या कुटुंबात असलेल्या इतर लोकांना अत्यंत भीषण परिस्थितीला सामोरं जावं लागतं. येता जाता टोमणे ऐकावे लागतात. अगदी नादान व अक्कलशुन्य लोकांकडून मिळणारे अनाहूत सल्ले ऐकून घ्यावे लागतात. पोलीसांच्या नकोशा प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. तथाकथित सेवाभावी संस्थांचा आणि कार्यकर्त्यांचा ससेमिरा सहन करावा लागतो. इतकं सगळं करूनही मुलगी पळून गेल्याचा सल मात्र जराही कमी होत नाही. घरात राहीलेल्या इतर मुला- मुलींकडे संशयानं पाहिलं जातं. त्यांची नाचक्की होते. ही मुलं-मुली जर लग्नाच्या वयातली असतील, तर प्रश्न आणखी गंभीर होतो. त्यांची लग्न जुळवणं हे अत्यंत कठीण आणि जटिल काम होऊन बसतं. चांगल्या सुखासुखी जगत असलेल्या घरातलं सारं सुख अचानक नाहीसं होतं. एकाएकी घरातला सारा आनंद लोप पावतो.

हे असं का होतं? मुळात मुली घर सोडून पळून का जातात? या प्रश्नाचं ज्या गांभीर्याने चिंतन व्हायला हवं, ते तसं होत नाही. अर्थात जोपर्यंत आपल्या घरातली मुलगी पळून जात नाही, तोपर्यंत या प्रश्नाचं गांभीर्य आपल्या लक्षात येत नाही. हे सर्वांत जास्त दुर्दैवी आहे. ज्या घरातली मुलगी पळून गेली आहे त्या घराचं हसं होतं. पळून गेलेल्या मुलीचे आई-वडील किंवा पालक इतरांच्या चेष्टेचा विषय ठरतात. हे तर त्याहूनही अधिक वाईट असं वास्तव आहे. एखादी मुलगी घरातून पळून जाणं हा केवळ त्या एका कुटुंबाचा प्रश्न आहे असं आपण समजत असू आणि त्यामुळं आपण फक्त बघ्याची भूमिका घेत असू तर काळ आपल्याला कधीच माफ करणार नाही! हे आपण लक्षात घ्यायला हवं. आज त्यांची मुलगी पळून गेली. उद्या आमचीही मुलगी पळून जाऊ शकते! आज ते कुटूंब जात्यात असेल तर आम्हीही सुपात आहोत. आम्हाला सुपातून जात्यात जायला कितीसा वेळ लागणार आहे? हा विचार आमच्या मनाला अस्वस्थ करीत नाही का?

एखादी मुलगी पळून गेली की तिच्या पळून जाण्यामागची खरी-खोटी अशी वेगवेगळी कारणं चर्चिली जातात. ती अतिलाडानं वेडी झाली होती. तिच्यावर नीट संस्कारच झाले नाहीत. तिच्या घरचे लोक तसेच आहेत. आई-वडिलांचं तिच्याकडं लक्षच नव्हतं. ती मुलगीच नखरेल होती. अशा काही प्रतिक्रिया देऊन अनेक बाबींवर चवीचवीनं चर्चा केली जाते. अशा चर्चेतून पळून गेलेल्या त्या मुलीची आणि तिच्या कुटूंबाची यथेच्छ बदनामी होते. मुलीच्या पळून जाण्यामुळं उद्भवलेल्या प्रश्नाची उकल होण्यासाठी ही चर्चा अजिबात उपयोगाची ठरत नाही.

आपल्या घरातून एक तरुण किंवा कुमारवयातली मुलगी पळून गेलीय या घटनेचा त्या कुटूंबाला मोठा धक्का बसलेला असतो. आपल्या कुटूंबाला या घटनेमुळे मोठा सामाजिक कलंक लागला या जाणिवेने ते कुटूंब मानसिकदृष्ट्या खच्ची होत असते. आता आपला व आपल्या कुटुंबाचा सामाजिक दर्जा घसरला या भीतीने कुटुंब व्याकूळ झालेलं असतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपल्या लेकराचं पुढं काय होणार? ती कुठं असेल? ती कुणासोबत असेल? ती सुरक्षित असेल का? या काळजीनं आई-वडिल व कुटूंबियांचं काळीज कुरतडत असतं. अशावेळी या कुटूंबाला मानसिक आधाराची अधिक गरज असते. परिणामी हे कुटूंब उध्वस्त होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत स्वतःला सावरता यावं म्हणून काही कुटूंबं नव्या ठिकाणी स्थलांतरित होतात. संपूर्ण खचलेलं एखादं कुटुंब हतबल होऊन आपल्या सर्व कुटूंबासह आत्महत्या करण्याच्या दुर्दैवी निर्णयापर्यंत पोहोचू शकतं.

घर सोडून पळून जाणाऱ्या मुलींचा वयोगट पाहता असं दिसतं की, १३ ते १९ या वयोगटातील मुलींचं घर सोडून पळून जाण्याचं प्रमाण खूप मोठं व लक्षणीय आहे. या वयातील मुली घर सोडून पळून जाण्याची काय कारणे असू शकतात? याबाबत आजवर झालेल्या अभ्यासाचा निष्कर्ष काय सांगतो? एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती ही की, वय वर्ष १३ ते १९ हा वयोगट मानसिक आणि शारीरिक बदलांचा सामना करीत असतो. या वयातल्या मुला-मुलींमध्ये विविध शारीरिक आणि मानसिक बदल होत असतात. त्यांचे हार्मोन्स बदलत असतात. बदलणारे हे हार्मोन्स आणि शारीरिक पातळीवर होणारे बदलाचे संक्रमण यामुळे त्या मुला-मुलींच्या इच्छा, भावना आणि आवडी-निवडींचा लोलक एखाद्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या झुल्यासारखा सतत हलत असतो. या वयात भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल प्रचंड आकर्षण वाटत असतं. आपल्या भारतीय समाजात असा भिन्नलिंगी व्यक्तीला असा स्पर्श सहजपणे करता येईल अशी कोणतीही सोय किंवा मान्यता नसल्याने या वयातल्या मुला मुलींच्या मनावर प्रचंड दडपण निर्माण होतं.

काही मुलं-मुली अधिक बंडखोर असतात. आपल्या पालकांचं आपल्याकडे लक्ष नाही असं पाहून ही बंडखोर मुलं भिन्नलिंगी व्यक्तीला आलिंगन देऊन स्पर्शसुख अनुभवतात. घरातील अन्य स्त्री-पुरुषांना ते बारकाईने न्याहाळू लागतात. उद्दिपित झालेल्या आपल्या लैंगिक भावनांचं व्यवस्थापन कसं करायचं? हे त्यांना ठाऊक नसतं. हा प्रश्न आई-वडिल किंवा पालकांसमोर अथवा मोठ्या भावंडा कडे मांडून सोडवून घेण्याची कोणतीही सोय आपल्या प्रचलित समाजव्यवस्थेत उपलब्ध नाही. अशावेळी त्यांच्याइतकेच गोंधळलेले त्यांचे मित्र किंवा मैत्रिणी हाच त्यांचा एकमेव आधार असतो. या प्रयत्नात भावनांचा अतिरेक होऊन कुणा एकाचं किंवा दोघांचंही पाऊल घसरण्याची दाट शक्यता असते. आपण काहीतरी चुकीचे काम करीत आहोत असं वाटत असुनही त्यात स्पर्शाची इच्छापूर्ती होत असल्याचा आनंद मिळत असल्याने, हे पुन्हा पुन्हा घडत राहतं. आपल्याला हे पुन्हा पुन्हा करता यावं म्हणून प्रसंगी खोटं बोलून अशा संधी शोधल्या जातात.

आईवडिल किंवा पालक आपल्या कामांत बिझी असतील तर मुला-मुलींमधले हे बदल त्यांच्या लक्षात येत नाहीत. असे बदल काही जागृत पालकांच्या लक्षात येतातही; पण त्यांनाही अशावेळी नेमकं काय करायचं हे न कळल्यामुळं त्यांची फक्त चीडचीड होते. ते मुलांना शिस्त लावण्यासाठी बंधनं घालतात. विशेषतः मुलींवर ही बंधनं अधिक घातली जातात. मोठ्यानं बोलायचं नाही, हसायचं नाही, मुलांसोबत खेळायचं नाही, एकटीनं घराबाहेर जायचं नाही. यासारख्या बंधनांमुळं मुलींच्या इच्छांचं दमन होण्याऐवजी त्या अधिक तीव्र होत जातात. अशा मुली संधी मिळेल तेव्हा आपल्या इच्छापूर्ती साठी कोणतंही मोठं साहस करू शकतात. आपल्याला बंधनात ठेवणारे आपले आई-वडिल आपले शत्रू आहेत अशी त्यांची धारणा होते. त्यांना या वयात आई-वडिलांकडून व कुटुंबीयांकडून प्रेम हवं असतं. विश्वास हवा असतो. नेमकं ते प्रेम आणि तो विश्वास त्यांना आपल्या कुटुंबातून मिळत नाही! अशा प्रेम आणि विश्वासाला भुकेल्या झालेल्या या मुली आपल्या घराबाहेर हे प्रेम आणि विश्वास मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशा मुलींना कुणीही भावतं. त्या जात, धर्म, वय, आर्थिक, सामाजिक किंवा कोणत्याही परिस्थितीचा विचार न करता प्रेमात पडतात आणि गरज पडली तर प्रसंगी आई - वडील किंवा कुटुंबाचा कोणताही विचार न करता आपलं घर सोडून पळूनही जातात!

काही थोड्या मोठ्या वयातील मुलींनी आपल्या आयुष्याचं जे स्वप्न पाहिलेलं असतं. ते स्वप्न आपल्या हातून निसटून जाईल अशी भीती वाटावी असं घरातलं वातावरण असेल, तर अशावेळीही मुली बंड करुन घर सोडून पळून जाण्याची शक्यता असते. काही मुलींना उच्च शिक्षण घ्यायचं असतं. त्यासाठी घरातली आर्थिक परिस्थिती अनुकूल असूनही परवानगी मिळत नाही. त्याऐवजी लग्न करण्याचा आग्रह केला जातो. अशावेळी हा धोका अधिक असतो. हे सर्व लक्षात घेता आई-वडिल व पालकांनी याबाबत अधिक जागृत व समंजस होण्याची गरज आहे. १३ ते १९ हे बदलाचं वय आहे. त्याला इंग्रजीत टीन एज असं म्हणतात. टीनएजमधल्या मुला-मुलींच्या वर्तनातील छोट्या-छोट्या बदलांवर आई वडिल व पालकांचं लक्ष असायला पाहिजे. त्यांनी आपल्या घरातल्या मुला-मुलींच्या वर्तनातील सूक्ष्म बदल हेरुन त्यांना वेळीच योग्य असं मार्गदर्शन करायला हवं. अर्थात हे सारं नैसर्गिक आहे. हे आपण समजून घेऊन ते सकारात्मक पद्धतीन स्वीकारलं पाहिजे. मुला-मुलींमध्ये हे बदल दिसू लागले म्हणजे ती वाया जाऊ लागली आहेत असं समजण्याची मुळीच गरज नसते हे पालकांनी समजून घ्यायला हवं.

---

# ओसरी



**मायमराठी समूह**

शीतल कुयटे



माझा जन्म दावचवाडी, तालुका निफाड येथील निसर्गाने नटलेल्या खेड्यात झालेला आहे. आजही मी त्याच गावात राहते. राज्य मार्गालगत आणि शहरालगत गाव असल्याने दिवसेंदिवस गावातील शेती समृद्ध होत आहे. लोकांचे जीवनमान उंचावत आहे. गावातील लोकांनी मोठ्या कष्टाने आधुनिकतेची कास धरून आधुनिक शेतीकडे वाटचाल केलेली आहे. इतर खेड्यांच्या मानाने आमचे गाव नेहमीच प्रगतीत पुढे राहिलेले आहे. आजही मी गावातच राहते. गावातील माझ्या खूप साऱ्या आठवणी आजही सुखद गारवा देतात..

बालपणी सर्व गावात राहत पण हल्ली लोक मळ्यात टुमदार घरे बांधून राहतात..पूर्वी लोक गावात राहत असल्याने गल्ल्या गजबजलेल्या असत. आम्ही ज्या गल्लीत राहत होतो त्या गल्लीत आमचे एक वाड्यासारखे मोठेच घर होते.आणि त्या घराला माझ्या आजोबांचे तीन भाऊ मिळून ओसरी होती..म्हणजे घराला तीन दरवाजे असले तरी ओसरी सामाईक असल्याने बाहेर पडण्यासाठी सर्वांना एकच दरवाजा होता. कालांतराने दोन कुटुंब मळ्यात राहायला गेल्याने आम्हीच फक्त गावात राहत होतो. बऱ्याच दिवस त्या घरांमध्ये भाडेकरी देखील नसल्याने ओसरी पूर्ण आम्हीच वापरत असू.. आमच्या त्या ओसरीत संपूर्ण गल्लीतले मुले, मुली सुट्टीच्या दिवशी उन्हाळ्यात खेळायला येत. आई सतत मळ्यात कामाला जात असल्याने सुट्टीच्या दिवशी मी आणि माझी बहीण आमच्या कडे गहू निवडून साफ करून ठेवणे, इतर कडधान्य निवडून ठेवणे अशा प्रकारचे काम असायचे. आम्ही अगदी तेव्हा दुसरी तिसरी पासून ही सर्व घरातील कामे करायचो.मी माझी बहीण ती कामे ओसरीत करत असताना गल्लीतल्या मुली देखील मदतीला यायच्या आणि सर्वांनी मिळून ते काम पटकन संपून जायचे. आलेल्या ह्या मुलींना खाऊ म्हणून काय देत असेल मी?? तर शिळ्या भाकऱ्या तव्यावर टाकून चुलीवरच्या निखाऱ्यात त्या खरपूस अशा आईने करून ठेवलेल्या असायच्या.म्हणजे हल्ली आपण जो खाकरा खातो त्यापेक्षा कित्येक पटीने त्या चवीला छान असत.त्याला ग्रामीण भाषेत कोरके असे म्हणतात. ते कोरके एका ताटात आणून ठेवायचे आणि काम करता करता सर्वजण आम्ही ते खायचो. खरं सांगायचे मुली त्या कोरके साठी खास काम करू लागायच्या. चुलीवर भाजलेले असल्यामुळे अतिशय खरपूस झालेले कोरके खाताना मजा यायची. काम झाल्यानंतर परत ओसरीत मग आमचे मुलींचे खेळ सुरू व्हायचे. संध्याकाळपर्यंत मग धमाल सुरू असायची.

नागपंचमीला पूर्वी सगळीकडे झोके बांधत झोके घेत..आजही बऱ्याच ठिकाणी झोका खेळतात. पूर्वी मोटा हाकण्याचे मोठा जाड दोर त्यालाच चर्हाट शब्द गावी प्रचलित आहे. हे चर्हाट त्या वेळेला मोटा नसल्या तरी माझ्या आजोबांचे ती आठवण म्हणून वडिलांनी जपून ठेवलेले होते. आमच्या घराच्या छताला ओसरीत वरती अशा लोखंडी कड्या होत्या... त्यात अडकवून फक्त एकाच चर्हाटाचे तीन चार झोके माझे वडील आम्हाला करून द्यायचे. आम्ही सर्व गल्लीतले मुले मुली,बायका देखील आमच्या ओसरीत झोका खेळायला यायच्या. नागपंचमी झाल्यानंतर देखील कित्येक दिवस ते झोके तसेच असायचे.. आणि त्या झोक्यांमुळे सुट्टी झाली की ओसरीत गर्दी असायची. सर्वांच्या हसण्याबागडण्याने ओसरी देखील खुलून गेलेली असायची. उन्हाळ्यात गल्लीतल्या सर्व बायका आळीपाळीने एकमेकांचे पापड कुरडया इतर सर्व वाळवण करायच्या. हे वाळवण करताना मोठी जागा सर्वांना बसण्यासाठी हवीच म्हणून आमच्या ओसरीत सर्व साहित्य घेऊन जमायचे. गल्लीतील जवळपास सर्वच बायकांचे उन्हाळ्यातील पापड कुरडया या ओसरीत होत. उन्हाळ्यात पूर्ण लग्न घर असल्यासारखी ओसरी नेहमी भरलेली असायची. वाळवण झाली तरी कित्येक दिवस पापड कुरडया यांचा मंद सुवास येत असायचा. बायकांच्या बांगड्यांची किणकिण, उखाणे,गाणी हे आवाज ओसरीत पूर्ण उन्हाळभर घुमत असत.



गावात माझ्या बालपणी देखील बऱ्यापैकी शेतकरी मळ्यात राहायला गेले होते.आमची जमीन कोरडवाहू असल्याने पाण्याची सोय नसल्याने आम्ही मात्र गावातील घरात राहत होतो. त्या गल्लीत सुद्धा मूळचे गावातील लोक मळ्यात राहायला गेले होते आणि त्यांच्या घरांमध्ये भाडेकरू म्हणून नोकरी,व्यवसाय करणारे लोक राहत होते,परंतु ते देखील कधी आमच्याशी एकरूप झाले ते कळलेच नाही.बऱ्यापैकी मूळ गावाचे लोक मळ्यात राहायला गेले असल्याने त्यावेळी म्हणजे जवळपास २५/२६वर्षांपूर्वी गावात फक्त आमच्याच एक दोन घरी जात, उखळ होते. आम्ही ते जात, उखळ ओसरीत रोवलेलं होत.हल्ली उखळ कुठे दिसतंच नाही. छोटे जात असते त्याला भरडकी म्हणतात ती मात्र अजूनही गावात आहे. ती काम झाले की ठेवून देता येऊ शकते.पण जात आकाराने मोठे वजनाने जड असते..पूर्वी जात्याच वापर रोजच होत त्यामुळे ते कायमस्वरूपी घरात जमिनीत रोवून ठेवत.आमच्या कडे असे रोवलेले जाते होते,उखळ होते. उखळात धान्य कांडणे, जात्यावर दळायला गावातील ,गल्लीतल्या,आणि मळ्यतून देखील बायका ओसरीत येत.. पूर्वी नागलीचे पापड देखील जात्यावर दळून केले जात.वडे वाटण जात्यावर दळले जात असे.उन्हाळ्यात आमच्या त्या जात्यावर नंबर लागत.माझी आई शेतात कामाला जात.आम्हाला उन्हाळ्यात सुटी असल्याने आम्ही घरी असलो की त्या बायका सर्व ओसरीत ही सर्व कामे करायला यायच्या.जात्यावर दळलेले ओल्या वड्याच्या डाळीचे वाटण इतके सुंदर होत आणि चवीला देखील छान असे.. नागलीच्या पापडांचा रंग इतका सुरेख येत की काचेसारख्या ते पापड चमकत. आमच्या घरचे वाळवण करताना नागलीचे दळण, वड्यांचे दळण जात्यावर करताना जाता ओढण्यासाठी मी आईला मदत करायचे. आई जात्यावर सुंदर गाणी म्हणायची.. त्या गाण्यांमुळे त्या जात्याचे कष्ट देखील जाणवायचे नाही. गावात एक दोन कुटुंब जवळपास ३०/३५ माणसांचे असे होते. त्या कुटुंबातील स्त्रिया दर सणाला पुरण जात्यावर वाटण्यासाठी आमच्या ओसरीत येत. माझ्या आईने कधी कोणाला अडवले नाही. सर्व बायका एक हक्काचे ठिकाण म्हणून ओसरीत येत होत्या. सर्व बायकांना माहीत होते की आईला मळ्यात जावे लागते,खूप कष्टाची कामे असयाचे ती जाणीव असल्याने काम झाल्यानंतर बायका जात, उखळ,ओसरी स्वच्छ करून देखील जात. कधी नाहीच कोणाला जमले तर आम्ही बहिणी स्वच्छ करून घ्यायचो पण तक्रारीचा सूर कधीच आला नाही कारण येणाऱ्या सर्व बायका आपल्याच कुटुंबातील आहे असे वाटायचे. गल्लीत एक कुटुंब म्हणून सर्व राहत असू. मी चौथीत असताना चोरांचा धुमाकूळ झाला होता..अनेक ठिकाणी चोऱ्या होत होत्या. मळ्यात एकटे घर बघून चोर हल्ले करत होते.त्यामुळे रानात राहणारे लोकांमध्ये फारच भीती निर्माण झाली होती. रानात राहणारे लोक सायंकाळी सहा साडेसहा वाजता जेवण करून गावात झोपायला येत. ओळखीच्या नातेवाईकांच्या घरी लोक येत. आमची ओसरी बऱ्यापैकी मोठी असल्याने आमचे मळ्यातील भाऊबंद जवळपास चार पाच घर या ओसरीत झोपायला येत.. सर्व एकत्र आले की धमाल व्हायची..रात्री उशिरापर्यंत गप्पा असायच्या. पुरुष मंडळी चोरांमुळे बाहेर फेरफटका देखील मारून यायचे.. त्यामुळे जवळपास कधी कधी रात्र रात्र जागे राहून गप्पा गाणी व्हायचे.

संकटकाळात आमची ही ओसरी एका आई प्रमाणे सर्वांच्या आधाराला उभी राहिली. दूर गेलेली लेकरे आश्रयाला आली तिने अलगद कुशीत घेऊन प्राणपणाने त्यांचे रक्षण केले अस जणू वाटायचे.

आमच्या या ओसरीने अनेक चांगले वाईट प्रसंग बघितले, अनुभवलेले आहे. सुनेचा हुंदका, सासूचा रुबाब आणि माया सुद्धा, बांगड्यांची किन किन, केसात माळलेल्या फुलांचा सुवास, मुलींचा अल्लडपणा, डांबरट पोरांचा कल्ला, पुरणाचा खरपूस सुवास वड्याचा चटकदार पणा, जात्याची घरघर,उखळावर मुसळाचा आघात, झोक्यांचा लहरीपणा सारे सारे अनुभवले. सर्वांचे सुख दुःख वाटून घेत नंतर ती मात्र एकाकी पडली...एकटेपणा इतका असह्य झाला की, तिने संपूर्ण वाडा एकदा स्वतःच्या कुशीत सामावून घेतला.वाड्याचा एक एक खांब मोकळा झाला पुढच्या पिढीला उपयोगी पडण्यासाठी खांब ही सोडून गेले. आणि तिच्या सोबत उरली निव्वळ माती.. त्या मातीसोबत आता ती ओसरी कायमची श्वास कोंडून काँक्रिटीकरणाखाली बसली आहे.आजही मी त्या जागेवर जाते तेव्हा तिचे ते दबलेले हुंकार मला ऐकू येतात.ती ओसरी आजही मला विचारते आहे.. कधी येशील का ग फिरून त्याच झोक्यासाठी? तुझ्या आजीच्या त्या जात उखळासाठी बाया बापड्या येऊन गाणे म्हणतील का ग? आई सोबत बसून त्याच जात्यासोबत कधी बसशील का?? आणि तुझे ते इवलेसे हात जसे सारवताना फिरवायची मायेने डोक्यावरून माझ्या तसे परत कधी फिरवशील का ग???...तिच ते व्याकूळ होत आर्जव.... आणि मी फक्त डोळ्यात पाणी घेऊन आजही निःशब्द..

---

## शब्दकोडे

मित्रांनो

समाजात अशा काही व्यक्ती असतात, ज्या प्रत्येक वेळी अतिशहाणपण शिकवत असतात. अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले इतरांना शहाणपण शिकवत असतात मात्र त्याच वेळी त्याच्याही बाबतीत काही तरी कमी असतेच हे त्याच्या लक्षात येत नाही. इतरांना प्रत्येक गोष्ट करायला सांगणार स्वतः मात्र करणार नाही याअर्थाने आपले मागील कोडे क्र. ४७ चे उत्तर होते - अति शहाणा त्याचा बैल रिकामा.

**आजचे कोडे क्र. ४८**

१ ते १२ - अक्षरे घेतल्यास एक म्हण तयार होईल
१ ते ४ - अक्षरे घेतल्यास आपल्या समोर असलेला
२ - हे अक्षर घेतल्यास निर्बुद्ध , अडाणी असा बोध होतो
५, ६ - हे अक्षरे घेतल्यास ठोकर लागते
७ ,८, ९ - या अक्षरात आपल्या पाठीमागील व्यक्ती
१०, ११, १२ - या अक्षरात हुशार, ज्याला ज्ञान आहे असा
७, ८ - या अक्षरात कापड व्यवसायाशी निगडीत वस्तू
३ - ग्रामीण भाषेत चहा आहे
११, १२ - या अक्षरात मारण्यास सांगणे
११, १ ,४ - या अक्षरात आब्यांची एक जात आहे
५, ९ - या अक्षरात मिरचीचा केलेला एक पदार्थ
४, ६ - या अक्षराने हिंदीत खरे आहे

\- प्रशांत वाघ

(उत्तर पुढील अंकात)

---

## गांवकरी काव्यांगण

### गुढी उभारू



गुढी उभारू संकल्पाची
सुपारी रूपी स्थापायची!..१

गुढी उभारू स्थैर्यासाठी
पाट मांडू आसनासाठी!...२

गुढी उभारू सिद्धीची
श्रीफळ ठेवू गणेशाशी!..३

गुढी उभारू सौभाग्याची
लेणं हळदीकुंकू देवीपाशी!.४

गुढी उभारू सामर्थ्याची
उंच ध्वजा काठी वेळूची!..५

गुढी उभारू सुख वैभवाची
रेशीमपैठणी ल्यावी जरीची!६

गुढी उभारू अविट माधुर्याची
साखरगाठी चव कमालीची!७

गुढी उभारू चिर मांगल्याची
पुष्पहार परिधान करायची!.८

गुढी उभारू या आरोग्याची
डहाळी-पत्ती कडूलिंबाची!.९

गुढी उभारू नविन यशश्री ची
कलशी स्थिर स्वस्ति श्री!.१०

**- वैशाली शिंदे**
**९३७११८५७९१**



### गुढी उभारा आनंदाची....

गुढी उभारा आनंदाची
नांदो प्रेम घरोघरी
नववर्षाच्या हयाच शुभेच्छा
परमआनंदे या जगी

गुढी उभारु मानवतेची
प्रेम करु या सर्वांवर
देवाने दिले हे सुंदर
बनवु जग अति सुंदर

सण नकोत नुसते नावाला
अर्थाने समजुन घेऊ
करु साजरे आनंदाने
प्रेमाचे नवे गीत गाऊ...


**- नवनाथ गायकर**
**९८८१३२९७०९**

### इंद्रायणीचा कंठ

इंद्रायणीचा कंठ
दाटूनीया आला
देऊनीया हरीनाम
तुका गेला वैकुंठाला

गाथेमुळं पाण्यात
भक्तीचे उठले तरंग
अभंग असे तुकाराम
अर्थ झाला पांडुरंग

टाळ चिपळी सवे
वीणा बोले राम राम



इंद्रायणीचा डोह म्हणे
तुकाराम तुकाराम

**- श्रेयस लहामगे**
**अहिल्यानगर**

### मरणलळा

साहल्या कितीक
जीवनाच्या झळा
आता लागलेला मरणाचा लळा!

सौख्याचा सुवास कापुराचा धूर
तेवढ्यासाठीच माझा धपापला उर
परी न गवसला ममतेचा दरवळा!

वनव्याची आग आत न् बाहेर
झुंजलो एकला देत वाशांना आधार
छताने घराच्या दगा दिला मला!

आतल्या गाठींना दाबूनी पोटाशी
मुक्त वागलो मी आल्या संकटाशी
रुतलो दुःखात साहुनी उन्हाळा!

**- प्रा. भरत खैरकर**
**९८८१६१५३२९**



## सापेक्ष

वासवदत्ता अग्निहोत्री



# ओळख

हे आमचे परिचित श्रीयुत अमुक अमुक... कुणासोबत ओळख करवून देताना आपण हेच शब्द वापरतो. समोरचा हात जोडून नमस्कार करतो आणि मोघम बोलून 'आपली ओळख झाली' असा इशारा देतो.कुणाचीही आणि कशाचीही ओळख झाल्याशिवाय आपण त्या व्यक्तीशी किंवा त्या वस्तू, ती जागा, तो पशू, पक्षी, तो आजार, तो कुणाचा स्वभाव किंवा कुठली परंपरा, संस्कृती, संस्कार, शास्त्र, अभ्यास, कुठलाही सण समारंभ काहीच ओळखू शकत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत आपण अनेक ओळखी करत असतो. आईच्या गर्भातून आल्यानंतर आपल्या ओळखीला सुरुवात होते. प्रथमतः आपण अजाण असतो. सर्वप्रथम आईशी ओळख होते आणि त्यानंतर ओळखीचा दुवा जो सुरू होतो तो खूप दूरवर जातो. 'ओळख' हा शब्द लॅटिन भाषेतून आलेला आहे. ह्याचा अर्थ 'समानता' आहे. एक गहिरे स्मरण पत्र आहे की आपण उत्क्रांत होत असतानाही आपण समान आहोत. ओळख ही केवळ आपण कोण आहोत याविषयी नसून, काळाच्या ओघात एकमेकांना जोडणारे सूत्र आहे.

सर्वप्रथम ओळख कशी काय झाली असेल? पाषाण युगात एकमेकांना फक्त चेहर्यावरूनच ओळखत असतील. तेव्हा काही नाव गाव पत्ता वगैरे अस्तित्वात नव्हते. यायावर सारखेच सर्व फिरत होते. विंचवासारखे पाठीवर आपले बिऱ्हाड घेऊन फिरताना जर एकमेकांना एकापेक्षा जास्त वेळ भेटले तरच त्यांच्यात ओळखीची शक्यता होती. एकदा ओळख झाल्यावर ही सुद्धा शाश्वती नसेल की दुसऱ्या खेपेस भेटल्यावर प्रेमानी भेटतीलच ही संभावना ही कमी होती, कदाचित लढाई वगैरे करतील, आपसात भांडणे ही होत असतील. तो काळ फारच वेगळा होता. आज ओळखीचे खूप महत्त्व आहे.

शेजारचे लोक ओळख करतात. अडीअडचणीला कामास येतात. सण समारंभ करताना नातेवाइकांसोबत, ओळखीच्या लोकांनाही आमंत्रण देण्यात येते. हळदीकुंकू वगैरेत, ओळखीच्या चार बायका आल्यावर, त्या सणाला पूर्णता येते. लग्नसमारंभात कितीक ओळखीचे लोकसुद्धा, लग्नाच्या कामास हातभार लावतात. जन्म मृत्यू ह्यात, ओळखीचे खूप लोक येतात. कुणी रुग्णालयात असेल तर ओळखीचे, शेजारी मदत करतात. हे नातलग नसतात पण तरीदेखील ते खूप आस्थेने मदत करतात, फक्त ओळखीमुळेच.

'ओळख'असेल तर काय काय होऊ शकेल. आज सरकारी कामात, गैर सरकारी पातळीवर कितीक अशी कामं आहेत जी ओळखीमुळेच संभाव्य आहेत. बऱ्याच कामात, वय, बौद्धिकता, हुशारी, अनुभव वगैरे काहीच नसताना फक्त ओळखीमुळेच कामं तडीस जातात. पद, प्रतिष्ठा मिळवून देण्यात ही ओळखी ची अहम् भूमिका असते. चांगल्या शाळेत मुलांना घालायचे असेल, नोकरीच्या साक्षात्कारात उत्तीर्ण व्हायचे असेल, राजनैतिक लहान मोठे पद पाहिजे असेल, कुठलासा मोठा पुरस्कार हवा असेल, इस्पितळात उत्तम उपचार पाहिजे असेल तर ओळख फारच महत्त्वपूर्ण असते. घरं, इमारती, रस्ते, पूल, धरणं, सरकारी इमारतींची डागडुजी, इस्पितळ इत्यादीत जे करार (कॉन्ट्रॅक्ट)मिळतात त्यात पैसा चारावा तर लागतोच पण त्याशिवाय ओळख देखील लागते. कुठलेही प्रकरण उघडकीस येत असेल, अंगाशी येत असेल तर ते मिटवायला देखील पैशांसकट ओळख ही कामास येते. बऱ्याच वेळेस खूप मोठी ओळख आपले खूप मोठे काम करते. थोड्याच ओळखीने परिचय वाढतो आणि मैत्री चे संबंध स्थापित होतात. शाळकरी वयातील मैत्री जर तशीच राहिली तर निश्चितच आयुष्यभर मित्रत्व रहाते आणि मैत्री सारखा संबंध ह्या भूतलावर दुसरा कुठलाच नाही. मोठ्या वयात ही ओळखी होतात. त्या प्रगल्भ असतात. एकमेकांच्या अनुभवाने परिष्कृत झालेल्या असतात. त्यातून आपला फायदा किंबहुना दुसऱ्याचा तोटा कसा होईल ह्याची काळजी घेतल्या जाते. ओळख प्रत्येक वेळेस उत्तमच नसते. अनेकवार ओळखीचे नुकसान ही असते. उदाहरणार्थ आजकाल जिथे लाचलुचपत चालते त्या खात्यात आपली ओळख असेल तर कधी, आपला काही दोष नसताना देखील,आपण कचाट्यात सापडू शकतो. कधी आपली एखाद्या राजकीय नेत्याशी ओळख असली आणि दुसऱ्या पक्षाच्या आमदाराशी काम असेल तर, विरोधी पक्षातील ओळखीमुळेच ते काम असंभाव्य होऊ शकते.

जगात ओळख असणे आवश्यक असते. आजकाल मोबाइलमुळे जग संपुष्टात आलंय. मोबाइलवरून खूप दूरवरच्या लोकांशी ओळख करता येते. अगदी परदेशातही आपण आपले मित्र मैत्रिणी निर्माण करु शकतो पण ते विना परिचयाचे लोक कसे आहेत, कोण आहेत ह्याची सविस्तर माहिती नसल्याने बऱ्याच वेळेस आपण संकटात ही पडू शकतो. 'सोशल मीडियावर' आपण सक्रीय असलो तर 'फॉलोअर्स' होतात आणि अनेक लोक ह्याचा गैरफायदा घेऊ शकतात. प्रत्येक गोष्टी प्रमाणेच ओळखीच्या ही काही मर्यादा असतात. जुने लोक म्हणत असत की ओळख, मैत्री पारखून करावी. लहानपणी ही समज नसते पण तरुणपणाची मैत्री खूप सांभाळून करावी. नवी ओळख, आजकाल खूप महाग पडू शकते,अगदी जीवावर उदार होऊ शकते. अशी मुद्दाम ओळख करणाऱ्या लोकांना वेळीच योग्य अंतरावर ठेवले पाहिजे.

हिंस्र जीव देखील ओळख करतात. त्यांना आपले हितचिंतक कळतात. पाळीव प्राणी तर फक्त ओळखीच्या मालकांकडून जेवण घेतात. पक्षी देखील आपला अन्नदाता ओळखतात. हेच काय विषारी जीव, श्वापद सुद्धा आपल्या जोडीदाराला ओळखतात. आश्चर्यकारक म्हणजे पाण्यात रहाणारे डॉल्फिन मासे, माणसांना छान ओळखतात. ह्या माशांना मोठ्या जलाशयात पाळून, त्यांच्याकडून छान करतब करवून घेतात आणि ते मासेसुद्धा माणसाशी ओळख करुन, खूष असतात. कितीक साहित्य नित्य प्रचलित होते. शब्दप्रयोग नवीन असतात पण त्याचबरोबर अनेकवार आपल्याला ते साहित्य ओळखीचे वाटते. अर्थात माझा कोणावरही आक्षेप नाही पण हे होते. माणूस जन्माला आल्यावर, आपली ओळख प्रथम आपल्या कुटुंबातील लोकांना करुन देतो तसेच समाजात पदार्पण केल्यावर समाजाला आपली ओळख व्हावी म्हणून झटत असतो. एकदा का प्रतिष्ठित म्हणून ओळखल्या गेले की त्यानंतर तीच ओळख कायम रहावी म्हणून त्याची कवायत असते. आपली ओळख बुजून जाऊ नये म्हणून माणसाला खूप श्रम करावे लागतात. भेटीनंतर जेव्हा एकमेकांपासून दूर होतो त्यावेळेस आपण म्हणतो....चला परत भेटूयात...ओळख राहू द्यात. तर अशीच ओळख माणुसकीची असावी. माणसाने माणसाला ओळखावे. नरजन्म मिळाला आहे तो सार्थक होईल आणि जगाला आपली ओळख राहील अशीच वर्तणूक आपली असावी.

---

परवा रंगपंचमी होती. शाळेला सुट्टी असल्यामुळे आदल्या दिवशी मुले वर्गात खूप चिवचिवत होती. मधल्या सुट्टीत पैठणकर सर बाहेर गेल्यावर मुलांनी वॉटर बॉटल उघडून मैदानात एकमेकांवर पाणी उडवायला सुरुवात केली. सरांनी ते बघितले.. वर्गात सगळ्यांना बोलवले. डबा खाऊ दिला. मग सगळ्यांच्या लक्षात आलं सर चिडलेले दिसतात ..प्रत्येक जण एकमेकांना पाणी मागत होतं. सरांनी एका विद्यार्थ्याला टाकीजवळ पाठवलं पण टाकीतही पाणी नव्हतं आता आली का पंचाईत, काय करावे बरं?.

सरांनी हळूच सगळ्यांना सांगितलं, कळलं का

# जल हेच जीवन



मी पाणी वाया घालवू नका म्हणून का ओरडतोय..! एक विद्यार्थी म्हणाला, आपण आपलं पाणी संपायला नको होते.. घरी जाऊन खेळलो असतो! शेवटी इतर मुले चुळबुळ करू लागली ..परत सर म्हणाले, तुम्ही सर्वांनी याचा विचार आधी करायला हवा होता. लोकांना पाणी सहज मिळत नाही. कित्येक गावात दूरदूरून पाणी आणावे लागते. खूप मुलांना शाळा सोडून पाण्यासाठी रांगा लावाव्या लागतात आणि आज तुम्ही इतकं सारं पाणी का बर वाया घालवलं?



## थोडं मनातलं

योगिनी पैठणकर

सर पुन्हा सांगू लागले, जगण्यासाठी ऑक्सिजन हवा.. तसं अन्न व पाणी हवं. पाण्याशिवाय आपण जगूच शकत नाही. कितीही पैसा, प्रसिद्धी, पत, पती- पत्नी, प्रेम, मीळवलं तरी पाण्याशिवाय काहीच शक्य नाही. एक वेळ न जेवता आपण राहू शकतो पण पाण्याशिवाय अशक्यच! वरील चित्रात जरी दोन स्त्रीया दिसत असल्यात तरी त्या समाजाचे प्रातिनिधिक चित्र आहे.

आजकाल नद्या, तलाव आटताय, आपणच त्या वाचवायला हव्या. आज गोदावरीचे पाणी गढूळ झाल आहे, रोगराई पसरली आहे. परत सिंहास्थातही होईलच. आपणच वीज, पाणी आपल्यासाठी वाचवलं पाहिजे !जल हे जीवन है... असं आपण शिकतो! शाळेतल्या भिंतीवर पाहतो! आपण पाणी योग्य तऱ्हेने वापरायला हवं.. तलाव, नद्या, नाले अस्वच्छ नको... पाण्याचा उपयोग आपण योग्य रीतीने केला तर झाडांना, गुरांना पाणी मिळेल ...गाड्या धुवायला नको.. त्या पाण्याचा उपयोग आपल्यालाच होणार आहे.. यापुढे आपण पाणी वाया घालवणार नाही अशी शपथ घेऊया...जागतिक जल दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

पाण्याच्या वापराबाबत आजही जनजागृतीची गरज आहे, आपल्या गावातही दुष्काळी भागातही आपल्याला आजूबाजूला पाण्याचा अपव्यय पाहायला मिळतो, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी महिलांचा अर्धा ते एक दिवस जातो आणि काही ठिकाणी लोकं

नळाच्या शुद्ध पाण्याने गाड्या धुण्यापासून घरसमोरील रस्ते भरमसाठ पाण्याने धुताना आपण लोकांना पहातो, अशा लोकांना प्रशासनाने समजायला हवे

अशा कारवाईसाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यायला हवा, आपण आपल्यापुरते पाण्याचा अपव्यय टाळूयात, तीन महिने गाडी नाही धुतली किंवा ओल्या फडक्याने पुसली तरी फार फरक पडणार नाही, पण पाणी वाचेल

जल दिनाच्या निमित्ताने थोडी मन की बात...

मुलं खजील होऊन पुढच्या तासाला बिनबोभाट बसलीत.

---



# रंग इंद्रधनुष्याचे..

आज खूप दिवसांनी ती घराबाहेर पडली होती.. घराजवळच्या जॉगर्स पार्कला चार ते पाच चकरा मारल्यानंतर तिला अगदीच घामेघूम झाल्यासारखे वाटू लागले.. तिथल्याच एका बाकड्यावर बसली आणि रुमालाने घाम पुसला.. काही योगाभ्यास करावा म्हणून तिने डोळे मिटले तोच तिच्या कानावर शब्द आले.. 'इकडे कुठे ग आज..? कशी आहेस..?'

तिने डोळे उघडून पाहिले तर तिला तिच्या बालपणीची मैत्रीण मुग्धा दिसली.. खूप दिवसांनी दोघीजणी एकमेकींना भेटत होत्या त्यामुळे दोघींनाही खूप आनंद झाला मग काय योगाभ्यास बाजूलाच राहिला आणि दोघींच्या छान गप्पा रंगल्या.. एका गावात असूनही दोघीजणी अवचितच भेटत असत.. एरवी भेटीला निमित्त लागत असे पण आज मात्र भेटीचे योग जुळून आले होते..

दोघींनाही किती बोलू आणि किती नाही असे झाले होते.. मुग्धा म्हणाली..'सुधा रोज ह्याच वेळेला येतेस का? मग मी पण याच वेळेला येत जाईल..' सुधाने मान डोलावली.. चेहरा काहीसा दुःखी वाटत होता.. सुधाच्या मिस्टरांना जाऊन जेमतेम दोन वर्ष झाले होते..त्या वेळेस जेमतेम चाळीशीची सुद्धा नव्हती..दोघे नेहमी इथेच फिरायला यायचे.. ते गेल्यावर त्यामुळे ती अगदीच एकटी पडली होती.. बरेचसे रुटीन तिचे लागले होते तरीही मनात त्याच्या आठवणी सदैव असत..तिला जणू वाटत होते की आपले जगण्याचे कारणच देवाने हिरावून घेतलेले आहे.. त्याच्याशिवाय तिला अपूर्णता वाटत होती आयुष्यात पण ते शेवटी आयुष्य असते जे रोज क्षणाक्षणाने संपत जाते.. आपल्या मुलांसाठी ती पुन्हा नव्या जोमाने उभी राहिली आणि मनातलं दुःख बाजूला सारत आपल्या कामकाजाकडे लक्ष देत गेली..

सुधाने हा फार मोठा आघात सहन तर केला पण आजकाल ती उदास भासत होती कारण तिला एकटेपणा असह्य वाटत होता त्यामुळे ती तिच्या तिच्या विचारांमध्येच राहत असे.. मूले मोठी झाल्यामुळे त्यांचे विश्व नव्याने साकारत होते.. हे सगळं तिने स्वीकारले होते पण तरीही मनात पोकळी होती.. मुग्धाला हे सारे ठाऊक होते कारण ती खूप वर्षांपासून तिला ओळखत होती..

सुधाने एक खोल उसासा टाकला मुग्धाने तिच्या खांद्यावर हात ठेवला मुग्धा म्हणाली.. 'अगं इथे



## वेगळे काही

‖ स्वाती पाचपांडे

प्रत्येकालाच एकटेपण असते.. तुझ्या बाबतीत देवाने अन्याय केला आहे.. पण माझी गोष्ट सांगू का मी तुला..? अगं आम्ही दोघेजण घरात एकटे असतो पण माझ्या नवऱ्याला माझी गरज कधीच नसते.. ऑफिसमधून आल्यावर तो त्याच्या बेडरुमचे दार बंद करून बसतो.. जणू काही मी फक्त स्वयंपाकपाणी घराची काळजी घेण्यासाठीच आहे..मी संवादासाठी भुकेली असते पण तोही नाकारला जातो..त्याच्या कक्षेत मी जगावे हीच त्याची अपेक्षा असते.माझे अस्तित्व जणू महत्वाचे नाहीच मग मला खूप मानसिक यातना होतात..माझी लेक तीही आता होस्टेलवर असते त्यामुळे मला घरात राहणे अवघड वाटू लागले आहे.. माझ्या कामाचे व्याप मी खूप वाढवलेले आहे तरीही मनात एक आस असते..मी असा काय गुन्हा केला की

देवाने माझ्यावर असा सूड उगवला आहे तेच मला कळत नाही.. मी खूप खूप विचार करते.. नवरा असूनही मी एकटीच..अगदी अतिविचाराने वेडी होईल असे मला वाटू लागते पण तरीही जगण्याची आस असतेस ना.माझ्या मुलीसाठी मला जगायचं आहे..तिच्या डोळ्यात अश्रू तरळले ते पाहून सुधा एकदम भानावर आली...मुग्धाला काही दुःख नसेल असे तिला वाटायचे.. आता जे मुग्धा बोलली त्याची तिला चुकूनही कल्पना नव्हती.. तिला वाटायचे की मुग्धा किती सुखी आहे.. सगळी श्रीमंती तिच्या पायाशी लोळण घेत आहे.. नवरा आहे पार्टीला जाताना सोबत.. हे सगळे चित्र म्हणजे आभास होता तर सुखाचा.. खरंय दिसते तसे नसते हेच खरे..!

प्रत्यक्षात मात्र वेगळे चित्र तिने ऐकले.. दोघींनीही आपले दुःख हलके केले आणि सहज वर पाहिले तर आकाशात एक इंद्रधनुष्य अवचित साकारलेले दिसले..त्या इंद्रधनुष्याचे रंग पाहता दोघीही हरखून गेल्या.. शेवटी आपल्या आयुष्यात आपल्यालाच रंग भरायचे असतात असे जणू काही ते इंद्रधनुष्य सांगत होते..दोघीही आपापल्या घराकडे निघून गेल्या.

---



## जीवनगाणे


आरती डिंगोरे
९४०४६८७७२९

# ती ऑनलाइन आहे..

मध्यरात्री अचानक जाग आली. पाणी पिऊन झोपावे तर झोप येईना. एखादे पुस्तक वाचावे म्हटलं तर पुस्तक वाचण्याची इच्छा होईना. काहीतरी लिहूया म्हटलं तर लिहिण्यासाठी काही विषय सूचेना. त्याच वेळी फेसबुकचे नोटिफिकेशन आले. दिवसभर कितीतरी नोटिफिकेशन्स येत असतात परंतु कामांमध्ये फारसे लक्ष जात नाही. शांततेचा भंग करणारे हे नोटिफिकेशन ऐकताच फोन हातात घेतला. बघते तर फेसबुक वरचा हिरवा टिंब दिसताच 'ती ऑनलाइन आहे' समजले.

एवढ्या रात्री ती ऑनलाईन कशी? म्हणून फेसबुकचा आडमार्ग म्हणजे मेसेंजरवर तिला मेसेज करून विचारले, काय गं, आज एवढ्या रात्री तू ऑनलाइन कशी? त्यावर तिचे उत्तर, अगं, कार्यक्रम होऊन दोन दिवस झाले पण पोस्ट शेअर करायला वेळ मिळाला नाही. फेसबुकला पोस्ट शेअर केली, फोटो अपलोड केले की, आपल्याला कधीही मिळू शकतात म्हणून म्हटलं उशीर झाला तरी पोस्ट शेअर करूया. पण.... तू तर रात्री काय दिवसाही फेसबुकवर ऑनलाईन नसते मग आज एवढ्या उशिरा कशी काय ऑनलाईन? अगं, तुझ्या नोटिफिकेशनमुळेच फोन हातात घेतला बघ, चल यानिमित्ताने बोलणं तर झालं. बराच वेळ चॅटिंग केल्यानंतर शुभ रात्री. पुन्हा भेटू. असं म्हणत दोघी ऑफलाईन झालो.

'ती ऑनलाइन आहे' म्हणजेच संगणकीय जाळ्यावर उपस्थित आहे. काहीतरी करत आहे. फेसबुक, इन्स्टा, ट्विटर किंवा व्हाट्सअप असो ती रात्री उशिरापर्यंत ऑनलाईन असली की, अनेकांचे तर्क-वितर्क सुरू होतात. तिच्याविषयी अनेक भ्रम निर्माण होऊ लागतात. तिच्या उशिरापर्यंत ऑनलाईन असणाऱ्यांमध्ये खुद्द हे महाशय सुध्दा ऑनलाईनच असतात. मग व्हाया मेसेंजवर मेसेज करू लागतात. तिच्या शैक्षणिक, वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैयक्तिक कोणत्याही पोस्टला लाइक, कमेंट, शेअर न करणारे, सक्रिय नसणारे 'ती' रात्री उशिरापर्यंत ऑनलाईन असली की सक्रिय होतात. अजून जाग्याच का? झोप येत नाही वाटतं ? तिने रिप्लाय दिला नाही की, मग काय हो, बोला की, बोलत का नाही? तरीही रिप्लाय मिळाला नाही की, हे सुशिक्षित, सो कॉल्ड पांढरपेशी म्हणवून घेणारे शांत थोडीच राहतात का? काय मॅडम बोलायचं नाही वाटतं? अहो! चांगल्या घरातल्या बाईमाणसानं असं उशिरापर्यंत ऑनलाइन राहणं बरं नाही. आरोग्यासाठी हानिकारक असतं. (चांगल्या घरातल्या बाईंविषयीचे असे काहीसे निकष... चांगल्या घरातल्या पुरुषांविषयी मात्र असे कोणतेही निकष लागू नाही.....) तरी तिचा रिप्लाय नाही. पुन्हा मेसेज सुरूच. मी काय म्हणतो, तब्येत बिघडेल. लवकर झोपत चला . तरीही 'ती' दुर्लक्ष करते. पुन्हा मेसेज सुरू. शेवटी वैतागून एकतर 'ती' ऑनलाईनची ऑफलाईन होते किंवा समोरच्याला तरी ब्लॉक करते. तिच्या



उशिरापर्यंत ऑनलाइन राहण्यावर आक्षेप घेणारे केवळ पुरुषच असतात असं नव्हे तर स्त्रियाही असतात,आम्हाला नाही बाई, असला फालतू वेळ सोशल मीडियावर वावरायला. तिचं काय.. आपल्यासारखं थोडचं आहे? वगरै...वगैरे...

डिजिटल क्रांतीमुळे जग जवळ आले आहे. लहान असताना कल्पवृक्षाची ऐकलेली गोष्ट; आता मात्र मोबाईलच्यारूपाने जणूकाही सत्यात उतरली आहे. एका क्लिकवर सर्व काही उपलब्ध होते. भारतीय संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. मग या डिजिटल युगातही रात्री उशिरा बाईने ऑनलाईन राहण्याबाबत आक्षेप का? तिच्या चारित्र्यावर संशय का? ती ऑनलाईन आहे याचा अर्थ 'ती' परपुरुषाशीच चॅटिंग करते आहे असे कशावरून? हा कुठला जावईशोध? तिला तिचे अस्तित्व नाही का? तिचे ऑनलाईन असणे इतरही कारणांमुळे असू शकते. हा विचार का डोक्यात येत नाही? वस्तूंची खरेदी-विक्री, पुस्तकांची खरेदी-विक्री, त्यातून अर्थार्जन कसे करावे? काही नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती, काही विषयांच्या अनुषंगाने मिळणारी माहिती अशी एक नाही अनेक कारणे त्यामागे असू शकत नाही का? नोकरी व्यवसाय करणाऱ्या बहुतांश महिलांचा दिवस पहाटेपासूनच दिवस सुरू होतो. नोकरी- व्यवसाय, कुटुंब सांभाळता-सांभाळता सर्व काही आवरता-आवरता 'ती' अकरा, साडेअकरापर्यंत स्थिरावते. या गतिमान युगाचा 'ती' देखील एक भाग असल्याने गल्लीपासून दिल्लीपर्यंत काय चालले आहे हे जाणून घेण्यासाठी येते ती ऑनलाईन. तिचा स्वतःचा गुणात्मक वेळ ती सोशल मीडियावर घालवू इच्छिते यात काय चुकीचे आहे? मग तिच्या ऑनलाइन राहण्याचा इतका इशू करण्याचे कारण काय? केलेच तिने कुणाशी चॅटिंग, मारल्या कुणाशी गप्पा तर त्यात इतरांना अडचण असण्याचे कारण काय? तिलाही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, मनासारखे जगण्याचा अधिकार आहेच ना?

तिच्या ऑनलाइन असण्यावर तर्क- कुतर्क करण्याच्या मानसिकतेतून आता बाहेर पडायला हवं. तिचं अस्तित्व स्वीकारायला हवं. तिलाही समजून घ्यायला हवं. माणूस म्हणून जगण्याचा तिचा अधिकार मान्य करायला हवा. तरच आपण माणूस म्हणवून घेण्यास योग्य आहोत.